ग्राममंगल

शिक्षणवेध

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषद, काही क्षणचित्रे






ग्राममंगल

# शिक्षणवेध

शिक्षणातील परिवर्तनासाठी

**वर्ष : सहावे । अंक सहावा**

जानेवारी २०१६

■
संपादक
रमेश पानसे

■
कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य

■
व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर

■
संचालक
अदिती नातू

■
कार्यकारी संचालक
अजित मंडलिक

■
संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे । डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत । आशिष पेंडसे

■
सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले । डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर । प्रमोद लेले । दीपक घैसास ।
डॉ. चंद्रहास देशपांडे । अच्युत गोडबोले

■
आतील चित्रे
अपर्णा कुलकर्णी

■
मांडणी व मुखपृष्ठ
राजश्री जाधव

■
मुद्रितशोधन
मिलिंद बोरकर

## बदललेला संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार

**पुणे कार्यालय :** गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११०३८.
संवाद : ०२०२५३८६६८७ Email : shikshanvedh@grammangal.org,
**मुंबई कार्यालय :** अजित मंडलिक, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग,
मुंबई ७. संवाद : ०९८६९०४९८४९
हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना,
शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

# अनुक्रम

संपादकीय / ६

बोन्साय / फारुख एस. काझी / १३

रचनावादी शिक्षणासाठी आवश्यक वातावरण/ डॉ. दिनेश नेहेते / १४

मादाम मॉंटेसोरी आणि रचनावादी शिक्षण / सुरेखा पेंडसे / २०

फ्रोबेलचे बालशिक्षण / संजू चिंतामणी माने / २४

भारतीय बालशिक्षणपद्धती व रचनावाद / प्रज्ञा करंदीकर / ३०

रचनावादी शिक्षणाबाबत पालकांची मानसिकता / महेश कांबळे / ३६

शिक्षकाची बदलती भूमिका / चैत्राली रहाळकर / ४२

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या २२ वे अधिवेशन / ४५

पौगंडावस्थेतील विशेष मुलांच्या वर्तनाचे नियोजन /सुभाष कळसे / ५१

शिक्षकांच्या आत्महत्या / हेरंब कुलकर्णी / ५५

वृत्तविश्व / ५८

ग्राममंगलवार्ता / ६१

इ-लर्निंग / सौमित्र घोटीकर / ६२

समुपदेशकाच्या नजरेतून / गंपूदादा/किशोरीताई / ६४



संपादकीय



# रचनावादी शिक्षण

आपल्या संपूर्ण राज्यातील शिक्षण आज परिवर्तनाच्या वळणावर उभे आहे, ही खूपच महत्त्वाची गोष्ट आहे. विकासाच्या अनेक शक्यता या परिवर्तनाच्या गाभ्यात दडलेल्या आहेत. मुलांच्या दृष्टीने तर त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहेच, तसेच संपूर्ण समाजाच्या उज्ज्वल भविष्याचीही ती नांदी आहे. याच प्रवाहाचा एक अविभाज्य भाग असलेली आपली ‘महाराष्ट्र बालशिक्षण परिषद’ या रचनावादी शिक्षणविचारासाठी सज्ज झाली आहे. साऱ्या महाराष्ट्रभरातून जमलेल्या सर्व शिक्षणप्रेमींचे इथे स्वागत आहे. आजच्या बालकासाठी- म्हणजेच उद्याच्या तरुणांच्या भविष्यासाठी आपण नव्या विचारांची रुजवण करत आहोत, ही अभिमानाची बाब आहे.

राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखड्यात २००५ मध्ये रचनावादी शिक्षणपद्धतीच्या विचाराचा प्रवेश झाला, तर महाराष्ट्र राज्याने २०१० मध्ये या विचाराकडे आपले मोहरे वळवले. ‘मूल आपले आपण शिकते’ या विचारावर रचनावादी पद्धती विकसित झाली आहे. १९५० पासून मानसशास्त्र, मेंदूशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र या शास्त्रात अनेक घडामोडी घडत होत्या; नवी संशोधने होत होती. ज्ञान असते कुठे? बाहेर की अंतर्मनात? ज्ञान म्हणजे काय? माणूस शिकतो कसा? माणसाला बाह्य माहितीचे आकलन होते कसे? ते स्मरणात कसे राहते? भाषा कशी शिकली जाते?- अशा अनेक प्रश्नांचा शोध या साऱ्या क्षेत्रांनी घेतला आणि त्यातून माणसाच्या शिकण्याचा सिद्धांत मांडणारे ‘आकलनशास्त्र’ तयार झाले. याच काळात पियाजे, ड्यूई, वायगॉट्स्की, ब्रुनर या मानसशास्त्रज्ञांनीही मुलाचे आकलन कसे होते, याबाबत महत्त्वाचे विचार मांडले. रचनावादी पद्धतीच्या मुळाशी ही विचारधारा आहे. मुख्यत्वेकरून ज्ञानरचनावादाची इमारत चार खांबांवर उभी आहे. एक खांब- आकलनशास्त्राचा. या शास्त्राने मनुष्याला आकलन कसे होते, हे स्पष्ट केले. मनुष्य शिकतो म्हणजे तो माहितीवर

प्रक्रिया करीत असतो आणि ही सर्व प्रक्रिया मेंदूत घडत असते. दुसरा खांब ज्यॉ पियाजेच्या शरीरविज्ञानावर आधारलेल्या ज्ञानग्रहणाच्या सिद्धांताचा'. तिसरा खांब- लेव वायगॉटस्कीच्या 'आकलन आणि समाजसंस्कृती यांच्या परस्पर संबंधांचा' आणि चौथा खांब जेरोम ब्रुनरचा 'शिकण्याच्या प्रक्रियेचा सिद्धांत'. या सिद्धांतात अभ्यासक्रमातील संकल्पनांचे आकलन कसे होते आणि त्याचे व्यवहारात संक्रमण कसे होते यावर तो भर देतो.

या साऱ्या नावांनी घाबरून जाण्याचे काही कारण नाही. आकलन होणे,रचना होणे सारे खूप सोपे आहे, सहज-नैसर्गिक आहे; त्यातील निसर्गतत्त्वच आपल्याला इतके वर्ष उमगले नव्हते, त्यामुळे शिकणे, शिकवणे सारे अवघड आणि कंटाळवाणे झाले होते.आता परंपरेच्या जोखडातून शिक्षण मुक्त होते आहे- सहज सुंदर होते आहे, ही आनंदाची बाब आहे. आणि म्हणूनच ती आपण, शासन, शाळा, शिक्षक, शिक्षणसंस्था, पालक, समाज साऱ्यांनी बारकाईने समजावून घेतली पाहिजे, अमलात आणली पाहिजे.

हे समजून घेण्यासाठी आपण आपला दैनंदिन अनुभव लक्षात घेऊ. एक वर्षापासून पाच-सहा वर्षांपर्यंतची मुले आठवू. ही मुले बोलायला कधी लागली, कशी लागली, एकेक शब्द बोलायला लागल्यावर एक-दोन वर्षांत अखंड बडबडी कशी झाली... चढणं, धावणं, कोलांट्या मारणं- अशी अनेक कौशल्ये त्यांनी सहज कशी आत्मसात केली? लहान मूल आपल्या किती कुतूहलाचे, किती कौतुकाचे असते,' आमची सोनू दोनच वर्षांची आहे, पण ऐकलेला प्रत्येक शब्द तसाच्या तसा उच्चारते,आमचा विजू जेमतेम चार वर्षांचा, पण किती प्रश्न विचारतो; त्याच्या अनेक प्रश्नांना मला उत्तरच देता येत नाही. तीन वर्षांचा आमचा पिंट्या मोबाईलवरून बाबाला फोन लावतो.' असे कौतुकाचे हजारो स्वर आपल्याला पालकांच्या घोळक्यात ऐकू येतात. हे सारं आपण न शिकवता मुलांना कसं आलं? हे मुलाचं सहज शिकणं आहे. मुलांच्या आतल्या प्रेरणेने त्यांना शिकवलं. ऐकत-पाहात, करत-करत ती शिकली. कशाची भीती नाही- सारखं काही तरी करून पाहण्याची प्रचंड ऊर्मी, साऱ्या इंद्रिय संवेदना जाग्या... यामुळे जन्मापासूनच्या सहा-सात वर्षांत मुले खूप सहजतेने आणि प्रचंड वेगात शिकत असतात. प्रेरणांच्या लक्षावधी बिया मुलांचा मेंदू जन्माला येतानाच घेऊन आलेला असतो. या बिया रुजण्याची फोफावण्याची संधी शोधत असतातआणि टिपकागदासारखे ज्ञान शोषून घेत असतात.

'रचनावाद' समजून घेण्यासाठी स्विस मानसशास्त्रज्ञ पियाजे याने मांडलेला 'ज्ञानग्रहणाचा सिद्धांत' समजून घ्यावाच लागतो. इंद्रियसंवेदना आणि कृती याद्वारे व्यक्तीचा बाह्य जगातील वस्तू, व्यक्ती, घटना, निसर्ग यांच्याशी संपर्क होत असतो. त्यातून नवनवी माहिती मिळत असते. तेव्हा त्यातील क्रिया-प्रतिक्रियांमधून मेंदूत 'प्रतिमा' (schema) तयार होतात. ही प्रतिमा निर्माण होणे, तिच्यात बदल होणे म्हणजे ज्ञान. ही क्रिया अखंड चालू असते. नवी माहिती मिळाली की, नवी प्रतिमा तयार होते. नवी प्रतिमा व जुनी प्रतिमा एकत्रित होऊन नवे ज्ञान होते. प्रतिमा कायम राहत नाहीत, तर त्या बदलतात आणि विस्तारतात. त्यातून ज्ञानाची रचना होत असते. याचाच अर्थ अनुभवलेल्या घटनांचा, मिळालेल्या माहितीचा अर्थ मेंदूला लागतो. हे अर्थ-आकलन किंवा ज्ञान व्यक्ती-विशिष्ट असते. कारण प्रत्येक व्यक्तीची गती, क्षमता, पूर्वानुभव हा भिन्न असतो. म्हणूनच माहिती देता येते, पण ती आकळून घेण्याचे काम ज्याचे त्यालाच करावे लागते. म्हणजेच प्रत्येक जण स्वतःच्या ज्ञानाचा निर्माता असतो. ज्ञानग्रहणासाठी पियाजेने चार गोष्टींची आवश्यकता मांडलेली आहे : (१) शारीरिक व मानसिक परिपक्वता, (२) कृतिशील अनुभव, (३) सामाजिक अभिसरण (या अभिसरणात स्वतःशी व इतरांशी होणारा संवाद खूप महत्त्वाचा आहे.) आणि

(४) संतुलनाची प्रक्रिया. यामध्ये तिन्ही घटक एकत्र येऊन नवा शोध लागतो किंवा ज्ञान होत असते. प्रत्येक माणसाचे अनुभवसिद्ध स्वविचारातून येणारे ज्ञान या चार बाबींतून घडते. हेच आपण शाळेच्या वर्गातील काही उदाहरणांवरून समजावून घेऊ.

बालवाडीच्या मुलांनी फळे खाल्लेली असतात. कधी फोडी खाल्ल्या आहेत, तर कधी ज्यूस प्यायला आहे. फळे सोलून खाल्ली आहेत, तर कधी न सोलता. मुलांच्या या पूर्वानुभवाला जोडून बालवाडीच्या वर्गात शिक्षिका मुलांना नव्या फळांची ओळख करून देते; गर, रस, साल याविषयी जाणीवपूर्वक प्रश्न विचारते. सोलणारी, न सोलणारी फळे, गर किंवा रस असलेली वा दोन्हीही असलेली फळे असे वर्गीकरण करून घेते, तेव्हा मुलांच्या मनात विविध प्रतिमा तयार होतात. सोलणाऱ्या फळांची प्रतिमा, ज्यूस काढणाऱ्या फळांची प्रतिमा किंवा ज्यूस बनवणाऱ्या फळांची प्रतिमा इत्यादी. यातूनच प्रत्येक फळाची स्वतंत्र ओळख होते.

फळे दिसणे ⇨ त्यातून रंग, आकार समजणे, नाव माहीत होणे

फळे खाणे ⇨ त्यातून चव कळणे

फळांच्या कृती करणे ⇨ त्यातून विविध गुणधर्म समजणे. ही प्रक्रिया फळांविषयीच्या प्रतिमाबदलांची आणि विस्ताराची आहे.

इयत्ता पहिलीच्या वर्गात अक्षरांची ओळख करून देताना ताईने मुलांचे लक्ष अक्षराच्या ध्वनीकडे आणि त्यातून अक्षराच्या चिन्हाकडे वेधून घेतले. ध्वनी समजून देताना मुलांचा पूर्वानुभव विचारात घेऊन त्यांना एकाच ध्वनीचे शब्द ऐकविले, त्याची चित्रे त्यांना दाखविली आणि मुलांनाही तसे शब्द शोधून सांगण्याची संधी दिली. जसे 'प' अक्षराची ओळख देताना 'प' पट्टी, पप्पा, पतंग यात वस्तूंची चित्रे दाखवून ते शब्द मुलांसोबत म्हटले व 'प' ऐकू आला का- असे विचारत त्या ध्वनीकडे लक्ष वेधले. मुलांना असे शब्द सांगण्यास प्रोत्साहन दिले. चित्रे न दाखवता पवन, पराग, पसारा असे शब्द ऐकवून 'प' ऐकू येतो का विचारले. हे जमतंय असे लक्षात आल्यावर शब्दात 'प' कुठे ऐकू आला असे थोडे कठीण आव्हान त्यांच्या समोर ठेवले म्हणजे 'पसारा' मध्ये 'प' पहिल्यांदा ऐकू आला... 'माप', 'ताप' या शब्दात 'प' शेवटी ऐकू आला, 'कपडे' या शब्दात तो मध्ये ऐकू आला. ओळखीच्या शब्दांकडून मुले अनोळखी अक्षरांपर्यंत पोहोचली. शब्दाचा संपूर्ण ध्वनी माहिती असताना अक्षराचा सुटा ध्वनी ओळखायला शिकली. या प्रक्रियेत मुलांची ध्वनिश्रवण क्षमता वाढली. विशिष्ट ध्वनीची ओळख व त्याची शब्दातील निश्चित जागा त्यांना माहितीची झाली. ध्वनी-ओळख व त्याचे दृश्य चिन्हरूप याची त्यांच्या मेंदूत योग्य प्रतिमा तयार होऊन अर्थ-आकलन झाले. ही ज्ञानरचना होण्यासाठी प्रत्येक मुलाला लागणारा कालावधी मात्र थोडा वेगवेगळा असतो.

इयत्ता सहावीच्या वर्गात मुलांनी कृती करता-करता क्रमाने त्रिज्या, व्यास, परीघ या संकल्पना आत्मसात केल्या. त्यांना त्रिज्या व व्यास माहिती झाल्यावर ताईने डब्याची झाकणे, वाटी, ताटली यांच्या वर्तुळाकार आकाराचे माप मोजायला सांगितले. हे कसे मोजता येईल, याचा अंदाज करायला सांगितले. मोजण्यासाठी कोणत्या साहित्याचा वापर करता येईल- हे विचारले. मुलांनी पट्टी, अर्धचंद्राकृती पट्टी, दोरा, मीटर, टेप अशा वस्तूंनी मापन करता येईल- असे अंदाजाने सांगितले. दोऱ्याने वर्तुळाचे माप घेणे, ती मीटर टेपने मोजून बघणे- अशी कामे मुलांनी केल्यावर ताईने या 'वर्तुळाला परीघ म्हणतात व आपण परीघ मोजला', हे सांगितले. असा परीघ कशाकशाचा मोजता येईल याची यादी मुलांनी केली. परीघाचा उपयोग वर्तुळाकृती वस्तू तयार करताना, विहीर-टाकी बांधताना होईल- हे सांगितले. ही सर्व मापने प्रत्यक्ष करून पाहिली. यात पूर्वानुभवांची साखळी कशी जोडली, ते पाहू.

सेंटिमीटरने मापन- त्रिज्या घेऊन वर्तुळ काढणे - त्रिज्येवरून व्यास शोधणे-परीघ शोधणे - उपयोजन करणे.

क्रमाने एकेका पूर्वानुभवावर नव्या ज्ञानाची वीट ठेवत मुलांनी ज्ञानरचना केली. ज्ञान झाल्यावर त्याचे उपयोजनही केले. या तीनही उदाहरणांत इंद्रियसंवेदना, कृती यांच्या आधारे मुले शिकली. मुलांचे पूर्वज्ञान, नवे अनुभव, अनुभवांतून मिळालेली माहिती व ती माहिती घेण्यासाठी- म्हणजे शिकण्यासाठी उत्सुक मन यामुळे ही शिकण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. मुले अनुभवातून-कृतीतून आपली आपण शिकतात, असा सोपा अर्थ रचनावादाचा आहे. शिकायचे कसे, हेच शिकता आले तर जन्मभर आपले आपल्याला शिकता येते.

रचनावादी पद्धती :- व्यक्ती-घटना यांच्याकडून येणारे अनुभव, वस्तुरूप साधने, दृकूश्राव्य तांत्रिक माध्यमे ही ज्ञानरचना होण्याची साधने आहेत.

या साधनांच्या आधारे कृती करत, शोध घेत, इतरांच्या संपर्कातून शिकण्याची प्रक्रिया घडत असते.

**रचनात्मक शिक्षणप्रक्रिया**

इतरांच्या संपर्कातून   कृती करून - शोध घेऊन

शिक्षणातून भविष्यासाठी उपयुक्त अशा क्षमता व कौशल्यांचा विकास व्हायला हवा.

१. स्वतःहून शिकता येणे.
२. शिकण्याचे मार्ग शोधता येणे.
३. विचार करता येणे.
४. भाषेचा वापर करता येणे.
५. शरीराचा वापर करता येणे.
६. मिळालेल्या अनुभवातून योग्य ते ज्ञान घेता येणे.
७. शोध घेता येणे.
८. पर्यायांची निवड करता येणे.
९. निर्णय घेता येणे.
१०. कल्पनाशक्ती वापरणे.
११. नवनिर्मिती करता येणे.

**रचनावादी व्यवहार** - रचनात्मक शिक्षण-प्रक्रियेतून या साऱ्या क्षमता विकसित कशा होतील यासाठी आणि या क्षमतांचा वापर करून उपयोजनात्मक कौशल्ये कशी विकसित होतील, हे लक्षात घेऊन वर्गातील रचनावादाचा व्यवहार ठरवावा लागतो. हा व्यवहार वर्गात आणण्यासाठी वातावरण, अनुभव, कृती ही तीन साधने आहेत. या साधनांचा वापर करून ज्ञाननिर्मिती होईल, या ज्ञानाचा उपयोग जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी होईल. नवनिर्माण करण्यासाठी होईल. याआधारे रचनावादी व्यवहाराची पाच सूत्रे सांगता येतील.

१. वातावरण निर्माण करणे.
२. अनुभव संधी निर्माण करणे.
३. कृती करण्यास साधने देणे.
४. उपयोजन जीवनाशी जोडून घेणे.
५. नवनिर्मिती करण्यास अवकाश देणे.

बालशाळेतील रचनावादी शिक्षणाचा विचार करताना शिक्षणतज्ज्ञ फ्रेडरिक फ्रॉबेल व मारिया मॉंटेसोरी यांच्या पद्धती समजावून घेणे, त्यांचा आधार घेणे, त्यात नव्या संशोधनांची आवश्यक ती भर घालणे गरजेचे आहे.

मुले जन्मतः क्रियाशील असतात. हालचाली, खेळ, रचना करणे यातूनच ती शिकू शकतात, हे लक्षात घेऊन फ्रेडरिक फ्रॉबेलने मुलांसाठी 'क्रीडन पद्धती' तयार केली; तर मारिया मॉंटेसोरीबाईंनी 'मुलांचा क्षमताविकास नैसर्गिकरीत्या कसा होत असतो', याच्या शास्त्राचा अभ्यास करत स्वानुभवातून अत्यंत सुंदर अशी 'साधनाधारित पद्धती' विकसित केली. या दोघांनी शास्त्रीय बालशिक्षणाचा पाया रचला. जगभर त्याचा प्रसार केला. संपूर्ण जगातील बालकांसाठीच ती अनमोल देणगी ठरली. क्रीडन व साधनाधारित पद्धती ह्या मुळातच रचनावादी आहेत. त्यातील रचनावादी पद्धतीला 'नैसर्गिक रचनावाद' म्हणता येईल. स्वतःहून कृती करत शिकण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीस या पद्धतीत योग्य संधी आहे. फ्रॉबेलने मुलांसाठी गिफ्ट्स' म्हणजे देणग्या (खेळ) व 'ऑक्युपेशन्स' म्हणजे व्यवसाय (उपक्रम) निर्माण केले. 'गिफ्ट्स'मध्ये विविध प्रकारचे त्रिमितीय ठोकळे, पृष्ठाकृती आकार, विविध आकार,

आकारमानांचे लहान तुकडे, काड्या अशा वस्तू आहेत. या वस्तूंच्या आधारे वस्तूंचे आकार, आकारमान, बाजू, कडा, कोपरे, लहान-मोठेपणा, पूर्ण, अर्धा, पाव अशा अनेक संकल्पना मुले समजू शकतात. वस्तूचे स्थूल व सूक्ष्म रूप समजते. बाह्य वस्तूंचे व या खेळातील वस्तूंचे साधर्म्य लक्षात येते. साधर्म्यातून कल्पनेने मुलांना बाह्य वस्तूंची निर्मिती करता येते. वस्तू-निर्मितीचा आनंद मिळतो, वस्तूनिर्मितीची प्रक्रिया समजते. 'ऑक्युपेशन्स'मधील कागद, मणी, काचा, बिया, काड्या, कापड अशा वस्तूंमधून नक्षीकाम, कागदकाम अशी कलाकुसरीची कामे करता येतात. मुलांसाठी स्वयंशिक्षणाच्या कल्पना व निर्मितीच्या भरपूर संधी निर्माण करणाऱ्या फ्रॉबेलला 'रचनावादी शिक्षणाचा जनक' असे म्हणता येईल. या पद्धतीसाठी आवश्यक असलेला  सहायक, मार्गदर्शक, प्रेमळ शिक्षक- ही फ्रॉबेल पद्धतीतील सर्वात महत्त्वाची बाब आहे.

मारिया माँटेसोरींनी निर्माण केलेल्या शिक्षण-पद्धतीत शैक्षणिक साधने, साधनांचा वापर, साधनांची मांडणी, शिकण्याची पद्धती, शिक्षक-भूमिका असा साकलिक विचार आहे.

मारिया माँटेसोरींची साधने इंद्रियानुभवाची आहेत. भाषा, गणित, विज्ञान या विषयातील संकल्पना स्पष्ट करणारी आहेत. साधने वापराची पद्धत व मांडणी मुलांना स्वयंशिस्तीकडे, नीटनेटकेपणाकडे नेणारी आहे. स्वातंत्र्य, सौंदर्य, स्वयंशिस्त, शांतता या मूल्यांचा सहज स्वीकार होईल अशी साधनांची मांडणी व वर्गरचना बाईंनी निर्माण केली. शिक्षणातूनच 'मनुष्यत्वाचा विकास' होऊ शकेल, विश्वशांतीचे स्वप्न साकार करता येईल- असा त्यांचा विश्वास आहे. मानवी संस्कृतीचा विनाश टाळायचा असेल, तर शांतता आणि सौंदर्य माणसा-माणसात रुजायला हवे. याच भावनेने त्यांनी शालेय वातावरणाचा आणि त्यास पूरक अशा शिक्षक-भूमिकेचा आग्रह धरला आहे.

शिकण्याच्या पद्धतीत माँटेसोरींबाईंनी स्वतंत्रपणे शिकणे, समवयस्कांकडून शिकणे, मोठ्या सहकाऱ्यांकडून शिकणे आणि शिक्षकाच्या मार्गदर्शनाने शिकणे- अशी रचना केली होती. साधनाधारित गटशिक्षण, स्वयंशिक्षण, शिक्षकाच्या मार्गदर्शनाने शिक्षण ही पद्धती रचनावादी पद्धतीत अपेक्षित आहे आणि म्हणूनच रचनावादी पद्धतीची नाळ माँटेसोरींशी जोडावीशी वाटते.

भारतात शास्त्रीय बालशिक्षणाची उभारणी करताना गिजुभाई बधेकांनी माँटेसोरी शिक्षण पद्धतीचा आदर्श ठेवला. मुलांसाठी परिपूर्ण बालशाळा उभी केली. लोकांना बालमानस समजावून देण्याचा प्रयत्न केला. गिजुभाईंच्या शिष्या ताराबाई मोडक व त्यांच्या शिष्या अनुताई वाघ यांनी महाराष्ट्रातील शहरी व आदिवासी परिस्थितीला अनुरूप अशा शैक्षणिक साधनांची निर्मिती केली. शाळा, घर, परिसर यातील जमतील तसे अनुभव मुलांना दिले.

**अनुभवातून शिकणे -** अनुभवाचे तीन मुख्य गट करता येतील.

१) कृतीचे अनुभव -  हाताने करण्याच्या कृती व इंद्रियानुभव.

२) भाषिक अनुभव - श्रवण, अभिव्यक्ती करणे यांचे अनुभव.

३) वैचारिक अनुभव - विचार करणे, तर्क करणे, अंदाज करणे यांचे अनुभव.

वर्गात  पाहण्याचे, ऐकण्याचे, चवीचे, वासाचे, स्पर्शाचे- असे इंद्रियानुभव मिळायला हवेत. कल्पना करण्याचे, विचार करण्याचे, बोलण्याचे, चर्चा करण्याचे, अभिव्यक्त होण्याचे, विविध माध्यमे हाताळण्याचे असे भाषिक व वैचारिक अनुभव शाळेमध्ये निर्माण करावे लागतात. ज्ञानरचना होण्यासाठीचे सर्वांत महत्त्वाचे साधन आहे 'भाषा'. वायगॉटस्कीने म्हटल्याप्रमाणे- 'भाषा हे विचार करण्याचे, ज्ञान मिळविण्याचे, ज्ञान स्मरणात ठेवण्याचे मानससाधन' (मेंटलटूल) आहे. त्यामुळे हे साधन लखलखीत करून ठेवायला हवे. एक नव्हे तर दोन-

तीन भाषा ऐकण्याचे-वापरण्याचे अनुभव मुलांना द्यायला हवेत.

वर्गात अनुभव देताना -

अनुभव भरपूर असावेत.

अनुभव नव-नवे असावेत.

वयानुरूप अनुभव सोपे, कठीण व व्यामिश्र होत जाणारे असावेत.

घरात, परिसरात, समाजात सहज मिळणाऱ्या अनुभवांकडे जाणीवपूर्वक बघायला शिकावे लागते. अनुभवांतून ज्ञान घेणे व ज्ञानाला अनुभवांशी जोडून पक्के करणे, ज्ञानाचा वापर करणे अशी व्यामिश्र प्रक्रिया शिक्षणात घडावी लागते. या प्रक्रियेतून आकलन-विचार-कल्पना-निर्मिती अशी साखळी तयार होते. यासाठी सोपे, कठीण व व्यामिश्र होता जाणारे अनुभव मुलांना द्यावे लागतात. अनुभवांची रेलचेल व नावीन्य असावे लागते. केवळ शाळेच्या चौकटीत अनुभवांची विविधता आणि व्यापकता साधणे कठीण आहे; म्हणूनच शाळा, घर, समाज, परिसर मिळून शाळा बनली पाहिजे. याचाच अर्थ शिकण्याचा परिसर खूप व्यापक आहे. शिकण्याच्या संधी हवेसारख्या संपूर्ण वातावरणभर पसरलेल्या असतात. माँटेसोरीबाईंनी `The absorbent mind` मध्ये म्हटले आहे- मुलाचे मन हा एक स्पंज आहे. सारं शोषून घेण्याची क्षमता त्याच्यात आहे. शोषून घेण्यासाठी मुलांना कोणते वातावरण मिळते, ते महत्त्वाचे. वातावरणाचा आपण दोन स्तरांवर विचार करू. एक- शालेय वातावरण आणि दोन- नैसर्गिकरीत्या प्रत्येक मुलाला लाभलेले वातावरण. पहिले शालेय वातावरण मुलांची शिकण्याची इच्छा निर्माण करणारे असावे. कृती करता येतील अशा वस्तू- शैक्षणिक साधने, शोध घेता येईल असे वाचन-साहित्य, कुतूहल जागृत होईल असे साहित्य, अशा स्वयंशिक्षणाच्या संधी निर्माण करण्याची जबाबदारी 'शाळा' या व्यवस्थेतील सर्वांची आहे. शाळेत शिकावेसे वाटण्यासाठी प्रसन्नता, सुव्यवस्था असावी लागेल. वर्गांची अंतर्बाह्य रचना शिकण्याच्या संधींनी प्रेरित असावी. मुलांना निर्भयपणे, स्वतंत्रपणे, स्वतःच्या गतीने, क्षमतांचा योग्य वापर करता, पुरेसा अवकाश मिळत शिकता यायला हवे. 'भावनिक सुरक्षितता' असेल, तरच मेंदू शिकण्यास तयार असेल. शिक्षक हा केवळ शिकविणारा नाही; तर मुलांबरोबर तोही शिकणारा झाला, मुलांचा सहायक झाला, तर मुलांच्या विकासास योग्य शैक्षणिक वातावरण मिळेल.

**दुसरे वातावरण म्हणजे मुलाचे घर, त्याचा परिसर व समाज.**

समाजशास्त्र, मानववंशशास्त्र या शास्त्रांनीही व्यक्तीच्या विकासात त्याच्या भोवतालची भाषा, समाज, संस्कृती याचे महत्त्व सांगितले आहे. पियाजेचा समकालीन भाषाशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ लेव वायगॉटस्की याने मुलांच्या विकासाचा संबंध पियाजेप्रमाणे फक्त शारीरिक-मानसिक परिपक्वतेशी न जोडता समाजाशी जोडला. शिकणे व्यक्तिगत असले तरी समाजाच्या संपर्काशिवाय शिकणे अशक्य आहे. मुलाची भाषा समाजसंपर्कातूनच विकसित होते. तसेच समाजातील वातावरणाचा, संस्कृतीचा, भौगोलिक परिसराचा परिणाम इतर बौद्धिक विकासावरही होत असतो. ज्या समाज व परिसरात मूल राहते, तेथील वातावरण कसे आहे; आर्थिक स्थैर्य कितपत आहे; भावनिक सुरक्षितता मुलांना मिळते का; भाषेचा वापर किती समृद्धपणे केला जातो; कोणत्या मूल्यांचे संस्कार तिथे होतात; नातेसंबंधांची जपणूक कशी होते; कलांचे कोणते अनुभव मिळतात; विचार विकसित होतील असे कोणते अनुभव मिळतात- यावर मुलाचा विकास अवलंबून असतो. यातून मुलांची भाषा, कलांविषयीची जाण, व्यापकता, अभिरुची तयार होते. विचार करण्याच्या, तर्क करण्याच्या, कल्पना करण्याच्या संधी समाजातून मिळाल्या नाहीत; तर विचार, कल्पना, तर्कशक्ती यांपासून मूल दूरच राहील.

कथा-काव्य-संगीत-भाषणे ऐकणे, चित्र-नृत्य-वादन अशा कलांचा आस्वाद घेणे, कलांविषयी जाणीव

विकसित होणे, तर्कसुसंगत विचार करणे, कल्पना करणे यासाठीचे अनुभव न मिळणे म्हणजे सांस्कृतिक व वैचारिक दृष्ट्या अविकसित राहणे होय. प्रा. रमेश पानसे याला 'सांस्कृतिक दारिद्र्य' असे संबोधतात. असे सांस्कृतिक दारिद्र्य लहान खेडेगावांमधून, आदिवासी समाजांमधून, शहरांतील वस्त्यांमधून आढळतेच आढळते. मग असे संपन्न करणारे अनुभव शाळांमधून पुरविणे, हे आपल्यासमोरील एका आव्हान आहे. अशा समाजापासूनही दूर राहणारी मुले बालगृहे, बालसुधार केंद्रे, अनाथालये यांमध्ये आहेत. या मुलांच्या विकासाचे काय, याचा विचार आपल्यासारख्या समंजस माणसांनी करायलाच हवा. या मुलांजवळ तर जगण्याच्याच ऊर्मी नसतात, उत्साह नसतो; तर शिकणे कसे? कोणत्या नव्या कल्पनांचे धुमारे फुटणार? तर्क-सुसंगत विचार कसा करता येणार? अत्यंत असंतुलित, असुरक्षित अशा वातावरणात संतुलित भावनांची पिढी कशी निर्माण होणारा? याचा अर्थ- एवढ्या लाखो मुलांकडून समाजाच्या, देशाच्या विकासाला हातभार लागणार नाही. या साऱ्याकडे जाणीवपूर्वक पाहून रचनावादी शिक्षणाचे सारे आयाम असलेले वातावरण प्रत्येक परिस्थितीतील प्रत्येक मुलापर्यंत कसे पोहोचेल, हे आपल्या पुढील मोठे आव्हान आहे. 'ज्ञानरचना-वादातील अनुभव' या शब्दाची व्याप्ती संकल्पना स्पष्ट होण्यापासून समृद्ध मन, विचार घडविण्यापर्यंत व्यापक करायला हवी; तरच एका सुदृढ-समृद्ध समाजाची निर्मिती होऊ शकेल.

या आशयाचा सारांश म्हणून रचनावादाची फक्त तीन मूलभूत तत्त्वे आपण कायम लक्षात ठेवू या.

मुले स्वतःची स्वतः शिकत जातात.

मुले स्वतः कृतिशील अनुभवांतून शिकतात.

मुले नेहमीच आपल्या आधीच्या ज्ञानाचा आधार नवे शिकताना घेतात.

(तसेच आपल्या पुढील महत्त्वाच्या तीन आव्हानांचा विचार करू.)

एक : पालकप्रबोधन - समाजातील प्रत्येक प्रौढापर्यंत रचनवादी शिक्षणाचे महत्त्व समजणे. मेंदू शिकतो कसा, हे समजणे.

दोन : सुंदर, शांततापूर्ण जीवन पर्यावरणास अनुकूल असे वातावरण शाळेत व परिसरात निर्माण करणे.

तीन : संपूर्ण देशातील सांस्कृतिक दारिद्र्य नाहीसे करणे. हे घडले तरच सर्वांचे आणि पर्यायाने देशाचे, जगाचे भविष्य सुरक्षित-प्रगल्भ बनेल.

(महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेत सादर केलेले बीजभाषण)

**सुषमा पाध्ये**


वार्षिक वर्गणी रुपये ४००/-

त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.

'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि

दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.

वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.

मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधी भवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११०३८.

संवाद : ०२० २५३८६६८७

कविता

- फारूक एस. काझी

# बोन्साय



घंटा होते
बांधा बांधावरून लेकरं
शाळेकडे धावताना
स्कूल चले हम...
छान गाणं वाजायचं.... दूरदर्शनवर !!
वाटायचं किती मजेत आहेत पोरं !!
पण दुसऱ्याच क्षणी वाटून गेलं
या पोरांची दप्तरं... ?????
इतकी हलकी कशी ??
कारण हल्ली तर प्रत्येक पाठीवर
नवीन जाडजूड 'पाठ' असते...
झुकलेले खांदे, तुकलेली मान दिसते...
शिक्षणात 'शिकणं' विसरून गेलं
फक्त नि फक्त 'बादली भरणं' आलं....
दप्तरांना नवनव्या बुकांचं 'बोजड आजारपण' जडलं
शिकणं शिकणं म्हणता म्हणता शिकणचं पार हरवून गेलं...
दप्तरातल्या चिंच, बोरं, कैऱ्या, भोवरे, गोट्या, भिरभिरं गेलं
नोटबुक, वर्कबुक, प्रोजेक्ट बुक, काही-बाही साचतच गेलं.
दप्तर नावाचा दोस्त जाऊन, गुलामीचं नवीन साधन बनत गेलं
सुटका हवी ओझ्यापासून, केवळ वह्या पुस्तकांच्या नव्हे तर 'माहिती'
नावाच्या 'वायरस' जो मेंदूत 'माणूसपण' टिकून देत नाही...
यंत्र बनून सोडतं,
बालपणाच्या कोवळ्या रोपांचं 'बोन्साय' करून टाकतं.

## विचारमंथन

# रचनावादी शिक्षणासाठी आवश्यक वातावरण

मनुष्य हा शिकण्याचा सतत प्रयत्न करणारा प्राणी आहे. मनुष्याचा मेंदू हा त्याच्या शिक्षणाचा अवयव आहे आणि तो ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून अव्याहतपणे नव-नवीन ज्ञान आत्मसात करत असतो. मनुष्याचे शिक्षण हे त्याने स्वतंत्रपणे त्याच्या आयुष्यात आलेल्या समस्यांवर मात करून आनंदाने जीवन जगू शकण्यासाठी असावे, असे म्हटले जाते. म्हणजेच शिक्षण हे अपेक्षित प्रश्नांची उत्तरे मिळवणे नसून, मनुष्याच्या विविध क्षमता वाढविण्यासाठी असावे; जेणेकरून तो भविष्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या आव्हानांना तोंड द्यायला तो सक्षम असेल. क्षमतांचा विचार करता; प्रामुख्याने समोर येतात त्या निर्णयक्षमता, शोधक्षमता, आकलनक्षमता इत्यादी. स्विस शास्त्रज्ञ जीन पियाजेंनी शोधून काढले की वेगवेगळ्या वयात मेंदूच्या वेगवेगळ्या क्षमतांचा विकास होतो व त्या क्षमतांच्या विकासानुरूप ज्ञानाची रचना मुले स्वतः करतांना दिसतात.

जेव्हा आपण कोणत्याही रचनेचा विचार करतो तेव्हा प्रत्येक रचनेत आधी काही मूलभूत गोष्टी ठरवल्या जातात आणि मग त्यांचा वापर करून त्यावर पुढील रचना केली जाते. पियाजेंच्या कामाचा विचार करताना असे लक्षात येते की, सगळ्यात आधी निर्माण होते ती आकृत्या व आकृतीबंध ओळखण्याची क्षमता. सेम-सेम व नो सेम-सेम समजण्याची क्षमता. या आकृत्या व आकृतिबंध फक्त दिसण्याशीच संबंधित नाहीत; तर आपल्या प्रत्येक ज्ञानेंद्रियाच्या- डोळे, कान, नाक, जीभ, व त्वचा यांच्या- आपापल्या कामांशी संबंधित आहेत. उदा.- डोळे : ज्यात रंगांच्या अगणित छटा, वस्तूंचे विविध आकार, तसेच वेगवेगळे पोत हे नजरेने ओळखता येतात. नाक: ज्याने वेगवेगळे दर्प, सुवास ओळखता येतात. जीभ : ज्याने विशिष्ट चव सहज ओळखता येते. तसेच, कान : यांनी आवाजातील अत्यंत सूक्ष्म फरक असलेली कंपनं ओळखण्याची

## डॉ. दिनेश नेहेते

क्षमता. तर त्वचेतून- म्हणजेच स्पर्शाने तापमान, आर्द्रता तसेच दाब आणि त्यातील सूक्ष्म फरक ओळखता येतात. जेवढी या प्रत्येक इंद्रियाची सूक्ष्म फरक ओळखण्याची क्षमता जेवढी जास्त, तेवढी पुढे जाऊन हुशारी जास्त. कारण कुठल्याही गोष्टींचे आकलन होण्यासाठी मनुष्य याच मूलभूत गोष्टींचा वापर करणार असतो. कल्पना करा की- जर चित्रकाराला रंगांच्या छटा ओळखता आल्या नाहीत, तर? संगीतकाराला आवाजातील छटा ओळखता आल्या नाहीत, तर? अगदी देश चालवणाऱ्या पुढाऱ्यांना त्यांच्या पक्षातील किंवा त्यांच्या विरोधातील लोकांच्या वागण्यातील फरक ओळखता आला नाही, तर?

मग क्षमताविकासासाठी वातावरण कसे असावे; ज्यात मुलांना लहानपणीच- जेव्हा त्यांचा मेंदू-विकास होत असतो, तेव्हाच- या गोष्टी करण्याला वाव मिळेल. शिक्षक व पालकांना आपल्या संस्कृतीतील समजांमुळे यासाठी समाजाला बऱ्याचदा तोंड द्यावे लागेल आणि त्यासाठी आपली तयारी असावी लागेल. उदा.- माझा मुलगा लहान असताना त्याची एक सवय होती. अगदी नैसर्गिकतेने तो पानात वाढलेल्या प्रत्येक पदार्थाचा खायच्या आधीच वास घ्यायला धडपडे आणि त्याच्या आईला याचा होणारा मानसिक त्रास सहन करून त्याला ते करू द्यावे लागे. कारण अन्नाचा वास घेऊ नये, असा सांस्कृतिक समज तिच्या मनात खोल रुजलेला होताच; पण त्यामागचा शास्त्रीय दृष्टिकोनही माहिती होता. दुसरे असेच उदाहरण म्हणजे- एकदा तो त्याच्या आजोबांसोबत चपलांच्या दुकानात शिरला. त्याला तेथील चामड्याचा वास नवा होता. तो समजून घेण्यासाठी त्याने चक्क एक कोरी चप्पल उचलली व सरळ नाकाला लावली आणि बाबांना समजावता-समजावता माझ्या नाकात दम आला. आज मला आनंद आहे की, सुदैवाने आम्ही त्याला ते वातावरण देऊ शकलो, ज्यात त्याला त्याच्या ज्ञानेंद्रियांचा क्षमता-विकास करण्याला वाव होता.

आपण ज्या वेळी मुलांच्या विकासासाठीचे वातावरण म्हणतो, त्या वेळी ते मुख्यत्वे तीन प्रकारचे असते. १. भौतिक वातावरण, २. मानसिक वातावरण व ३. सामाजिक वातावरण

**भौतिक वातावरण :**

ज्यात शारीरिक हालचालींना वाव मिळेल. यात घरात विविध खेळ असावेत, त्यांना खेळावेसे वाटेल ते खेळण्याची त्यांना मुभा असावी. पानसे सरांच्या बोलण्यात एक वाक्य नेहमी येते, ते खूप महत्त्वाचे आहे. ते, मुलांना खेळ किंवा खेळणी आवडत नाही, तर




मुलांना खेळायला आवडते; त्यांना खेळू द्या. 'बालपणी घर हे खेळायला प्रवृत्त करणारे' पण त्याचबरोबर सुरक्षित असावे. शाळेच्या दृष्टीने पाहिले तर शाळेत विविध साधने, खेळ तसेच भिंतींवरचे काम महत्त्वाचे आहे. ज्यात भिंती बोलक्या असाव्यात; ज्या विविध विषयांतील जिज्ञासा वाढवतात, जे समजले त्याच्या पुढच्या माहितीची जाणीव करून देतात, नव्याने काही तरी जिज्ञासा निर्माण करतात.

जिज्ञासा ही उपजतच असते. अगदी लहान मुले पाहिलीत? पडल्या-पडल्या त्यांच्या खेळण्याला हाताने किंवा पायाने धक्का मारताना? का करतात ते असे? ती जिज्ञासा आहे, ते काय आहे हे समजून घेण्याची. धक्का लागला आणि खेळण्याने आवाज केला, तर परत-परत धक्का लावून येणारा आवाज हा आपण या खेळण्याला धक्का दिल्यानेच येतो आहे, हे समजून घेण्याची. वयोगटाप्रमाणे या जिज्ञासेचे रूप बदलत असते. उदा.- २ ते २.५ वयोगटात खेळ खेळत असतानाच इतर गोष्टी समजून घेणेसुद्धा सुरू असते. एका मुलाचे असे उदाहरण आहे की, तो त्याचा-त्याचा खेळ खेळत होता अन् दारावरची घंटी वाजते. तो दार उघडतो आणि बाहेर बघतो तर- तिथे कोणीच नसते. तो परत येऊन त्याच्या खेळात रमतो. पुन्हा घंटी वाजते, दार उघडतो- बाहेर कोणीच नाही! असे दोन-तीनदा होते. तेव्हा हा हुशार हळूच मागल्या दाराने जाऊन बाबांना गुपचूप घंटी वाजवताना पकडतो. हे काय- तर खेळात रमलेला असतानासुद्धा बाहेर कोण आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा. थोड्या पुढील वयोगटात गेलो; साडेपाच/सहा वर्षे- पियाजे ज्याला concrete operational stage म्हणतात- तर या वेळात ही जिज्ञासा तर्कशुद्ध झालेली दिसते. उदाहरण द्यायचे झाले तर- या वयात माझ्या मुलाने प्रश्न विचारले होते : १. आपण नेहमी पेट्रोल पंपावर जातो आणि परत-परत पेट्रोल भरतो, ते सायलेन्सर मधून बाहेर पडते का? इथे तर्कशुद्धता (cognition) आहे. जे आत जाते, ते कुठून तरी बाहेर यायला हवे. २. त्याचा दुसरा प्रश्न होता -मी आपल्या घरातला नोकर आहे का? याला कारण होते की, आमच्या शेजारी त्याच्या मित्राकडे एक नोकर होती, सगळे तिला कामे सांगत आणि आमच्या घरात हा एकटाच छोटा, त्यामुळे सगळे याला कामे सांगत. त्यातून 'मी या घरातला कोण आहे?' हा प्रश्न निर्माण

होणे, ही जिज्ञासा. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे मुलातील जिज्ञासा, एखादी गोष्ट समजून घेण्याची प्रवृत्ती, ही घडवण्याची गोष्ट नसून ती टिकवून ठेवण्याची गोष्ट आहे.

जसे पियाजेंनी मूल अनुभवातून त्याचे ते शिकते याचा शोध लावला, तसेच वायगॉटस्कींनी क्षमता वाढीच्या वयात त्या-त्या गोष्टीसाठीचे अनुभवसंपन्न वातावरण (zone of proximal learning / थोडीशी मदत मिळाली तर करू शकेल, असे वातावरण) मिळाल्यास त्या क्षमतांचा विकास अधिक वेगाने होतो, हे शोधून काढले. म्हणजेच मूल बोलायचा प्रयत्न करत असेल, त्या काळात त्याच्याशी बोलणे केले गेले; तर मूल बोलायला लवकर शिकते. मूल आकार ओळखण्याचा प्रयत्न करत असेल आणि त्याला विविध आकारांची जुळणी करण्याची विविध प्रकारची खेळणी/साधनं मिळाली, तर ते क्लिष्ट आकारही सहज ओळखायला शिकते, इ. थोडक्यात, त्यांचे वातावरण त्यांना अनुभवांनी संपन्न करण्यास पूरक असेल, त्याचबरोबर त्याची आव्हानात्मक रचना असेल; तर मुलांना सतत नवे शिकायला आवडते. आव्हानात्मक रचना म्हणजेच येत नसलेल्या परंतु थोड्या प्रयत्नाने जमतील अशा गोष्टी प्रत्येक वेळी सतत करायला मिळत राहणे. हे झाले भौतिक वातावरण. आता आपण बघू या भावनिक वातावरण कसे असावे.

**भावनिक वातावरण :**

ज्ञानाची रचना करण्यासाठी जसे अनुभवसंपन्न परंतु सुरक्षित भौतिक वातावरण आवश्यक असते, तसेच त्याला अनुभवसंपन्न आणि सुरक्षित भावनिक वातावरण मिळण्याची सुद्धा गरज असते. किंबहुना मी म्हणेन उत्तम ज्ञानरचना होण्यासाठी भावनिक सुरक्षिततेची अधिक आवश्यकता असते. मुलांचे भावनिक वातावरण प्रामुख्याने खालील नात्यांवर अवलंबून असते. विद्यार्थी-विद्यार्थी, विद्यार्थी-शिक्षक, विद्यार्थी-पालक, पालक-शिक्षक, तसेच शिक्षक-व्यवस्थापक. या प्रत्येक नात्यात असलेली वर्तणूक, त्यांची भाषा, त्या भाषेत असलेला टोन, त्यांची मानसिकता, त्यांची देहबोली- या सगळ्याचा मुलांच्या भावनिक घडामोडींवर परिणाम होत असतो. या प्रत्येक नात्यात एक विश्वास निर्माण होणे आवश्यक असते. या नात्यांत भावनिक असुरक्षितता निर्माण झाली, तर मेंदूचे डाऊन शिफ्टिंग होते. म्हणजेच असुरक्षित वातावरणात मेंदूतील निर्णयाचे स्थान बौद्धिक मेंदूकडून (Neocortex) भावनिक मेंदूकडे (Limbic system) व भावनिक मेंदूकडून सरपट मेंदूकडे (brain stem) जाते. थोडक्यात, भावनिकदृष्टया असुरक्षित वातावरणात बौद्धिक चर्चा किंवा काम होण्याऐवजी तिथे भावनिक निर्णय होतात आणि खूपच असुरक्षित वाटायला लागले, तर फक्त स्वतःला वाचविण्यासाठीचे निर्णय होतात- जे दोनच प्रकारचे असतात. एकतर give-up किंवा attack, Flight or fight, पळून जा किंवा अंगावर धावून जा. जर खऱ्या अर्थाने ज्ञानाची रचना व्हायची असेल व ज्ञानरचनेत सर्जनशीलता हवी असेल; तर तिथे भीतीचा मागमूसही असून चालत नाही, असे मेंदूचे शास्त्र सांगते.

बऱ्याचदा बोलले जाते- हल्ली कुठे शिक्षा करता येते हो? शाळेत आवाज वाढवला तरी शिक्षकांची कम्प्लेन्ट केली जाते. इथे लक्षात घेतले पाहिजे की- शिक्षा न होणे, मार न मिळणे म्हणजेच भावनिक सुरक्षितता, असे नाही. मुलाला मिळून-मिसळून काम करायला आवडते, एकत्र बसून काम करायला आवडते; म्हणून गटात बसून काम करताना ते खूश असतात. तसेच, घरातील कामात त्यांना सहभागी करून घेतल्यास किंवा एकत्र बसून त्यांच्याबरोबर खेळल्यास त्यांना सुरक्षित वाटते, आपलेपणाची (belongingness ची) भावना निर्माण होते. घरी आल्यावर मुलांना खूप गोष्टी सांगायच्या असतात, कोणी तरी ऐकून घेणारे हवे असते; लगेच दुरुस्त्या किंवा सल्ले नको असतात. लगेच चुका दाखवल्याने किंवा ऐकून न घेतल्याने ती हिरमुसली होतात; त्यांच्यात भावनिक असुरक्षितता निर्माण होते. पालक, शिक्षक व शाळा यांत एकवाक्यता नसेल; शिक्षक पालकांबद्दल, पालक शिक्षकांबद्दल किंवा शाळेबद्दल विश्वासार्ह बोलत नसतील, तर मुलांमध्ये असुरक्षिततेची

भावना निर्माण होऊ शकते. आपल्या सोईनुसार आपण जे बाबांचे किंवा शिक्षकांचे राक्षसीकरण करतो, त्याने मुलांत असुरक्षिततेची भावना निर्माण होते. नवीन पिढीत जी पर्सनली घेण्याची प्रवृत्ती दिसते आणि ज्यातून ब्लेम गेम सुरू होताना दिसतो, ते भावनिक दृष्ट्या असुरक्षित वाटण्याचे बाह्य स्वरूप आहे. We are producing generations after generations with the same feelings. जर आज तुम्ही कुणाही व्यवस्थापकाला विचाराल, तर लक्षात येईल की- त्याचा सगळ्यात मोठा प्रॉब्लेम त्याच्या टीमला या ब्लेम गेममधून बाहेर कसे ठेवू, हाच असेल. बहुतेक जण प्रॉब्लेम्स सोडविण्याऐवजी justifications देत आहेत, का? कसे घडवून आणता येईलऐवजी कसे होऊ शकत नाही, हेच बोलत आहेत; का?

जशी आपण इतर नाती पाहिली, तसे व्यवस्थापन-शिक्षक हे नातेसुद्धा विश्वासार्ह असायला हवे; जसे मुलांचे वातावरण भावनिक दृष्ट्या सुरक्षित हवे तसेच शिक्षकांसाठीचे वातावरणसुद्धा भावनिक दृष्ट्या सुरक्षित असावे. त्याने शिक्षकांमध्ये सुद्धा मेंदूचे डाऊन शिफ्टिंग होणे टळते आणि पूर्ण शाळाच भावनिक सुरक्षितता निर्माण करू शकते. थोडक्यात- मोठ्यांच्या नात्यात भावनिक सुरक्षितता असेल, विश्वासार्हता असेल; तर मुलांनासुद्धा भावनिक सुरक्षितता उपलब्ध होईल.

आता आपण वळू या सामाजिक वातावरणाकडे.

**सामाजिक वातावरण :**

वायगॉटस्कींनी त्यांच्या संशोधनांतून असे व्यक्त केले आहे की- मुलांच्या विकासावर समाजाचा, संस्कृतीचा मोठा प्रभाव असतो. मुलांची ज्ञानाची रचना ही जशी त्यांच्या अनुभवांवर अवलंबून आहे, तशीच ती त्यांच्या सामाजिक संदर्भांवर अवलंबून असते. जे अनुभव मुले जमवत असतात, त्यांचे संदर्भ बऱ्याचदा त्यांच्याकडे सामाजिक प्रतिक्रियेतून आलेले असतात. म्हणूनच मुलांचे ज्ञान हे त्यांच्या सामाजिक संदर्भांपासून वेगळे होऊ शकत नाही. समाजातील विशिष्ट व्यक्ती, सोशल ग्रुप्स, तसेच समाजाचे राजकीय व आर्थिक वातावरण याचा मुलांच्या विकासावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. उदाहरणार्थ- नैसर्गिकरीत्या मुले जिज्ञासू असतात, त्यांना जग जाणून घ्यायचे असते; परंतु जर समाजरचनेत किंवा संस्कृतीत त्याला वाव नसेल- किती प्रश्न विचारतोस गप्प बस, मधे-मधे बोलत जाऊ नकोस, हे आले हुशार- असे उपरोधिकपणे म्हटले जात असेल. तसेच भोचक, चोंबडा म्हणून लेबल केले जात असेल... अथवा इतर मार्गांनी त्यांचे वागणे अयोग्य असल्याचे दाखवून दिले जात असेल, त्यांना इनव्हॅलिडेट (invalidate) केले जात असेल; तर अशा सामाजिक वातावरणात मुलांची जिज्ञासू वृत्ती हळूहळू कमी होते, कित्येकदा ते प्रश्न विचारणेच बंद करतात आणि हे त्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने खूप घातक आहे.

Elizabeth Hurlock यांच्या म्हणण्यानुसार, मुलांचा विकास होत असताना येणाऱ्या भावनिक अडथळयांमुळे मुले social adjustment करतात. कुठलीही अशी गोष्ट जी योग्य भावनिक विकासाच्या आड येते, ती मुलांना परिस्थितीशी जुळवून घ्यायला भाग पाडते आणि हे जुळवून घेणेही पुढे जाऊन त्याची मानसिकता बनते. वर्गात शिक्षेच्या रूपात जर humiliation झाले, तर मुलांचे पूर्ण व्यक्तिमत्त्व बदलून जाण्याची शक्यता असते. शिक्षणाचा, शाळेचा तिरस्कार निर्माण होण्याची शक्यता असते; एवढेच नाही तर मनावरच्या या आघातांचा त्यांच्या पुढील आयुष्यावर, त्याच्या व्यक्तिमत्त्वावर कायमचा आघात होऊ शकतो. रचनावादात या गोष्टींचा विचार करण्यात आलेला आहे आणि म्हणूनच यात कोणत्याही नव्याने पुढे आलेल्या अनुभवांचा आशय लक्षात घेणे, तो आपल्या पूर्वीच्या अनुभवांशी व त्यातून स्वनिर्मित आशयाशी जोडणे, आपल्या मुळच्या आकलनात आवश्यक बदल करणे, आधी जे समजले आहे त्या समजातच दुरुस्ती करणे या गोष्टींना स्वातंत्र्य दिलेले आहे. ज्ञानाची नवरचना व ज्ञानाची नवनिर्मिती याला रचनावादात खूप महत्त्व दिलेले आहे. अर्थातच त्यामुळे 'मूल चुकले' हा समजच या शिक्षणपद्धतीत नाही. मूल हे त्याची ज्ञानरचना कायम नव्याने करत असते व करणार

आहे; या मानसिकतेतून समाजाने, तसेच शिक्षक, पालक व इतर व्यक्तींनी मुलांकडे बघायचे आहे.

मुलांमध्ये सामाजिकता कशी घडत जाते याचे वर्णन Elizabeth Hurlock यांनी त्यांच्या Child Development या पुस्तकात केले आहे. साधारणपणे तीन/साडेतीन वयाच्या मुलांत सामाजिकीकरणाची सुरुवात होताना दिसते. सुरुवातीच्या वयात मुले फक्त एकत्र बसून खेळत असतात, परंतु त्यांचा खेळ इतरांपेक्षा स्वतंत्र असतो. त्यानंतरच्या टप्प्यात मुलांना एकत्र बसण्याबरोबरच दुसरे मूल जी खेळणी किंवा खेळ खेळत असेल ते खेळण्याची इच्छा होते आणि त्यापुढील टप्प्यात खऱ्या अर्थाने सहकार्याला सुरुवात होते. मुलांच्या वाढीचे हे रूप पाहिल्यास ठरावीक वयात मुबलक प्रमाणात खेळण्यांची व साधनांची व्यवस्था असणे आवश्यक असते. तसेच वयानुसार नंतरच्या काळात एकत्र बसून खेळता येतील असे खेळ किंवा एकत्र करता येतील अशी कामे यांची मांडणी वातावरणात असणे आवश्यक असते. याच वयात मुले स्वतः पुढाकार घेऊन एकत्र काम करायला उत्सुक असतात आणि या वयातील अनुभव त्यांची मानसिकता घडवण्यात महत्त्वाचा वाटा उचलतात. उदा.- या वयात जेव्हा ते गटातून काम करत असतात व ते काम पूर्ण होणे ही गटाची जबाबदारी असते; तेव्हा जर शाळेत किंवा समाजात पुन:पुन्हा एखाद्याला महत्त्व दिले गेले किंवा हिणवले गेले, तर अशा वातावरणात वाढलेली मुले पुढे जाऊन गटात काम करताना असमर्थ ठरतात. They fail in teamwork. अशा मुलांच्या ज्ञान- रचनेत गटात काम करण्याबद्दल एक तर न्यूनगंड निर्माण होतो किंवा अहंगंड निर्माण होतो. चूक होण्याची सतत भीती किंवा सतत माझेच बरोबर ही प्रवृत्ती- या दोन्ही मानसिकता गटात काम करण्यासाठी अयोग्य आहेत. थोडक्यात- प्रकल्प जर छान झाला तर त्यात प्रत्येकाने आपापला वाटा उचललेला असतो, म्हणून सगळ्यांना त्याचे श्रेय मिळणे आवश्यक असते. ज्या वातावरणात हे घटक असतात तेथील टीमवर्क छान होताना दिसते. उदा.- जपानमधील लोक हे उत्तम टीम प्लेयर आहेत, असे म्हटले जाते.

आपल्या सामाजिक परिस्थितीकडे पाहिले, तर बहुतेक लोक त्यांच्या वैयक्तिक प्रगतीकडेच बघतांना दिसतात. प्रोजेक्टवर काम करीत असताना टीममध्ये काम करत असूनही वैयक्तिक कौतुकाची व बक्षिसाची अपेक्षा करत असतात; का? आणि बऱ्याचदा वैयक्तिक प्रगतीसाठी प्रकल्पाचा बळी द्यायलाही तयार असतात. जर खोलवर जाऊन विचार केला तर लक्षात येईल की, याची मुळे आपण मुलांना देत असलेल्या सामाजिक वातावरणात दडलेली आहेत.

**निष्कर्ष :** रचनावादी शिक्षणपद्धतीसाठी पूरक वातावरण कोणते, असा विचार केला; तर ज्या समाजात मुलांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळते. त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे कौतुक केले जाते, त्यांच्या नवनिर्मितीचा आनंद साजरा केला जातो, जिथे पुढाकार घेऊन काम करायला उद्युक्त केले जाते, ज्या वातावरणात मुलांना मानसिक स्वातंत्र्य अनुभवता येते, चूक-बरोबर डावं-उजवं हा भेद जाणवत नाही. थोडक्यात- जे भौतिक, मानसिक व सामाजिक दृष्ट्या सुरक्षित व अनुभवसंपन्न असेल असे वातावरण दिले; तर प्रत्येक मूल सक्षमपणे व सर्जनशील ज्ञानरचना करू शकेल.

मला वाटते- आज आपण असा निग्रह करून इथून निघू या की, यापुढे आपण आपल्या मुलांसाठी- आपल्या विद्यार्थ्यांसाठी असे वातावरण निर्माण करू, जे रचनावादी शिक्षणाला पूरक असेल; जे आपल्या मुलांना स्वतंत्रपणे त्यांच्या ज्ञानाची रचना करण्याला मदत करेल.

**संदर्भ:**

1. Downshifting of brain http://www.brains.org/
2. Physiology and Brain Science pdf file at https://us.sagepub.com
३. रचनावादी शिक्षण - रमेश पानसे.
४. रचनावादी शिक्षण दोन लेख - रमेश पानसे.
५. शिक्षणवेध अंक - रचनावाद प्रत्यक्षात, सप्टें २०१३ .
६. Child Development - Elizabeth Hurlock.

❒❒

## बालशिक्षण



# मादाम मॉँटेसोरी आणि रचनावादी शिक्षण

मादाम मॉँटेसोरी या शास्त्रशुद्ध बालशिक्षणाच्या प्रणेत्या म्हणून जगभर मान्यता पावलेल्या शिक्षणतज्ज्ञ आहेत. त्यांनी आपल्या शिक्षणपद्धतीत बालस्वातंत्र्य हा मुद्दा आग्रहाने मांडला आहे. हे स्वातंत्र्य म्हणजे आपला आपण स्वतंत्रपणे विचार करून आपल्या बुद्धीचा वापर करणे, निर्णय घेणे व त्याप्रमाणे कृती करणे. यासाठी मुलांना व्यवसायनिवडीचे स्वातंत्र्य मिळायला हवे. त्यांच्या अंत:प्रेरणेने त्यांना जे करावेसे वाटते, ते करू द्यावे. नैसर्गिकरीत्या काही गोष्टी त्यांना शिकायच्या असतात, म्हणूनच स्वप्रयत्नाचे स्वातंत्र्यही द्यायला हवे. सारख्या सूचना न करता मुलांना प्रत्यक्ष अनुभव घेऊ द्या, तर त्यांना खूप आनंद मिळत असतो. याबरोबरच मुलांना विचारांचे स्वातंत्र्य हवे. स्वत: विचार करून निर्णय घ्यायचा असला की परिणामांची जबाबदारी आपोआपच येते. छोट्या-छोट्या समस्यांचे निराकरण केल्याने मुलांची विचारशक्ती वाढीस लागते. मुले हळूहळू स्वावलंबी होतात. त्यांच्यात आत्मविश्वासही निर्माण होतो. पुढे त्या म्हणतात : मुलांना चौकटीबद्ध उपक्रमात अडकवता कामा नये. प्रत्येक बालकात स्वयंस्फूर्ती असते. उदा.- त्याच्या कल्पनेत मोर निळ्या रंगाचा असेल, तर त्याला निळ्या रंगाने रंगवू द्या. स्वयंस्फूर्ती ही बालकाला विकासाकडे नेणारी असते. त्यातूनच स्वयंशिक्षण होते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नसून स्वत:वर घालून घेतलेले बंधन आहे. त्यात स्वयंशिस्त आपोआपच येते.

बालशिक्षण हे बालकेंद्री व्हावे, यासाठी सर्वांत मोठे आणि मूल्यवान योगदान मॉँटेसोरी बाईंचे आहे. बालकाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पोषक वातावरणनिर्मितीवर त्यांनी भर दिला. याबरोबरच व्यक्तिगत शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण याचा त्यांनी पाठपुरावा केला. मॉँटेसोरीबाईंनी आपल्या शिक्षणपद्धतीत शैक्षणिक



## सुरेखा पेंडसे

साधनांवर भर दिला आहे. त्यांनी पंचज्ञानेंद्रियांवर आधारित वैज्ञानिक दृष्टिकोनातून साधननिर्मिती केली. मुलांना मोकळ्या वातावरणात शिकायला, अनुभव घ्यायला मिळाले; तर ते ज्ञानेंद्रियांचा वापरही करतात, स्वत:च अनुभव घेतात आणि स्वत:च ज्ञाननिर्मिती करतात, हे त्यांनी अगदी ठामपणे म्हटले आहे. गणित, भाषा, विज्ञान, मुक्त व्यवसाय, जीवनव्यवहार इ. विषयांची साधने तयार करण्यामध्ये ज्ञानेंद्रिये सक्षम व्हावीत, हाच त्यांचा हेतू होता. रोजचे जीवन जगत असताना उपयोगी पडणारे म्हणून त्यांनी जीवनव्यवहारावर जास्त भर दिला. याबरोबरच बालशिक्षणात बालक्रीडांगणाचे महत्त्वही पटवून दिले आहे. त्यांना बालकांच्या बाबतीत शिक्षा, बक्षिसे, स्पर्धा, परीक्षा या गोष्टी पसंत नव्हत्या. अशा तऱ्हेने मानसशास्त्राच्या आधारे आणि आपल्या शैक्षणिक प्रयोगातून मूलभूत शैक्षणिक परिवर्तनाची वाट त्यांनी जगाला दाखविली.

शिक्षण ही सतत चालणारी नैसर्गिक प्रक्रिया आहे. आपण वेगवेगळे अनुभव रोज घेत असतो. अनुभव मेंदूत साठवले जातात. त्या अनुभवांचा आपण योग्य वेळी वापर करतो. रोज नव्या अनुभवांची त्यात भर पडते. अशा प्रकारे जुन्या व नव्या अनुभवांद्वारे ज्ञानाची रचना होत असते. जुने अनुभव म्हणजे पूर्वज्ञान त्यांच्याशी नव्या ज्ञानाचा म्हणजे अनुभवाचा कार्यकारणसंबंध जोडला जाऊन ज्ञानप्राप्ती होते. काही वेळा ज्ञानात नवी भर पडते, तर काही वेळेला पूर्वज्ञानाच्या आकलनात बदल करावे लागतात. पूर्वज्ञान हे व्यक्तिपरत्वे बदलते. त्यामुळे नवे ज्ञानही व्यक्तीनुसार बदलते. काही काळानंतर नवे ज्ञान हे पूर्वज्ञान होते. म्हणजेच पूर्वज्ञानात सातत्य असते. विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान पडताळून पाहून अनुभवांद्वारे नवी माहिती देणे, ही शिक्षकाची जबाबदारी असते. यामध्ये मुलांची आवड, क्षमता, भाषा यांचाही विचार करावा लागतो.

रचनावादी शिक्षणातला आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. मुले ज्ञानाची रचना स्वत:च करत असतात. त्यामध्ये त्यांची क्षमता, इच्छा यांना महत्त्व

आहे. क्षमतेनुसार अनुभव असतील, तर मुलांना त्यामध्ये गोडी वाटते आणि शिकण्याची इच्छा निर्माण होते. यातून मूल शिकायला तयार होणे गरजेचे आहे. मुलांचे कुतूहल व जिज्ञासावृत्तीचा उपयोग करून, तसेच प्रसन्न वातावरणाचा उपयोग करून मुलांची एकाग्रता वाढवता येते. या वातावरणात अनेक संधी, भरपूर साहित्य व गोष्टी आवश्यक ठरतात. त्यामुळे शिक्षणाचा वेग वाढतो. मुले ज्ञानाची रचना करताना शिक्षिका मुलांबरोबरच असते आणि ज्ञाननिर्मितीत त्याला मदत करते. गटातून खेळतानाही मुले उत्तम ज्ञाननिर्मिती करतात. त्यामध्ये इतर मुलांची त्यांना मदत होत असते. मादाम माँटेसोरी यांच्या शिक्षणपद्धतीत आणि रचनावादी पद्धतीत काही गोष्टींत सारखेपणा आहे. एक तर स्वातंत्र्य हा दोन्ही पद्धतींचा गाभा आहे. त्यामुळे मुले प्रसन्न मनाने शिकतात. त्यांना भावनिक स्थिरता मिळून विकासाकडे वाटचाल होते. मूर्ताकडून अमूर्ताकडे, सोप्याकडून अवघडाकडे, स्थूलाकडून सूक्ष्माकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे हे शिकण्याचे तंत्रही समान आहे. बाईंनी पूर्वज्ञानाचे महत्त्वही लक्षात घेतले आहे. म्हणूनच उदाहरण - त्या म्हणतात : ज्या मुलांना मिश्र रंग जाणून घ्यायचे आहेत, त्यांना मूळ रंग (ज्यापासून मिश्र रंग तयार होतात) पक्के माहीत असले पाहिजेत.

शिक्षण हे अनुभवावर आधारित हवे, हे रचनावादाचे तत्त्व आहे. त्याचप्रमाणे अनुभवांसाठी माँटेसोरींनी विविध विषयांची साधने तयार केली. इंद्रिय- शिक्षणावर त्यांनी भर दिला. फरक एवढाच की, ही साधने खूप महाग असतात. सभोवतालच्या परिसरातून इंद्रिय शिक्षण होऊ शकते. हे रचनावादाने दाखवून दिले आहे. अंगणवाडीताईच्या प्रशिक्षणासाठी जालना जिल्ह्यातील एका खेड्यात गेले होते. 'शाळेच्या आवारात फेरफटका मारून तुम्हाला ज्या वस्तू आवडतील व दिसतील त्या घेऊन या' असे शिक्षिकांना सांगितले होते. सर्वांनी वेगवेगळे दगड, काड्या, बिया, पाने-फुले, बाटल्या, बुचे, बांगड्यांच्या काचा अशा असंख्य वस्तू आणल्या. याचा उपयोग आपल्या कशासाठी करता येईल, ते प्रत्येकीला लिहायला सांगितले. प्रत्येकीचे अनुभव एकत्र केले. त्यातून मोजणी, क्रम, स्पर्श, रंग, वास, आकार, साम्य-भेद, जाड-बारीक, लहान-मोठा, सुशोभन अशा किती तरी संकल्पना मिळाल्या. मुलांना असा अनुभव दिल्यानंतर त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देऊन ती स्वयंशिक्षण घेऊ शकतील, हे शिक्षिकांना पटले.

माँटेसोरीबाईंची गणित विषयाची अंकजिज्ञासे-पासून बेरीज-वजाबाकीपर्यंतची साधने, भाषा, विज्ञान, मुक्त खेळ इ. साधने शिक्षणाला पूरक आहेत. त्यात रचनावादाने आणखी भर घातली आहे. पझल, डॉमिनोज, स्मरणभेदाचे खेळ, एकास एक संगीत- अशी किती तरी उत्तम उदाहरणे सांगता येतील. वाचनपट्ट्या या साधनाने तर किती तरी गोष्टी साध्य होतात.

माँटेसोरीबाईंनी जीवनव्यवहारावर भर दिला आहे; परंतु मला वाटते, चित्रकला व हस्तव्यवसाय यावर त्यांनी कमी भर दिला. रचनावादाने तीही उणीव भरून काढली आहे. शिक्षा, बक्षिसे, दडपण, भीती, स्पर्धा परीक्षा या गोष्टींना दोन्हीही ठिकाणी स्थान नाही. मूल्यमापनावर भर आहे. मात्र क्षमतेनुसार मूल्यमापन व्हावे, हे ज्ञानरचनावाद आग्रहाने सांगते. शिक्षकांची भूमिका ही मार्गदर्शकाचीच आहे. मुलांना शिकवायचे नाही, तर शिकू द्यायचे आहे. यासाठी बालकाला केंद्रस्थानी ठेवून वर्गरचना व वातावरणनिर्मिती त्यांनी करावयाची आहे. अशा पद्धतीने बालवाडीचे नव्हे, तर प्राथमिक शिक्षणही दिले; तर शैक्षणिक परिवर्तन योग्य तऱ्हेने होईल.

माँटेसोरीबाँनी 'शास्त्रीय बालशिक्षण कसे असावे?' याचा आदर्श जगापुढे ठेवला. आता त्याच्याही पुढे जाऊन ज्ञानरचनावादपद्धतीने त्यावर कळस चढविला आहे, हे नक्कीच.

❒❒

## रचनावादी शिक्षणाचा विचार करताना शिक्षणापासून वंचित बालकामगारांची आकडेवारी जाणून घेऊ या.

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने (एनसीपीसीआर) दिलेल्या अहवालानुसार भारतात २०११ मध्ये ५ ते १४ वयोगटातील ८२.२ लाख बाल कामगार होते. जर वयोमर्यादेत १८ वर्षांपर्यंत वाढ केली, तर त्याचे प्रमाण होईल ३.५ कोटी. नागरी सोसायटी संघटनेने हा आकडा ५ कोटींपेक्षा जास्त असू शकतो, असे म्हटले आहे.

### कुठे काम करतात ही लहान मुले?

२१ टक्के बालकामगार पान, विडी आणि सिगारेट उत्पादन करणाऱ्या कारखान्यामध्ये काम करतात.

१७ टक्का मुले बांधकामक्षेत्रात आहेत. त्यातही वीटभट्टीवर काम करणाऱ्या मुलांचे प्रमाण लक्षणीय आहे. संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, ओडिशामध्ये ४१ टक्के लहान मुले वीटभट्टीवर काम करतात.

१५ टक्के मुले ही घरगुती कामे करतात.

११ टक्के मुले हातमाग आणि विणकाम व्यवसायात काम करतात.

### जास्त बाल कामगारांची संख्या

उत्तर प्रदेश १८.५० लाख बिहार ९.१२ लाख महाराष्ट्र ६.३ लाख

### कमी बाल कामगार असलेली राज्ये

गोवा ९,८२२ सिक्कीम ५,९३४ मिझोराम ४,५३१

१. सांख्यिकी विभागाच्या माहितीनुसार, भारतातील ८५ टक्के मुले ही बेकायदारीत्या काम करतात.

२. सन २०१२ च्या सांख्यिकी मंत्रालयाच्या अहवालानुसार, १६.६ टक्के बाल कामगार हे अनुसूचित जातीतील आहेत. तसेच अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गातील अनुक्रमे ११.६ आणि १२.२ टक्के एवढी मुले आहेत.

३. संविधानातील २४ वा अनुच्छेद, कलम २३, २१ अ आणि कलम ४५ नुसार १३ वर्षांखालील बालकांना कारखाने, खाणी किंवा इतर धोक्याच्या कामावर ठेवण्यास बंदी आहे. आंतराष्ट्रीय मजूर संघटनेनेही बालकामगारांचे किमान वय, त्यांची वैद्यकीय तपासणी, रात्रपाळी, व्यवसायिक शिक्षण व शिकाऊ उमेदवारी, कामांचे तास, औद्योगिक सुरक्षा इत्यादींसंबधी शिफारशी केल्या आहेत.

### इतर देशांतील स्थिती

१. बांगलादेश - राष्ट्रीय बालकामगार २००३ च्या सर्वेक्षणानुसार, बांगलादेशमध्ये ३२ लाख बालकामगार असून ते अतिशय हलाखीच्या स्थिती जीवन कंठत आहेत. त्यातही १३ लाख बालके धोकादायक अवस्थेत काम करत आहेत. उत्पादनक्षेत्रात २७.६% आणि शेती आणि व्यापारक्षेत्रात अनुक्रमे २०.१ टक्के, १९.४ टक्के एवढे प्रमाण आहे.

२. पाकिस्तान - १९९६ च्या बालकामगार सर्वेक्षणानुसार ३३ लाख बालके काम करतात. त्यातील ७१% टक्के मुले अकुशल कामगार म्हणून काम करत आहेत.

३. श्रीलंका - २००८-०९ च्या जनगणना अहवालानुसार, १७ लाख मुले कष्टाची कामे करत आहेत. त्यातील ६६.३ टक्के मुले घरगुती, शेती आणि बांधकाम कामगार म्हणून राबतात.

४. नेपाळ - २०११ च्या नेपाळ सरकारच्या केंद्रीय ब्युरोने दिलेल्या आकडेवारीनुसार, १६ लाख बालकामगार आहेत. यातील बहुसंख्य मुले शेती आणि उत्पादनक्षेत्रात काम करतात.

संकलन : हेरंब कुलकर्णी



# फ्रोबेलचे बालशिक्षण

मानवी जीवनविकासात अध्ययन आणि अध्यापनास अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचबरोबर शिक्षणप्रक्रिया ही व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत चालणारी अखंड प्रक्रिया आहे. काळ, स्थळ आणि समुदायानुसार शिक्षणप्रक्रिया ही बदलत असली तरी मानवी जीवनविकासात शैक्षणिक प्रक्रियेचे कार्य अविस्मरणीय आहे. मानवी जीवनाच्या सुरुवातीपासून मानवाने त्याच्या विकसित मेंदूच्या बळावर विविध संकटांना तोंड देऊन आपले जीवन समृद्ध करण्यासाठी अफाट प्रयत्न केले आहेत आणि त्यातूनच स्वअस्तित्व व समाज ही संकल्पना रूढ झाली. समाज, नाती व पिढीवर पिढी यांद्वारे जुन्या अनुभवांचा ठेवा विविध मार्गांनी जतन करण्यात मनुष्यप्राणी यशस्वी होत आहे.

सद्य परिस्थितीचा विचार करून आपल्या अध्ययन-अध्यापनपद्धतीत थोडा बदल अपेक्षित आहे.

**१. प्रास्ताविक :** आधुनिक शिक्षणाचा जनक म्हणून रूसोचा उल्लेख नेहमी केला जातो. फ्रोबेलचा जन्म इ. स. १७८२ मध्ये झाला आणि इ. स. १८५२ मध्ये तो कालवश झाला. इ. स. १८१७ साली एका शेतकऱ्याच्या झोपडीत फ्रोबेलने आपली पहिली शाळा उघडली. रूसोच्या मृत्यूनंतर जवळजवळ ४० वर्षांनी फ्रोबेलच्या शैक्षणिक कामाला सुरुवात झाली. स्वाभाविकच फ्रोबेलच्या शिक्षणविषयक कामाचे मूल्यमापन करताना आपल्याला त्याने तत्कालीन शिक्षणातील कोणते सिद्धांत मान्य केले आणि कोणते नवे सिद्धात प्रतिपादले याचा विचार करावा लागेल. आजच्या शिक्षणात महत्त्व पावलेल्या काही प्रवृत्तींचा पुढाकार फ्रोबेलने केला आणि यातच त्याचे द्रष्टेपण व थोरवी सामावलेली आहे.

**२. फ्रोबेल :**

**व्यक्तिजीवन :** स्वत:ला मिळालेले शिक्षण कसे होते, हे सांगताना त्याने म्हटले आहे की- भूगोलाचा

## संजू चिंतामणी माने

प्रत्यक्ष जीवनाशी काहीच संबंध नसून नकाशावर दिसणाऱ्या विविध रंगीबेरंगी ठिपक्यांचा अथवा चिन्हांचा अर्थ बरोबर सांगता येणे म्हणजे जणू भूगोलाचे अध्ययन! भाषेचे अध्ययन म्हणजे जणू शब्दाची वर्णरचना (spelling) पाठ करणे. शिक्षण कसे असू नये याचा जणू जिवंत अनुभवच त्याने लहानपणी घेतला.

शेवटी वयाच्या २३व्या वर्षी स्वत:च्या जीवनहेतूचा शोध लागला.पेस्टॉलॉजीचे एक शिष्य डॉ. ग्रुनर यांच्या फ्रँकफर्टमधील संस्थेत शिक्षक म्हणून तो दाखल झाला. या शाळेत काम करत असताना मुलांच्या विकासावस्थेशी सुसंवाद साधूनच अध्यापन केले पाहिजे, अशी जाणीव झाल्यानंतर त्याने पेस्टॅालॉजीच्या संस्थेत काही काळ काढला. पेस्टॉलॉजीच्या सहवासाचा आणि त्याच्या संस्थेतील वातावरणाचा फ्रोबेलच्या मानसिक घडणीवर फार परिणाम झाला. क्रीडा, संगीत आणि निसर्गाचे सान्निध्य यांचा बालकाच्या विकासाची साधने म्हणून किती परिणामकारक उपयोग होतो, याचे प्रत्यंतर त्याला याच काळात आले. इ. स.१८१७ मध्ये त्याने स्वत:ची पूर्वप्राथमिक शिक्षणसंस्था स्थापन केली.

**३. फ्रोबेलचे शिक्षणविषयक सिद्धांत**

स्वत:च्या जीवनात जे विविध अनुभव मिळाले, त्यांतून त्याचे शिक्षणविषयक विचार अकुंरित झाले.

**अ) शिक्षण म्हणजे आंतरिक विकास :** शिक्षकाचे काम शिकविण्यापेक्षा मुलाला विकसू देणे होय. नैतिक, बौद्धिक आणि व्यावहारिक शक्तीचे संवर्धन मानवाच्या अंतरंगात झाले पाहिजे. बाह्य कृत्रिम उपायांनी ते होऊ शकणार नाही. बाहेरून मानवाच्या अंतरंगात जास्तीत जास्त काही घालणे, हा शिक्षणाचा हेतू नसून; मानवाच्या अंतरंगातील जास्तीत जास्त बाहेर काढणे, विकसित करणे हा शिक्षणाचा हेतू आहे. विकसनामुळे आकार अथवा संख्या यांची वाढ दर्शविली जात नसून रचनेतील संकीर्णता, शक्ती अथवा कौशल्ये यांबाबतची प्रगती आणि नैसर्गिक कामे पार पाडण्यातील वैविध्य या गोष्टी निर्देशित होतात.

**आ) स्वयंकृती :** बुद्धी, मन, शरीर यांचा विकास त्यांच्या उपयोगातूनच होत असतो. शरीराचा विकास करावयाचा असेल, तर शरीराला व्यायाम दिला पाहिजे. स्वत:ची बुद्धी उपयोगात आणण्यानेच बुद्धीचा विकास होईल. ही गोष्ट स्वयंकृतीच्या मूल्यावरील त्याची श्रद्धा दर्शविते. मात्र बुद्धीची, शरीराला अगर मनाला द्यावयाचा हा ताण अगर करावयाचा हा उपयोग बुद्धीला,

शरीराची आणि मनाची शक्ती ओळखून योग्य वेळी केला गेला पाहिजे. आज्ञा देऊन किंवा माहिती देऊन शिकवायचे नाही, तर अनुभवाद्वारे शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा. पुस्तकापेक्षा कृतीवर भर असावा. फ्रोबेलने तयार केलेली छोटी-छोटी गाणीही स्वयंकृतीतून शिक्षण या मूल्यांवर आधारलेली दिसून येतात.

फ्रोबेल म्हणतात की- माझ्या शिक्षणसंस्थेला नेहमी दिले जाणारे 'शिशुशाळा' हे नाव मी देऊ इच्छित नाही. कारण ती शाळा असणार नाही. या संस्थेत मुलाला 'शिकविले जाणार नाही, त्याच्या मुक्त विकासाला हातभार लावला जाईल.'

**इ) विश्वातील आणि मानवातील एकता :** सर्व विश्वात असलेल्या विविध प्रकारच्या चराचर सृष्टीत एकता आहे आणि म्हणूनच ज्ञानाचेही विभाजन करता येणार नाही. मानवाचा विकास एकसंध आहे. माहितीचे तुकडे म्हणजे ज्ञान नव्हे. माहितीच्या तुकड्यांत एकता प्राप्त होते आणि माणसाची शक्ती, बुद्धी, ज्ञानेंद्रिये इत्यादी जेव्हा काम करतात तेव्हा ज्ञानाचा उदय होतो. त्यातून विश्वातील एकतेचा मानवाला प्रत्यय येतो. ज्ञान म्हणजे आत्मसात केलेली आणि योग्य परस्परसंबंधात मांडलेली माहिती होय. निसर्ग, पुस्तके, विविध कृती यांचा मिलाफ शिक्षणात असला पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती.

**ई) क्रीडेचे महत्त्व :** बाल्यावस्थेत होणारा बराच विकास क्रीडेद्वाराच होत असतो. मानवाच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासात क्रीडेला फार मोठे स्थान असल्यामुळे बालकाच्या विकासासाठी क्रीडेचा पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे. क्रीडेद्वारा मूल त्याच्या विविध अवयवांचा उपयोग करण्यास शिकते आणि त्यातूनच त्याला आरोग्याची प्राप्ती होते. सभोवताली असणाऱ्या विविध वस्तूंचे आकारमान, गती, रंग इत्यादींची जाणीव त्याला विविध खेळांद्वारे होऊ शकते. समाजाच्या काही नियमांचे अनुपालन केले पाहिजे ही जाणीवही क्रीडेद्वारे बालकात निर्माण होते. मुलांच्या बौद्धिक विकासासही क्रीडा फार उपकारक ठरू शकते.

**४.बालोद्यान पद्धती : (किंडर गार्टन)**

किण्डर गार्टन हा जर्मन शब्द असून त्यात किंडर म्हणजे बालक व गार्टन म्हणजे गार्डन किंवा बाग होय. थोडक्यात, किंडर गार्टन म्हणजे बालोद्यान. बालके म्हणजे उद्यानातील नाजूक रोपटी आणि शिक्षक म्हणजे या रोपट्याची जोपासना करणारा माळी, तर शिक्षण म्हणजे बालकाचा सर्वांगीण विकास. रोपट्याचे संवर्धन व्हावे म्हणून माळी योग्य ते वातावरण निर्माण करतो. त्याप्रमाणे बालोद्यानपद्धतीच्या शाळेतील शिक्षकाने बालकांचा शारीरिक, मानसिक व नैतिक विकास होण्यासाठी योग्य ते वातावरण निर्माण करावयास पाहिजे. प्रत्येक बालक म्हणजे ईश्वराचा अंश आहे. प्रत्येक बालक क्षणाक्षणाला विकसित होत असते. बालकाच्या अंगी असलेल्या दैवीशक्तीचा विकास करण्यासाठी शिक्षकाने मुलांना प्रेमाने वागविले पाहिजे त्यांना मोकळेपणाने खेळू दिले पाहिजे, त्यांच्या विविध कृतींना सहानुभूतीपूर्वक मार्गदर्शन केले पाहिजे; आणि हे मार्गदर्शन स्त्रियांनीच करणे उचित ठरेल. बालकाच्या इंद्रियांचा विकास होण्यासाठी निरनिराळी मनोरंजक साधने पुरविली पाहिजेत.

**अ) हालचाल, हावभाव आणि संगीत :**

स्वयंकृतीतून आत्माविष्कार या फ्रोबेलच्या सिद्धांतामुळे बालोद्यानपद्धतीत बालकांची हालचाल आणि हावभाव यांना महत्त्व प्राप्त झाले. विविध भावनांच्या आविष्कारासाठी मूल नैसर्गिकरीत्याच हालचाल व हावभाव करित असते. हालचालींना व हावभावांना काही नादांची जोडही मूल देत असते. मुलांच्या नैसर्गिक जीवनाशी अध्यापनपद्धतीचा जास्तीत जास्त सुमेळ साधला पाहिजे.

मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वाभाविक विकासासाठी हालचाल व हावभावयुक्त गाणी अतिशय मोलाची आहेत.

**आ) देणग्या :** बालोद्यानपद्धतीच्या साधनांची-

फ्रोबेलने देणग्याची (gift) रचना केली. देणग्या या ठरावीक आकाराच्या वस्तू असून त्याचे आकार न बदलता त्यांची विरचना करावयाची असते. पहिली देणगी म्हणजे सहा निरनिराळ्या रंगांचे लोकरी चेंडू असलेली पेटी. यामुळे रंग, रूप, चलन, दिशा व स्नायूंची संवेदनशक्ती यासंबंधीच्या ज्ञानाचा विकास होतो. दुसऱ्या देणगीत एक लाकडी गोल, घन व दंडगोल असतात. यामुळे गोलाचे चलनशीलत्व, घनाचे स्थितिशीलत्व व दंडगोलाचे उभयशीलत्व यांचे ज्ञान होते. तिसरी देणगी म्हणजे एक मोठा चौकोनी घन व त्याचे आठ समान तुकडे. तिसऱ्या देणगीतून टेबल, खुर्ची, जिना असे आकार बनविता येतात. अशा तऱ्हेने फ्रोबेलच्या पद्धतीत नऊ देणग्या आहेत. प्रत्येक देणगीला खेळ आहे. त्यातून स्नायूंना व ज्ञानेंद्रियांना वळण लागते.

**इ) व्यवसाय :** मुले कृतिशील असतात. त्यांना हाताने सारखे काही तरी करावेसे वाटते. मुलांना आपले हात पद्धतशीर वापरून हातांच्या स्नायूचे चलनवलन साध्य करावे. यासाठी मुलांना विविध क्रिया करावयास देतात. व्यवसायातून आकार घडविणे, बदलणे, नीट करणे यातून अभिरुचीचा परिपोष होऊ शकतो. व्यवसायासाठी कागद, माती, लाकूड, पुठ्ठा इत्यादी साहित्य सुचविले आहे. यातून वेगवेगळ्या रचना करावयाच्या आहेत. कागद, माती, पुठ्ठा यांच्या वस्तू तयार करणे, चित्र काढणे, भरतकाम इत्यादी व्यवसाय फ्रोबेलने सुचविले आहेत. शिक्षिकेचे काम फक्त निरीक्षण करीत राहून मार्गदर्शन करावयाचे; मुलांना मारावयाचे नाही, मुलांवर रागवायचे नाही. त्यांच्या कलेप्रमाणे घेऊन त्यांना व्यवसाय करावयास लावणे, निरनिराळ्या देणग्या व्यवस्थित हाताळणे, मुलांनी मारामारी किंवा भांडण न करणे, खेळ-गाणी-गोष्टी इत्यादींमध्ये वर्गाची शिस्त पाळून सहकार्य करणे वगैरे गोष्टींकडे लक्ष द्यावयास पाहिजे. याशिवाय शिक्षिकेचे काम म्हणजे, मुलांची शारीरिक स्वच्छता व कपड्यांचा नीटनेटकेपणा याकडे पाहावयाचे. मुलांच्या विविध स्नायूंना व ज्ञानेंद्रियांना योग्य वळण लावून त्यांचा विकास होणे, मुलांची सर्जनशीलता जागृत होणे आणि त्यांच्या बुद्धिमत्ता, कल्पकता इत्यादी शक्तींचा विकास होणे- असे अनेकविध हेतू व्यवसायांद्वारे साधले जावेत.

**ई) बालोद्यान पद्धतीतील अभ्यासक्रम :** निसर्गाचा अभ्यास, शारीरिक श्रम व व्यवसाय, भाषा आणि गणित, चित्रकला, नैतिक शिक्षण असा सर्वसाधारण अभ्यासक्रम आहे. गोष्टी, कविता व गाणी यांच्या द्वारे भाषेतील विविध शब्दांचा परिचय मुलांना करून देण्यात येतो. विविध शब्दांच्या प्रतिमा मुलांच्या मनावर ठसाव्यात म्हणून चित्रे पाहणे व गोष्टी ऐकणे या साधनांचा उपयोग केला जात असे. निरीक्षण, श्रवण, भाषण आणि लेखन असा भाषा शिक्षणाचा क्रम फ्रोबेलने सांगितला. देणग्या व व्यवसाय यांचा वापर करत असता, मुले गाणीही म्हणत शिकतात. पशुपालनसारख्या व्यवसायातून त्यांना विज्ञानविषयक बरीच माहिती मिळते. गाणी म्हणत अप्रत्यक्षरीत्या त्यांच्या भाषेचा विकास होतोच, त्याचबरोबर संगीताची



तोंडओळख होण्यासही मदत होते. शिक्षिकेकडून सांगितल्या जाणाऱ्या धार्मिक, ऐतिहासिक व अद्‌भुतरम्य कथा आणि शाळेत म्हटली जाणारी प्रार्थना यांच्यामुळेही मुलांवर सद्‌वृत्तीचे संस्कार होत असत.

**उ) बालोद्यानात शिक्षिकेचे स्थान :** या पद्धतीत शिक्षिकेला फार महत्त्वाचे स्थान आहे. मुलांचा विकास योग्य प्रकारे व्हावा म्हणून त्याला विविध साहित्यांचा व व्यवसायांचा वापर करावयास लावणे, गाणी म्हणवून घेणे, विविध वस्तू तयार करण्यास प्रवृत्त करणे, गोष्टी सांगणे असा पुढाकार शिक्षिकेला घ्यावा लागतो. त्यांच्या खेळात, व्यवसायात व गाण्यात सहभागी व्हावे लागते.

**५) फ्रोबेलची शिक्षणविषयक कामगिरी :**

**अ) शाळा- एक उद्यान :** फ्रोबेल हा पेस्टॉलॉजीचा शिष्य असल्यामुळे गुरूच्या शिशुशिक्षणाविषयीच्या कल्पना अधिक स्पष्ट करून त्यांना विशिष्ट योजनेचे स्वरूप त्याने दिले. शिक्षणाच्या इतिहासात बालोद्यान पद्धती हा एक मोठा वैचारिक टप्पा आहे. बालकाला विकासाकडे न ढकलता त्याला विकासाभिमुख बनविणे, विशिष्ट साच्यात मुलाला न कोंबता त्याच्या विकासाला योग्य ते मार्गदर्शन करणे- हा शिक्षणाचा हेतू असल्याचा नवा विचार ही शैक्षणिक जगताला फ्रोबेलने दिलेली एक मोठी देणगी आहे. स्वत:च्या शिक्षणसंस्थेला शाळा न म्हणता त्याने उद्यान म्हटले आहे. यावरून त्याची शिक्षणविषयक कल्पना स्पष्ट होते.

**आ) त्रिविध शिक्षण :** व्यक्तीचा विकास हा त्रिविध म्हणजे बौद्धिक, मानसिक व शारीरिक असा असतो आणि अशा विकासास संधी देणे, हेच शिक्षणाचे काम आहे. हा विचार फ्रोबेलने प्रकर्षाने पुढे मांडला. या तीन प्रकारच्या विकासात तटबंदीच्या भिंती नाहीत; उलट तो विकास एकात्मरीतीने होणे आवश्यक आहे. या धारणेला मान्यता मिळविण्यात फ्रोबेलचे काम फार महत्त्वाचे ठरते.

**इ) कृतीद्वारा विकास :** ज्यांचा विकास व्हावयाचा आहे, तो विकसनाच्या प्रक्रियेत कृतिशील घटक असल्याशिवाय विकास संभवत नाही. आणि म्हणून कृतिद्वारा शिक्षण देण्याचा प्रयत्न असला पाहिजे.

**ई) शिक्षणात ज्ञानेंद्रियांना महत्त्व :** ज्ञानाचा विकास होण्यासाठी ज्ञानेंद्रियांचा वापर झाला पाहिजे, तरच माहितीचे ज्ञानात रूपांतर होईल, याचा प्रत्यय फ्रोबेलच्या कामाने शिक्षणक्षेत्रातील मंडळींना मिळाला.

**उ) क्रीडा हे आत्माविष्काराचे एक साधन :** क्रीडा हे आत्माविष्काराचे एक महत्त्वाचे व उपयुक्त साधन असल्यामुळे शिक्षणात त्यांचा अंतर्भाव हेतुत: केला पाहिजे, या विचाराचे जणू प्रात्यक्षिकच फ्रोबेलने आपल्या बालोद्यानाद्वारा दिले.

**उ) शिशुशिक्षणास महत्त्व :** तत्कालीन ज्ञानकेंद्रित व शिक्षककेंद्रित शैक्षणिक जगात फ्रोबेलने बालकांच्या विकासासाठी त्यांना अनुकूल अशा शिक्षणपद्धतीची आवश्यकता आहे, हे आवर्जून सांगितले आहे. शिशुअवस्था ही मानवाच्या विकासाची एक महत्त्वाची अवस्था आहे, याकडेही त्याने विचारवंतांचे लक्ष वेधले.

**६) बालोद्यानपद्धतीच्या मर्यादा :**

**अ) शिक्षककेंद्री पद्धत :** या पद्धतीत शिक्षकाला फार महत्त्वाचे स्थान असल्यामुळे मुलांनी काय करावयाचे, हे शिक्षकच ठरवतात. त्यामुळे मुलांच्या आत्माविष्काराला, स्वयंशिक्षणाला पुरेसा वाव मिळत नाही; ही बालोद्यानपद्धतीची एक मर्यादा आहे.

आ) फ्रोबेलच्या विविध देणग्यांचा वापर करताना मुलांना जीवनविषयक काही सत्ये प्रतीत होतील, हा विचार बाल्यावस्थेत असलेल्या मुलांच्या बाबतीत अतिरंजित वाटतो.

इ) विशिष्ट देणग्यांचा विशिष्ट क्रमाने वापर झाला पाहिजे, ही कल्पना साचेबद्ध वाटते.

फ्रोबेलच्या बालशिक्षणाचा विचार केला तर असे दिसून येईल की- बालशिक्षण हे कृतिद्वारे शिक्षण व

स्वयंकृतीतून शिक्षण कसे दिले पाहिजे, हे त्यांच्या शिक्षणपद्धतीतून दिसून येते. म्हणून ३ ते ६ या वयोगटातील मुलांना आज कोणत्या प्रकारे शिक्षण दिले गेले पाहिजे किंवा त्याची गरज काय आहे, ही समस्या लक्षात घेऊन लहानपणापासूनच विविध संबोध किंवा संकल्पना त्यांच्या कृतीतून स्पष्ट झाल्या; तर त्यांचे अध्ययन चांगल्या प्रकारे होईल किंवा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. म्हणून लहान मुलांना त्यांच्या वयोगटानुसार योग्य प्रकारे अध्ययन-अनुभव देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचे बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत होईल.

मुलांच्या बौद्धिक, मानसिक, शारीरिक व इतर क्षमता वाढवण्याच्या दृष्टिकोनातून नव्या युक्त्याप्रयुक्त्या, कल्पना, कृती सादर करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक शाळा आपापल्या परीने प्रयत्नशील आहेत.

**१. वर्ष ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या गणवेशामध्ये मुळाक्षरे व संख्या दर्शवणारी छापलेली अक्षरे तयार करणे.**

आजच्या घडीला नवा अध्ययन-अनुभव देण्यासाठी अंगणवाडी व बालवाडीमध्ये काही नावीन्यपूर्ण कृतींची आवश्यकता आहे. म्हणून शाळेच्या गणवेशाद्वारे शिक्षण देण्यासाठी मुळाक्षरे व संख्या छापलेला गणवेशच तयार केला, तर त्यांचे अध्ययन सुलभ होण्यास मदत होईल. गणवेशाची रचना अशी असावी की, गणवेशाच्या मागे व पुढे एक-एक अक्षर व संख्या छापलेली असावी. वेगवेगळ्या रंगीत कलर पँटची रचनाही अशी असावी.

अशी रचना केली, तर मुलांची अध्ययनाबरोबर आकलनक्षमताही वाढेल. अक्षर व संख्या यांची जुळवा-जुळवी करता येईल. अक्षरांची ओळख होईल, अक्षरांची अदलाबदल करता येईल, अक्षरांचा क्रम लावता येईल; तसेच अंकांची त्याचपद्धतीने करता येईल. मुलांच्या डोळ्यांसमोर अक्षर व संख्या सतत असल्यामुळे त्यांचे अध्ययन चांगल्या पद्धतीने होण्यास मदत होईल.

२. लहान मुलांच्या हालचाली व हावभाव मुक्त असतात, म्हणून या गटातील मुलांना मूलभूत हालचालींचा सराव देऊन, अक्षर व संख्या यांचाही वापर करून विविध खेळही घेता येतात. अशा प्रकारचे उपक्रम शाळेत घेत असतील, तर त्यात सातत्यपणा असावा म्हणजे त्यांचे विस्मरण होणार नाही. त्यांचे जेणेकरून दृढीकरण करण्याचा प्रयत्न करावा.

शिक्षण म्हणजे आंतरिक विकासाची प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेत बुद्धी, मन आणि शरीर या तिन्ही घटकांचा विचार झाला पाहिजे. शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतीला अतिशय महत्त्व आहे. शिक्षणात क्रीडेलाही महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. जे विचार फ्रोबेलने आग्रहाने प्रतिपादले, त्यांचा परिणाम आज केवळ बालकांच्या शाळांवरच दिसतो असे नव्हे; तर प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावरही त्यांचा खोल ठसा उमटलेला दिसून येतो.

फ्रोबेलच्या बालशिक्षणात शिक्षिकेला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच आजच्या बालशिक्षणातही आहे. पण आजच्या शिक्षिकेने मार्गदर्शनाचे कार्य करावे, तसेच व्यक्तिमत्त्व उत्साही असावेत. मुळाक्षरे व संख्या दर्शवणाऱ्या गणवेशामुळे अक्षर-ओळख व संख्याज्ञान होण्यास मदत होईल, अक्षरे व संख्या सतत समोर असल्यामुळे अध्ययन व आकलन चांगल्या पद्धतीने होण्यास मदत होईल. अक्षर व संख्या यांचा वापर करून विविध खेळ घेता येतील. शिक्षणप्रक्रिया ही स्थल-कालाप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. शिक्षण उपक्रमात ज्ञानसंपादनाच्या प्रक्रियेत निसर्ग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. नैतिक, बौद्धिक आणि व्यावहारिक शक्तीचे संवर्धन मानवाच्या अंतरंगातच झाले पाहिजे. अध्यापनात पुस्तकावर भर देण्यापेक्षा कृतीवर देणे आवश्यक आहे. बाल्यावस्थेतील सकारात्मक विकासात क्रीडेची भूमिकाही महत्त्वाची आहे. किंडर गार्डन ही शिक्षणव्यवस्थेची पहिली पायरी आहे. या वयोगटामध्ये लेखनक्षमता आली नाही तरी चालेल, लेखनकौशल्य नंतर आपोआप सुधारेल.

❑❑

विचार

# भारतीय बालशिक्षणपद्धती व रचनावाद

भारतीय बालशिक्षणाचे आद्य प्रणेते श्री. गिरिजाशंकर बधेका म्हणजेच गिजुभाई बधेका यांनी बालशिक्षणाची चळवळ सुरू केली. मादाम माँटेसोरीबाईंना तत्त्वांचा स्वीकार करून त्यामध्ये स्वत:ला हवे असतील, योग्य असतील असे बदल करून बालशिक्षणाची सुरुवात केली. त्यांच्या या कार्यात ताराबाई मोडक सहभागी झाल्या व बालशिक्षणाला सुरुवात झाली. त्या वेळच्या परिस्थितीनुसार भारतीय बालशिक्षणाचे १) प्राचीन / नैसर्गिक बालशिक्षण, २) आधुनिक बालशिक्षण असे भाग पाडून त्याचे विवेचन आणि या दोन्ही पद्धतींत रचनावादाची भूमिका स्पष्ट करणे सोईचे होईल.

**१) प्राचीन/ नैसर्गिक बालशिक्षण :** पूर्वीच्या काळी बालशिक्षण म्हणजे काय, हेच लोकांना माहिती नसल्याने त्या काळात या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्या बालकांकडेही दुर्लक्षच झालेले दिसून येते. मागासलेपणा, अशिक्षितपणा यामुळे बालशिक्षण दुर्लक्षित राहिले असावे. अशा बिकट परिस्थितीतही बालशिक्षणाची धुरा उंचावली ती ताराबाई मोडक यांनी लोकांच्या विचारातील मागासलेपण दूर करण्यासाठी त्या घरोघरी जाऊन पालकांचं प्रबोधन करू लागल्या. शिक्षणाविषयी त्यांच्या मनात आत्मीयता जागृत करू लागल्या. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि पूर्व-बाल्यावस्थेत असणाऱ्या मुलांची पहिली बालवाडी सुरू झाली. बालवाडीत येताना मुलांची तक्रार होऊ लागली, तर त्यांना बालवाडीत आमच्यासाठी पाना-फुलांनी सजलेली बैलगाडी तयार केली आणि या बैलगाडीतून

## प्रज्ञा करंदीकर

मुलं बालवाडीत हसत-हसत येऊ लागली.

**बालवाडी :** बालवाडी म्हणजे वस्तीपासून थोडंसं लांब असणाऱ्या एका मोठ्या झाडाखाली भरणारी ती बालवाडी. निसर्गाच्या सान्निध्यात, खुल्या वातावरणात मुलाचं शिक्षण होऊ लागलं त्या वेळी शैक्षणिक साधने घेता येतील अशी परिस्थितीच नसायची; तेव्हा मग कृतीतून शिक्षण देणं चालू होतं. स्वच्छ झाडलेल्या जमिनीवर मातीत मुलांनी हाताने, बोटाने, काड्यांचा उपयोग करून रेखाटन करायचे. चित्र रेखाटायची, रचना तयार करायच्या. पूर्वी गणितीय शिक्षणच प्रथम दिलं जात होतं, कारण ते मुलांना समजणं सोपं होतं. त्यासाठी खडे, दगड-गोटे, गवताच्या काड्या, समोर दिसणारी नैसर्गिक चित्र, झाडांची पाने-फुले या साधनांचा उपयोग होत असे. उदा.- जमिनीवर काड्यांच्या साहाय्याने तीन चौकोन आखून त्यामध्ये एखाद्या अंकाइतके दगड ठेवले, तर उरलेल्या दोन चौकोनांत मूळ तेवढ्याच वस्तू आणून ठेवत.

सूर्यामुळे प्रकाश मिळतो, हे त्यांना विज्ञान-शिक्षणात शिकविताना दिवसा जमिनीचं तापणं, रात्री पुन्हा थंड होणं हे त्या बालकांनी अनुभवल्यामुळे निसर्गचक्राचा अधिपती सूर्य आहे, हे वेगळं सांगण्याची गरज नसायची. पाऊसाचे पडणे, ढगांचे गडगडणे विजांचे चमकणे हे प्रत्यक्ष अनुभवातून आलेले, म्हटले तर भाषेचे व म्हटले विज्ञानाचे शिक्षण दिले जात होते.

छोट्या-छोट्या बडबडगीतांतून, गोष्टींतून भाषेचे शिक्षण दिले जात होते. मातीपासून विविध वस्तू बनवायच्या, बियांचा-पानांचा वापर करून रचनाकृती करून त्याला नाव देणे, त्याच्यासारख्याच इतर वस्तूंची नावे सांगणे, घरातील इतर सदस्यांची नावे सांगणे, नाते सांगणे- जसे आजी-आजोबा, दादा, ताई इ.

झाडावरून इकडे-तिकडे बागडणारे पक्षी बघून त्यांची नावे सांगणे, झाडांचा-फळांचा-प्राण्यांचा परिचय देणे, प्राणी-पक्षी यांच्याप्रमाणे कृतियुक्त हालचाली करून दाखविणे; त्याबरोबरच स्वत:चे नाव सांगणे- या सर्वांतून त्यांचा भाषाविकास अत्यंत चांगल्या प्रकारे होत होता.




सर्वच मुलांना खेळणे, बागडणे आवडते. कारक-कृतियुक्त हालचाली करणे आवडते. रचनावादात याच क्रियांना मूर्त स्वरूपाचे शिक्षण देणाऱ्या क्रिया म्हटले जाते.

दोन्ही पायांवर उडी मारणे, धावणे, लंगडी घालणे, संस्थाप्रमाणे, उड्या मारणे, हाताने मासा पोहतो त्याप्रमाणे हात हलवणे, पाच बोटांनी दगड उचलणे, दोन बोटांच्या साहाय्याने पान तोडणे, वाकून जमीन साफ करणे, सारवणे या कारक हालचालींमुळे मुलाच्या स्नायूंच्या योग्य हालचाली होऊन शारीरिक विकास निकोप होत असे.

त्या काळीही मनोरंजनासाठी आपल्याच घरातील-वस्तीतील एखाद्या व्यक्तीची नक्कल करून दाखविणे, प्राण्यांच्या हुबेहूब नकला करणे. उदा. माकडाच्या नकला करताना झाडावर चढणे, हूपऽ हूपऽ आवाज करत हाताने अंग खाजवणे. बोलीभाषेतील मोडकळीस आलेली गाणी म्हणणे- यातून त्यांचे मनोरंजन होत असे.

सण-उत्सव त्या वेळी अगदी साध्या पद्धतीने साजरे केले जात होते, तरीही त्यांची माहिती मुलांना सण साजरा करून दिली जात असे.

बालशिक्षणाच्या पाचही तत्त्वांचा वापर त्या काळच्या शिक्षणात पुरेपूर होताना दिसत होता.

जी मुलं शाळेत येऊ शकत नव्हती, अशा आदिवासी पाड्यातील मुलांना शिकविण्यासाठी त्यांच्या अंगणातच जाऊन शिक्षण दिले जात होते. आदिवासी पाडे हे अत्यंत मागासलेल्या अवस्थेत असल्यामुळे तेथील मुलांना सुरुवातीपासूनचे- म्हणजे बसणे, उठणे, खाणं-पिणं-पासून शिक्षणाची सुरुवात केली जायची. त्यासाठी स्वतंत्र विकासवाडी नावाचं बालमंदिर त्या काळी अस्तित्वात होते.

छोट्या-छोट्या गावामधली मुलं (शाळेत) बालघरात येऊ शकत नव्हती, त्या वेळेत ती गुरांना चारण्यासाठी कुरणात घेऊन जात असत. त्या मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी कुरणशाळांचा उदय झाला. कुरणावर गुरांसोबत येतानाही मुलं दप्तरांचं ओझं वाहायची नाहीत, तर भाकरी बांधलेलं एक गाठोडं घेऊन ती जायची. अशा मुलांना शिकवणं फार मोठं आव्हानात्मक काम होतं; पण त्याही परिस्थितीत शिक्षण होत गेलं. गुरांना चरायला सोडून गाणी, गोष्टी, गप्पा, खेळ, नकला, नाटुकली इ. प्राथमिक शिक्षण दिलं जात होतं. त्यानंतर बकऱ्या ओळीने उभ्या असल्या तर-

अमुक रंगाच्या बकरीचा नंबर कितवा? बकऱ्या विखुरल्या गेल्या तर- तिकडे गेलेल्या बकऱ्या व इकडे राहिलेल्या बकऱ्या मिळून एकूण किती? मुलांनाच रांगेत उभे करून त्यांच्या सावल्या मोजणे. दाम्याची सावली कितवी? वेगवेगळ्या सावल्या कुठे पडतात? कोणत्या बाजूला पडतात? अशा प्रश्नांमधून विज्ञान-गणिताचे शिक्षण दिले जात होते.

मुलांमध्ये जन्मत:च सुप्त शक्ती असतात, स्वत:च्या विकास ते स्वत:च करू शकतात. त्यासाठी केवळ त्या पद्धतीचे वातावरण त्यांना पुरवावे लागते. पूर्वी बालशिक्षणात स्पर्धा नव्हती, बालमंदिरात स्पर्धा नव्हती, मुलांमध्ये स्पर्धा नव्हती; त्यामुळे मुलांना निखळ शिक्षणाचा आनंद घेता येत होता. या प्राचीन/ नैसर्गिक बालशिक्षणाचे फायदे म्हणजे मुलांमध्ये शिक्षणाची विलक्षण आवड निर्माण झाली. मुलांमध्ये असणाऱ्या जिज्ञासू वृत्तीला, कल्पनाशक्तीला वाव मिळत असल्याने त्यांचा बौद्धिक विकास त्याच निखळतेने व वेगाने होत होता. स्वयं शिक्षणामुळे मुलांमध्ये शिक्षणाची रुची निर्माण होऊ लागली. मुलं स्वत: शिकण्याचा प्रयत्न करू लागली. बालघरात कोणतीही बंधनकारक शिक्षणपद्धती नसल्याने शिक्षा, चूक-बरोबर अशा निराशात्मक संकल्पना नव्हत्या.

प्रत्येक मूल प्रत्येक गोष्टीकडे त्याच्या नजरेतून बघत असते, त्याप्रमाणे विचार करून आपले मत व्यक्त करत असते. त्यामुळे एकाच गोष्टीकडे पाहण्याची वा त्याबद्दलचे प्रत्येकाचे मत वेगवेगळे असणार, हे समजून घेऊनच शिक्षिकेने त्यांची मार्गदर्शकाची भूमिका साकारायची असते.

आदिवासी पाड्यांमध्ये भिंतींवर रेखाटलेली चित्रेही बालशिक्षणाचं एक उत्तम उदाहरण म्हणून सांगता येतील. तेथील मुलं घरांच्या भिंतींवर शिकारची, नृत्य करणारी, प्राण्यांची, आवडत्या पक्ष्यांची अशी विविध चित्रं काडीच्या साहाय्याने रेखाटतात.

आट्यापाट्या, गलोल चालविणे, दगडाची लगोर फोडणे, वस्तू जमविणे, विविध रंगी पानांचे-फुलांचे संकलन करणे, त्यातून रंग - आकार यांचे ज्ञान मिळविणे - हासुद्धा रचनावादी बालशिक्षणाचा फायदाच म्हणावा लागेल.

गवताच्या काड्यांचा वापर करून पक्ष्यांचं घरटं किंवा खोपा बनविणे, त्याचं निरीक्षण करणे, चर्चात्मक विश्लेषण करणे - या सर्वांतून हस्तकला, विज्ञानाधिष्ठित अध्ययनाकडे मुलांचा कल वाढीस लागला.

या सर्व शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम शिक्षणही त्या काळी दिले जात होते. प्राचीन बालशिक्षणपद्धतीही सर्वार्थाने नैसर्गिक रचनावादावर अवलंबून होती, ज्यामुळे अधिकाधिक प्रमाणावर मूर्त स्वरूपाचे चिरकाल टिकणारे बालशिक्षण दिले गेले. एकविसावे शतक उदयास आले आणि या बालशिक्षणाचे व रचनावादाचे स्वरूपच पालटले. पारंपरिकता निघून गेली आणि त्याची जागा आधुनिकतेने घेतली. काळाबरोबर चालण्यातच शहाणपण असते, अशी वैचारिकता असणाऱ्या आपण सर्वांनीच आधुनिकतेचा स्वीकार केला. काळ पालटला, विचार बदलले, रहाणीमान बदलले आणि ओघाने बालशिक्षणातही बदल घडून आले. ते इतके की, बालशिक्षणातील बाल हरवला व शिक्षण फक्त राहिले. अशी आधुनिक बालशिक्षणप्रणाली अस्तित्वात आली.

**आधुनिक बालशिक्षण व रचनावाद :** खरे तर २० व्या शतकापासूनच आधुनिकतेचा स्वीकार केला गेला. एकविसाव्या शतकापर्यंत आपण अगदी १००% आधुनिक बनलो. त्यातून शिक्षणप्रणाली कशी सुटणार? एकूणच शिक्षणपद्धतीत वेगवेगळे कायदेनियम येऊ लागले. त्याच नियमावलीत विविधांगी अनेक उपक्रम शाळांमधून राबविले जाऊ लागले. त्यामुळे आजची शिक्षणपद्धती ही सुधारणावादी शिक्षणपद्धती आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

आजच्या आधुनिक युगात सुखवस्तू अशी अनेक भौतिक साधने सहजगत्या उपलब्ध होताहेत. त्यांचा

अतिरेकी वापर हा सर्वच मानवी जीवनावर- विशेषत: मुलांच्या बालमनावर विपरीत परिणाम करणारा आहे. उदा.- टीव्ही, मोबाईल, व्हिडिओ गेम्स, महागडी खेळणी.

या सर्वांचा बालमनावरील परिणाम म्हणजे पूर्वी निखळ, निरागस अशी मुलांची मनं राहिली नाहीत. स्थिरता गमावून त्यांच्यामध्ये चंचलता येऊ लागली. सतत झोपाळू असणं, आळस येणं, राग-द्वेष या स्वभावातील बदलांशी मुलं झगडू लागली आहेत. असो.

शिक्षणप्रणालीत बदल झाले. बालशिक्षण-पद्धतीत बदल झाले, म्हणजेच बालवाडीत बदल झाले. आताची बालवाडी चार भिंतींत बंद झाली, मोकळ्या शिक्षणाऐवजी बंधनांनी-नियमांनी जखडलेले शिक्षण दिले जात. बसायला बाक, पाट, युनिफॉर्म, गळ्याला टाय, शूज-सॉक्स या सगळ्यात जखडलेल्या मुलांना मोकळा श्‍वास घेणेसुद्धा मुश्किल होऊन बसलंय. वरून पुन्हा दप्तराचं, अभ्यासाचं ओझं आहेच.

बालशिक्षणातील आनंददायी रचनावाद आताशा वर्तनवादी रचनावाद होऊन बसला आहे. पूर्वीसारखी नैसर्गिक साधनं आता सुधारित आवृत्तीत पाहायला मिळतात. आता भाषा पुस्तकांच्या आधाराने शिकविली जाते. त्यासाठी तयार अक्षरपाट्या, शब्दवह्या वापरल्या जातात.

गणित शिकविताना फळा व खडूचा वापर शिक्षिकेने करायचा, तर पाटी व पेन्सिलचा वापर मुलांनी करायचा. इथे ना कुरणशाळा आहे, ना बकऱ्या, ना तो आनंद; इथे आहे फक्त शिक्षण. गोळे मांडून बेरीज-वजाबाकी करायची, ती देखील शिक्षिकेने सांगितलेल्या पद्धतीनेच. मुलांना स्वत: शिकण्याचं स्वातंत्र्य नाही. वार्षिक अभ्यासक्रमाच्या नियोजनात पूर्वबाल्यावस्था अडकून पडली आहे. गप्पागोष्टी नाहीत, निसर्गाशी नातं नाही, मुक्त वावर नाही. परंपरागत प्राचीन बालशिक्षणात व आताच्या आधुनिक बालशिक्षणात ही फार मोठी तफावत दिसून येते.

आताचे हे विज्ञानयुग आहे, संगणकाचे युग आहे आणि या युगात टिकायचे असेल, तर स्पर्धेत धावलं पाहिजे. त्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान शाळामध्ये राबविण्यासाठी शाळा तत्पर असतात. खडे, दगड-गोटे मोजून अंक शिकविणे यापेक्षा अंकांच्या पाट्या उपलब्ध झाल्या. मण्यांची माळ मोजायला मिळाली. खोटे पक्षी, खोटे प्राणी हातात धरून त्यांचा अभ्यास करता येऊ लागला आहे. फळे, फुले, भाज्या यांचे कटआऊट्स उपलब्ध असल्याने शिकवणं सोईचं झालं.

कारक हालचालींसाठी विविध साधनं बालमंदिरात असतात. उदा.- मनोरा. गुलाबी ठोकळ्यांचा मनोरा असतो. गोल रंगीबेरंगी रिंगचा मनोरा असतो, त्रिकोणी ब्लेट्सचा मनोरा असतो. यांसारख्या आकर्षक साधनांमुळे मुले वेगवेगळ्या पद्धतीने विचार करू लागली- रंग, आकार, लहान मोठेपणा, एकाच वेळी त्रिपद शिक्षणाचा आनंद मुलांना घेता येतो आहे.

खेळ खेळताना शिक्षिकेने शिकविलेले नियमबद्ध खेळ प्रथम खेळले जातात. त्यानंतर बालमंदिरात बाग असेल, तर तिथे खेळण्यासाठी मुलं धावतात. ते त्यांचं मोकळं जग असतें. बालमंदिरात असो अगर घरी असो-मुलांसाठीचा अतिदक्षता विभाग सर्वत्र पाहायला मिळतो. उडी मारू नकोस- पडशील, मातीत खेळू नकोस- हात-कपडे मळतात वगैरे वगैरे.

चित्र पाटीवर काढायचे अगर चित्रकलेच्या वहीत काढायचे; पण ते चित्र शिक्षिकेच्या नजरेतील असेल तरच बरोबर, मुलांच्या नजरेतील नाही. यातूनच चूक-बरोबर मान-अपमान या संकल्पनांची निर्मिती झाली.

आनंददायी रचनावादी शिक्षणाच्या जागी वर्तनवादी शिक्षण आले, याला पालक, वर्गही तितकाच जबाबदार आहे. पालकांच्या मुलांकडून शिक्षण संस्थेकडून असणाऱ्या अवास्तव अपेक्षा, तुलनात्मक स्वभाव यामुळेच शिक्षणपद्धतीत नको इतके बदल होताना दिसतात. आपल्या मुलाला/मुलीला शाळेत

शिकवली जाणारी प्रत्येक गोष्ट आलीच पाहिजे असा पालकांचा आग्रह असतो. त्यासाठी ते मुलांना धाक-धपटशा करायलाही मागे हटत नाहीत.

आपल्या मुलाची बौद्धिक कुवत लक्षात न घेता, त्याचा मानसिक कल विचारात न घेता त्यांच्या पालकांच्या आवडीच्या शाळेत प्रवेश घेतला जातो. न पेलणाऱ्या अभ्यासामुळे मुलं हिरमुसतात. त्यांची शिक्षणातील आवडच संपून जाते व ती जागा भीतीने घेतली जाते. त्यामुळे बदलत्या शिक्षणप्रणालीबरोबरच त्या चिमुकल्यांची मानसिकताही बदलताना दिसते आहे. पूर्वी बालमंदिरातून मुलांना घरी जाण्याची इच्छा होत नव्हती आणि आता बेल केव्हा वाजते अन् घरी केव्हा जातो, असं विदारक चित्र पाहायला मिळतं याला जबाबदार कोण?

नवे बदल आवश्यक स्वीकारले पाहिजेत, पण जुन्याची कास धरूनच. त्यासाठी आतासुद्धा बालमंदिरात मोकळं वातावरण असावं, सुंदरशी बाग असावी, एक पाण्याचा हौद असावा, थोडंसं मातीत खेळण्यासाठी अंगण असावं. फुलझाडे, फळझाडांची, झुडपांची, वेलींची पंगत असावी. बागडणारी फुलपाखरे, किलबिलाट करणारे पक्षी किमान आठवड्यातून एकदा तरी त्यांना पाहायला मिळावेत. या सर्वांमुळे मुलांचे मन प्रफुल्लीत राहील आणि मग आपली ही नवीन शिक्षणप्रणाली मुलं अगदी आनंदानं स्वीकारतील.

भारतीय बालशिक्षणात रचनावाद व रचनावादात बालशिक्षण असा परस्परपूरक संबंध आहे. अलीकडच्या काळात या पद्धतीत तफावत दिसून येत असली, तरी आधुनिकतेतही रचनावादाशिवाय पर्याय नाही, हेच खरे.

या निबंधासाठी मार्गदर्शक म्हणून व संदर्भ म्हणून १) रजनी दाते यांच्या 'बालशिक्षणाची गाथा' या पुस्तकाचा खूप उपयोग झाला. त्याचबरोबर श्री. रमेश पानसे सर यांच्या 'रचनावाद' २) या पुस्तकाचाही उपयोग झाला. ३) तसेच दै. लोकमत पुरवणीत प्रसिद्ध होणारे श्रुती पानसे यांचे लेखही मार्गदर्शक ठरले. काही शेष भाग हा स्वानुभवावर कथित केलेला आहे.

❒❒


वार्षिक वर्गणी रुपये ४००/-

त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.

'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि

दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.

वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.

मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड,




## अनुभव

# रचनावादी शिक्षणाबाबत पालकांची मानसिकता

## रचनावादी शिक्षण आणि मुलांचा विकास

'छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम्' या उक्तीनुसार आपल्यापैकी सर्वांचेच शालेय शिक्षण पूर्ण झालेले असणार. इतिहासातील सनावळ्या पाठ करणे, विज्ञान-गणितातील सिद्धांत व प्रमेये पाठ करणे- हे सारं समजलेलं असो वा नसो; घोकंपट्टी करून परीक्षेला पेपरमध्ये उतरवणे... आपल्या लोकशाही देशात आपण 'मार्क्सवाद' नसानसांत भिनवून ठेवला आहे.

'शिक्षण म्हणजे वर्तनातील अपेक्षित बदल' अशी व्याख्या घेऊन वर्तनवादी शिक्षणव्यवस्था निर्माण झाली.

दरम्यानच्या काळात शिक्षणाला आधारभूत असलेल्या मानसशास्त्रात व मज्जामानसशास्त्रात प्रचंड संशोधन झाले आणि त्यातून माहितीची नवी कवाडे आपल्याकरता उघडली गेली. त्यातून शिक्षण हे शास्त्रीय विचारसरणीवर आधारलेले- अशी शास्त्रशुद्ध बाब आहे, हे लक्षात आलं. मूल हे नेमकं शिकतं कसं, मेंदू गोष्टी लक्षात ठेवतो कसा, विविध अनुभवांचे ज्ञानात रूपांतर कसे केले जाते; याचबरोबर मेंदूमधील विद्युत रासायनिक क्रिया ज्ञात झाल्या.

मुलांच्या शिकण्याच्या वयात शिकण्याच्या दृष्टीने कोणत्या बाबी या मेंदूला अनुकूल आणि कोणत्या बाबी ह्या मेंदूला हानिकारक, हे माहीत झालं. बुद्धिमत्तेच्या बाबतीत बहुविध बुद्धिमत्ता आणि त्यांची मेंदूमधील विविध केंद्रे ज्ञात झाली आणि मेंदू-आधारित शिक्षणव्यवस्थेचे महत्त्व माहिती झाले.

बालशिक्षण परिषदेच्या कार्यक्रमातून जीन पियाजे आणि वायगोटस्की यांनी पाठपुरावा केलेल्या, संशोधित केलेल्या रचनावादी शिक्षणपद्धतीची ओळख झाली. त्याबद्दल अधिक माहिती करून घेण्याचा प्रयत्न केला असता; पुढील काही गोष्टी माहीत झाल्या.

**महेश कांबळे**

बालकाच्या जन्मजात मिळालेली ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये यांच्या साह्याने आजूबाजूच्या वातावरणाशी त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया या चालू असतात आणि त्यातून बालकाच्या मेंदूत बौद्धिक संरचना तयार होत जातात.

मुलं जेव्हा एखादा अनुभव प्रथम घेतात, तेव्हा त्यांची विशिष्ट अशी प्रतिमा (schema) मनात उमटते. ते बालकांचे ज्ञान असते. प्रत्येक नवी आलेली माहिती या schema मध्ये बसवून बघण्याचा प्रयत्न होतो आणि नाही बसली तर नव्या schema तयार केल्या जातात. या प्रक्रियेला पियाजे assimilation आणि accomodation म्हणतात.

मुलांची शिकण्याची प्रेरणा ही उपजतच असते. तिचा योग्य उपयोग करून घेऊन मुलांना शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देता येतात.

माहिती स्मरणात ठेवण्यासाठी तिचे ज्ञानात रूपांतर व्हावे लागते आणि ते ज्ञान माहितीच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांवरून तयार झालेले असते. म्हणूनच जेव्हा शिक्षण वेगवेगळी उदाहरणे देऊन वेगवेगळ्या माध्यमांतून शिकवले जाते, तेव्हा ते जास्त चांगल्या पद्धतीने समजते आणि स्मरणात राहते.

मुलांना कृती करायला देऊन आवश्यक तिथेच मदत केली; तर त्यांना 'मला हे जमतंय, हे मी करू शकतो', याचा अनुभव येईल आणि त्यांची काही तरी नवं करून बघण्याची जिद्द वाढेल.

मनुष्य आपल्या अनुभवांद्वारे स्वत:च्या ज्ञानाची रचना करत असतो.

कोणत्याही गोष्टीची एकसंध प्रतिमा लक्षात ठेवण्याची मुलांची प्रवृत्ती असते. त्यासाठी एकाच वेळी अनेक संवेदनांचा वापर करणे उपयोगी ठरते.

कृतिशील अनुभव सहजपणे दीर्घकालीन वा कायम स्मृतीत राहतात. त्याबरोबर त्यात प्रामुख्याने शरीरातील विविध स्नायूंचा वापर होऊन शरीर आणि बुद्धी या दोन्हींच्या मेंदूमधील क्षमतांना बळकटी येते. विद्यार्थ्यांना मन एकाग्र करण्याची सवय लागते.

ज्ञानाची निर्मिती आणि त्याला आकार देण्याचे काम कृतीतून, अनुभवातून होते.

शिकवण्यापेक्षा शिकण्यावर अधिक भर असावा. ज्ञानाचा पुन:सादरीकरण करण्यापेक्षा ज्ञानाच्या निर्मितीवर जास्त भर असावा. वेगवेगळ्या साधनांद्वारा वेगवेगळ्या प्रकारे तऱ्हेतऱ्हेच्या संभावनांचा विचार केला गेला पाहिजे.

कृती करत असताना होणाऱ्या चुकांचा वापर हा प्रगतीचे तत्त्वे अभ्यासासाठी आणि वेगवेगळ्या पद्धतीने विचार करण्यासाठी केला जातो.

माझी सहा वर्षांची मुलगी वल्लरी आणि चार वर्षांचा मुलगा नील यांना बालक म्हणून मी विविध कृतींतून अनुभव देण्याचा प्रयत्न केला.

रंगकाम हे लहान-मोठ्या अशा सगळ्यांना आनंद देते. मी मुलांना त्याकरता वेगवेगळी माध्यमे जसे - क्रेऑन्स, वॉटरकलर, पेस्टल कलर वापरायला दिले. घराच्या भिंती या मुलांचा पेपर झाला आणि रंगांच्या विविध मिश्रणांतून निर्माण होणाऱ्या रंगसंगतीमध्ये मुलं बराच वेळ घालवू लागली. नदीकिनारी गेल्यावर मिळणाऱ्या विविध आकारांच्या दगड-गोट्यांवरदेखील रंगांची करामत अजमावून कलाकृती बनवण्याचा प्रयत्न केला. विविध झाडांची पाने, फुले, बिया, झाडांच्या काट्या-कुट्या हे त्यांचे रॉ-मटेरिअल बनले.

भिंतीवर 'Z' (झेड) शेपमध्ये पुठ्ठ्यांची रचना करून त्यातून घरंगळत जाणारे मळी खेळण्यात मुलं दंग होऊ लागली. त्यातून वस्तूंची गणना, रंगांनुसार वर्गीकरण करणे आपोआप साध्य झाले. दोरीमध्ये मणी ओवताना विशिष्ट रंगांच्या क्रमाने ओवण्याची कृती करताना पॅर्टन लक्षात आला.

अंघोळ करतानादेखील पाण्याने भरलेल्या बादलीत पाण्याचा लोटा उपडा करून कलंडता केला असता बुडबुडे येतात आणि त्यातून आपल्या सभोवताली सर्वत्र हवा असते, हे दाखवता आले.

घरात भिंतींवर रंगांनी उंची मोजण्याची पट्टी रंगवली आणि मग मुलं स्वत:ची, घरातल्यांची वाढदिवसाला आलेल्या त्यांच्या मित्रांची, त्यांच्या खेळातील प्राण्यांची उंची मोजू लागले.

वाढदिवसाला येणाऱ्या मुलांच्या नावांची यादी बनविणे, त्यांच्याकरता किती गिफ्ट आणावी लागतील- बनवावी लागतील, हे मुलंच करू लागली. वाढदिवसाला रिटर्न गिफ्ट म्हणून मुलांकडून हस्तकलेच्या वस्तू घेतल्या. आता शाळेत हस्तकलेच्या प्रकल्पाकरता वस्तू उपलब्ध करून दिल्या की, मुलं स्वत:हून त्यांच्या मनाने स्वतंत्रपणे रचना करून प्रकल्प पूर्ण करतात.

पिठापासून, रंगीत क्लेपासून, कँडिस्टिकपासून तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू-आकार बनवण्याचा प्रयत्न असतो. त्यात रेनडिअरसारख्या प्राण्यांपासून ते जेसीबीसारख्या यंत्रांचा समावेश होतो. चढता-उतरता क्रम लक्षात यावा याकरता घरातील माणसे, सोसायटीमधील मुले यांना वयाप्रमाणे वाढत्या-उतरत्या क्रमात लावायला सांगितले आणि काम झाले. रिक्षातून जाता-येताना गाड्यांच्या नंबर-प्लेटवर दिसणारे अंक चढत्या-उतरत्या क्रमाने रचायला सुरुवात झाली.

हे गाड्यांचे नंबर बघताना त्यांनी आद्याक्षरांमध्ये बदल MH, GJ, GA बघितले आणि त्यासंबंधी प्रश्न उपस्थित केले. मग भारताचा नकाशा आणून वेगवेगळी राज्यं आणि तिथे फिरायला जायचे असल्यास कोणत्या विविध मार्गांनी जाऊ शकतो याचा विचार मुले करू लागली. एखादं खेळणं, पुस्तक कुठे बनत असेल याचा विचार करू लागली. कांगारू, पेंग्विनसारखे प्राणी बघण्यासाठी कुठे जावं लागेल, या प्रश्नाचं उत्तर देताना जागतिक नकाशाचा वापर आणि त्या ठिकाणचे थोडक्यात वातावरण याची माहिती मुलांना देत गेलो.

बाहेरगावी फिरायला जाताना मुलांना केंद्रस्थानी ठेवून कार्यक्रम आखले आणि त्यांना जास्तीत जास्त प्रत्यक्ष अनुभव/ कृती करायला कशी मिळेल याचा विचार केला. प्राणी संग्रहालय, नॅशनल पार्क, सायन्स सेंटर, लायब्ररी... जिथे जमेल तिथे त्यांना घेऊन जाण्याचा प्रयत्न असतो.

कृतीतून, अनुभवातून शिकताना मुलं एकमेकांबरोबर घरातल्या मोठ्या माणसांबरोबरच चर्चा करत असतात. त्यांना प्रश्न विचारत असतात.

त्यांचा प्रश्न कितीही सोपा असो अगर कोणत्याही त्यांनी केलेला वाक्यात विचार असो;

त्याकडे लक्ष देऊन उचित मान राखला जातो.

त्यांना एखाद्या कृतीमध्ये काही अडथळे येत असतील, तर त्यांना अधिक प्रयत्न करावयास किंवा वेगळ्या पद्धतीने कृती करून बघण्यास सांगितले जाते.

मुलांनी बनविलेल्या कलाकृती, रंगविलेली चित्रे घरात, भिंतींवर चिकटवून ठेवतो.

बाहेरगावी जाताना मुले स्वत:हून त्यांच्या दररोजच्या वस्तू, कपडे बरोबर काढून ठेवतात.

रचनात्मक कृती करत असताना मुलं कधी कंटाळत नाहीत. शाळेतून/ प्रवासातून दमून आली असतील, तरी अशा कृतींमध्ये लगेचच रमतात. त्यांचा कंटाळा, थकवा नाहीसा होतो. कोणतीही ठरावीक वेळ आम्ही याकरिता राखून ठेवली नाही. मुलांना जेव्हा वाटेल तेव्हा मुलं खेळतात, कृती करतात. त्यांना त्यांच्याशी संबंधित लहानसहान प्रश्न विचारून विचार करण्यास प्रवृत्त केले जाते. टीव्ही बघणे कमी झाले. मुलांकरता असे वेगवेगळे रचनात्मक खेळ रचताना, साधनांची निर्मिती करताना अडथळे उद्भवतात. त्यावर मात करण्यासाठी टॉय लायब्ररी उपयोगी पडली. विविध शैक्षणिक खेळणी मुलांना स्वत:ला हाताळता आली. इंटरनेटच्या माध्यमातून इतर पालक करत असलेले कृतिशील प्रयोग यांची माहिती देता आली आणि मुलांसोबत प्रकल्प करता आले.

रचनावादी कृतींमुळे मुलांचे शाळेतील विषयांचे आकलन सोपे होते. शिकण्यासाठी पुरेसा कालावधी आवश्यक असतो.

मुले प्रौढांसारखा विचार करत नाहीत. मुलांची तार्किकता ही प्रौढांच्या तार्किकतेपेक्षा गुणात्मकदृष्ट्या वेगळी असते. इथे मला माझ्या मुलाचे उदाहरण द्यावेसे वाटते. रामायणाच्या पुस्तकात लक्ष्मणाने लक्ष्मणरेषा आखल्याचे आपणा सर्वांना माहीत आहे. चित्रात देवी सीता कुटीतून बाहेर येत आहे. साधुरूपातील रावण लक्ष्मणरेषेबाहेर उभा आहे. रेषा ओलांडण्याचा प्रयत्न केल्यास ज्वाळा येतात. मुलांनी विचारलं की- रावण



उडूनसुद्धा जाऊ शकला असता की नाही? हे आपल्या डोक्यात कधी आलंच नव्हतं.

**रचनावादी शिक्षण आणि पालकांची मानसिकता**

रचनावादी पद्धतीबद्दल बऱ्याच पालकांना अजून पुरेशी माहिती झाल्याचे दिसत नाही.

मुलांना चांगल्या प्रथितयश शाळेत प्रवेश मिळवून दिला म्हणजे झाले, आपलं कर्तव्य आपण पार पाडले- ही मानसिकता पालकांनी प्रथम बदलणे आवश्यक आहे.

पालकांचे या दृष्टीने शिक्षण-प्रबोधन झाले पाहिजे, हा नवा विचार पालकांना समजला पाहिजे. पालकांनी त्याच्या अंमलबजावणीचा आग्रह धरला पाहिजे. प्रबोधन केंद्राची निर्मिती करायला हवी. उदासीनता दूर करून एक समाजहिताचे कार्य म्हणून पुढाकार घ्यायला हवा.

शाळेतील पालक-शिक्षक सभा या फक्त व्यवस्थापनाचे निर्णय सांगण्याचे अथवा विरोध प्रकट करण्याचे ठिकाण न होता त्यातून शिक्षक-पालक मुलांच्या विकासात एकत्रितरीत्या कसा हातभार लावू

शकतात, यांच्या शक्यता पडताळल्या पाहिजेत.

पालकांना मुलांसाठी वेळ देता येत नाही. अशा वेळी समविचारी पालक एकत्र येऊन मुलांची जबाबदारी सामूहिकरीत्या घेऊ शकतील. एकमेकांशी चर्चा करून शालेय अभ्यासाच्या अनुषंगाने उपक्रम ठरवू शकतील आणि मुलंदेखील एकमेकांशी चर्चा करून समस्या सोडवण्याचा प्रयत्न करतील.

पालकांच्या मनावरील मार्कांची मोहिनी अजून जाता जात नाही. आपल्या मुलांच्या उत्कर्षाकरता समविचारी पालकांनी एकत्र येऊन रचनावादी कृतीचा वापर, साधनांची निर्मिती केली; तर आपण पुढचा टप्पा गाठू शकतो.

पालक-शिक्षक संवाद, पालक मुलं ह्यांच्यातील संवाद जो कमी होत चालेला दिसतो; तो प्रयत्नपूर्वक वाढवल्यास अधिक रचनात्मक कार्य साध्य होऊ शकेल.

रचनात्मक कृतीतून बालक-बालक, बालक-पालक, बालक-शिक्षक हे अजून एकमेकांच्या जवळ येतील आणि मैत्रीपूर्ण वातावरणात शिकून ज्ञानाची निर्मिती शक्य होईल.

मुलांचे शिक्षण जेवढे शाळेतून होत असते, त्याहीपेक्षा ती घरातून शिकत असतात. जन्मापासून साधारणत: पाच ते सहा वर्षांत मुलांच्या मेंदूचा विकास झपाट्याने होत असतो. प्रत्येक नव्या अनुभवानुसार चेतापेशींचे जाळे अधिकाधिक घट्ट विकसित होत जाते. काही तरी कृती सतत करत राहणे, वस्तूंची आदळ-आपट करणे, चव घेणे, वास घेणे अशा अनेक क्रिया मुलांच्या चालू असतात. या कृती मोठ्यांच्या दृष्टिकोनातून निरर्थक असल्या, तरी मुलांच्या दृष्टीने त्या अनुभव देणाऱ्या व शिकण्यास पूरक अशा असतात.

शालेय विषयांना पूरक असे कृतिशील प्रयत्न घरात होणे आवश्यक आहे. त्याकरता जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची पालकांची तयारी हवी. शक्य तितक्या लवकर मुलांना लिहिता-वाचता यायला पाहिजे, अशी ही पालकांना घाई झालेली असते. त्यामुळे मुलांची क्रियाशीलता मारली जाते. ही अकाली साक्षरता मुलांची जिज्ञासा खर्च करते.

घरात आपण मुलांना ‘हे करू नको, त्याला हात लावू नको’ असे सतत सांगत असतो. त्याऐवजी मुलांना त्यांच्या वयानुसार घरातील छोट्या-मोठ्या कामांमध्ये- जसे डाळी निवडणे, पालेभाज्यांची पाने खुडणे, स्वत:चे पाणी स्वत:च घेणे, धुवायचे कपडे पाण्यात भिजवणे, बाजारातून फिरवून आणणे, वस्तू हाताळायला देणे- असे बरेच काही करता येईल. घरात कृतिशील अनुभवांची रेलचेल असली पाहिजे.

घरातील वातावरण आनंदी, खेळमेळीचे, तणावरहित असेल; तर मुलांना भावनिक स्थिरता लाभून शिकणे, बौद्धिक आकलन सहज होत जाते. मुलांचे वय, ग्रहणशक्ती या सर्वांना अनुसरून गोष्टी सांगाव्यात. जो अनुभव प्रत्यक्षात आपण मुलांना देऊ शकत नाही, तो गोष्टींच्या माध्यमातून मुलांना देऊ शकतो.

मुलांना केंद्रस्थानी समजून त्यानुसार कार्यक्रम ठरविले पाहिजेत. मुलांना खेळण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यांने सर्व शरीराला व्यायाम मिळतो, स्नायू बळकट होतात आणि मुलांची Physical Literacy विकसित होण्यास मदत होते.

एकविसाव्या शतकात वावरताना, भारताला महासत्ता बनविण्याचे स्वप्न बघत असताना विसाव्या शतकातील शिक्षण असून चालणार नाही. मुलांना शिकवण्यापासून मुलांनी स्वत:हून शिकत जाणे, येत असलेल्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणे, ज्ञान रचत जाणे, कृती करत जाणे, हाती आलेले निकाल-अनुभव समाजात वापरून बघणे, हे नव्या रचनावादी शिक्षणपद्धतीत अपेक्षित आहे.

आपल्या मुलांना पोषक वातावरण उपलब्ध करून देण्यास पालकांनी रचनावादाचा पुरस्कार आहे. आपल्या मुलांना समजून घेऊन त्यांच्या विचारांचा, कृतींचा स्वीकार करायचा आहे.

❑❑




घरातील 'भाषाशिक्षण' हा सामान्यत: दुर्लक्षित असलेला विषय बालशिक्षणाचा एक अविभाज्य भाग म्हणून समाज जाणिवेत येण्याची गरज आहे. तीन ते सहा या वयात बालशाळांमध्ये काही खास प्रयत्न करून मागील काळातील उणिवा काही प्रमाणात भरून काढणे शक्य होते ते मेंदूच्या लवचीकतेमुळे. त्यामुळे शाळेतील भाषाशिक्षणाचा विचार जाणीवपूर्वक करणे आवश्यक आहे. ग्राममंगलमधील शाळांमध्ये भाषाशिक्षणात प्रयोगशीलतेने काम केले जाते. ग्राममंगलच्या शाळांमध्ये चालणाऱ्या भाषाशिक्षणाचा आढावा प्रा. रमेश पानसे यांच्या पुस्तकात घेतला आहे.

| लेखक: | प्रकाशक : | मूळ मूल्य : |
| --- | --- | --- |
| **रमेश पानसे** | **ग्राममंगल** | रु. २००/- |



# शिक्षकाची बदलती भूमिका

महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच लर्निंग होममध्ये काम करण्याची संधी मिळाली. लहान मुलांची आवड असल्याने मी पट्कन रुळले आणि मग खऱ्या कामाला सुरुवात झाली. अगदी पारंपरिक शिक्षण पद्धतीतून शिक्षण घेतलेल्या मला मूलकेंद्रित शिक्षण, अनुभवाधारित शिक्षण, मेंदू, ज्ञानरचनावाद हे शब्द अपरिचित पण तितकेच उत्सुकता वाढविणारे होते. या सगळ्या प्रक्रियेतून खूप काही शिकायला मिळणार याची ग्वाही तिथे असलेल्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून प्रत्येक क्षणी मिळत होती.

सगळ्यात पहिला धडा मिळाला तो आपण 'शिक्षक' नसून 'मार्गदर्शक किंवा मदतनीस' या भूमिकेत राहून मुलांबरोबर काम करायचे असते, याचा 'पण म्हणजे नक्की काय?' असा प्रश्न निर्माण झाला आणि मग 'ज्ञानरचनावाद' या नव्या विषयाच्या अभ्यासाचा प्रात्यक्षिकासह प्रवास सुरू झाला.

मूलकेंद्रित शिक्षणपद्धतीत मुलाला अनुकूल असणाऱ्या परिस्थितीत आणि वातावरणात काम करण्याची मुभा असते. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक सांगतील तेच प्रमाण असे मानून काम पुढे चालू ठेवणे, अशी धारणा मार्गदर्शक किंवा मूल यांची नसते. मुलाला प्रत्येक विषयाचा विचार त्याच्या दृष्टिकोनातून कल्पकतेने, तर्काने करण्याचे तसेच ते विचार मांडण्याचेही स्वातंत्र्य असते. तो विचार योग्य दिशेने होण्यासाठी मदत करणे, इतकीच भूमिका मार्गदर्शकाची असते आणि हेच या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे, असे म्हणावेसे वाटते.

योग्य दिशेने विचार होण्यासाठी मदत- इतकीच

## चैत्राली रहाळकर

भूमिका, असे जरी मी म्हटले तरी ही भूमिका खूप जबाबदारीची आणि अभ्यासू वृत्ती वाढविणारी असते. आमच्या लर्निंग होममध्ये सर, मॅडम, टीचर असे शब्द वापरलेच जात नाहीत. मुलं आम्हाला ताई-दादा असंच संबोधतात. त्यामुळे मूल आणि ताई-दादा यांच्यात मैत्रीपूर्ण नातं निर्माण झालेलं दिसत. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील हे नातं माझ्यासाठी खूपच नवं होतं. रोज नव्या अनुभवांची मी साक्षीदार होत होते. त्या अनुभवातून मुलांकडून खूप काही शिकत होते. 'लहानांकडूनही शिकण्यासारख्या अनेक गोष्टी असतात' अशा आशयाचे एक संस्कृत सुभाषित आहे; त्याचा प्रत्यय मी रोज घेत आहे..

मुलांबरोबर आलेले काही अनुभव सांगावेसे वाटतात. संस्कृत हा माझा विषय. त्यामुळे मुलांबरोबर संस्कृत विषयाशी संबंधित उपक्रम मी घेते. या सगळ्यातील मज्जा म्हणजे आमची बालवाडीपासूनची मुले तोडक्या-मोडक्या संस्कृतमध्ये बोलतात. एके दिवशी गट पाचच्या मुलांना मी-

तैलात् रक्षेत् जलात् रक्षेत् रक्षेत् शिथिलबन्धनात् ।
मूर्ख हस्ते न दातव्यम् एतद् वदाति पुस्तकम् ॥

असे सुभाषित ऐकवले आणि गप्पा मारता-मारता अडलेल्या शब्दांचा अर्थ सांगत मुलांनी संपूर्ण सुभाषिताचा अर्थ समजून घेतला. वरील सुभाषितात पुस्तकांची निगा कशी राखली पाहिजे, हे पुस्तकच सांगते आहे. पाणी, तेल, शिथिल होणे यांपासून तसेच मूर्खाच्या हाती देण्यापासून माझे रक्षण करावे, असे पुस्तक सांगते.

यानंतर मुलांशी गप्पा मारत असताना मी त्यांना विचारले की, अजून अशा काही वस्तू सांगता येतील का? आणि त्या वस्तू कोणापासून रक्षण करा असे सांगतील, अशी यादी करा. ती यादी तयार करता-करता गटातील एक मुलगी पट्कन म्हणाली, ''ताई, यातून नवं सुभाषित होईल- असं वाटतंय. ऐक, मी वृक्ष काय म्हणेल ते लिहिलंय.'' यातून गटातील इतर मुलांनी प्रेरणा घेतली आणि गट पाचने स्वत:ची अशी १० नवी सुभाषिते तयार केली. सर्व मुलांनी विभक्ती प्रत्यय कोणते, कुठे वापरायचे हे समजून घेऊन शब्दाचे योग्य रूप वापरले. अर्थात शब्दसंग्रह वाढावा म्हणून आधीच खूप उपक्रम घेतले होते. गट पाचच्या मुलांच्या चेहऱ्यावर नवनिर्मितीचा आनंद ओसंडून वाहत होता. तो आनंद आणि मुलांची सर्जनशीलता, कल्पकता पाहून माझे विचारचक्र जोराने फिरू लागले. हेच सुभाषित

खरं तर मीही त्यांच्याच वयाची असताना शिकले होते; परंतु हा वेगळा विचार मी का नाही करू शकले? विचारांचा वेग मला उत्तरापर्यंत घेऊन गेला.- मग कळलं विचारांना पोषक वातावरण मिळणं फार आवश्यक असतं. तसंच चौकटी मोडून अनुभव देणं आणि घेणं हाही भाग वेगळा विचार करण्यासाठी महत्त्वाचा असतो. या प्रसंगातून 'चौकटीबाहेरील विचार' हा ज्ञानरचनावादाचा पैलू समोर आला. मुलांच्या समोर त्यांना पेलतील अशी आव्हानं ठेवली, तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो. या सर्व कामांचे प्रदर्शन आम्ही मांडतो, त्या वेळी आपण ही सुभाषितं कशी तयार केली हे मुलांनीच सर्व पाहुण्यांना समजावून सांगितले. खरं तर पूर्वज्ञानावर आधारित नवी ज्ञानरचना त्यांनी कशी केली, हेच ते समजावून सांगत होते.

मुलांबरोबर मलाही काही तरी नवं गवसलं होतं. मग कामाचा उत्साह व नवं शिकण्याचा आणि शोधण्याचा ध्यास लागला. त्यातूनच गट नऊबरोबर एका तासाला मूळ विषयापासून विषयांतर होऊन कोणत्या तरी जाहिरातीचा संदर्भ मुलांकडून आला आणि मी अगदी सहज म्हटलं, ''चला, आता याचं संस्कृतमध्ये भाषांतर करू या. मला 'भाषांतर' या घटकावर मुलांना पूर्वस्थित आणायचं होतं. म्हणून चालू असलेल्या विषयाचा वापर करून मी कामाचे स्वरूप बदलले. मुलांनाही हा प्रकार intresting वाटला आणि मग एकामागोमाग एक Nokia, Ideia, Mentos यांसारख्या अनेक Productsच्या Tag Lines ची भाषांतरे आम्ही केली. त्या दिवसानंतर मुलं रोज कोणतीही नवी जहिरात घरी पाहू लागली आणि त्याचे भाषांतर करून मला सांगू लागली. मुलांच्याही नकळत माझा हेतू साध्य झाला होता. मुलांनीच मला शिकविण्याच्या एका नव्या पद्धतीचा परिचय करून दिला होता. आपलं उद्दिष्ट पक्कं असलं की, आपल्याला नवे-नवे उपक्रम सुचतात. नव्या पदधतीने ते घेता येतात. या आणि अशा प्रसंगातून माणूस हा आयुष्यभर विद्यार्थिदशेत असतो, हे लहानपणापासून ऐकलेले वाक्य यथार्थ आहे याची निश्चिती झाली. या पद्धतीमुळे एक मार्गदर्शक आणि माणूस म्हणून मी खूप काही शिकले... शिकत आहे... शिकत राहीन...कारण ही एक न संपणारी प्रक्रिया आहे.

प्रत्येक गोष्टीकडे अनेक दृष्टिकोनांतून पाहण्याची सवय मला लागली. माझ्यात असणाऱ्या सुप्त गुणांना, विचारांना प्रवाह मिळाला. शिकविण्याचा व शिकण्याच्या अनेकविध नव्या पद्धती ज्ञात झाल्या. या सगळ्या प्रक्रियेत अवगत झालेली महत्त्वाची कला म्हणजे साधने तयार करणे. साधनाधारित शिक्षण हा रचानावादाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. साधन तयार करताना त्याच्या प्रत्यक्ष वापराचाही खूप विचार करावा लागतो. मुलांचा उत्साह वाढेल आणि संकल्पनाही स्पष्ट होईल, असा विचार करून साधन तयार करावे लागते. काही वेळा साधनांवर आधारित कामे आपण गृहीत धरलेल्या वेळेपेक्षा खूप लवकर पूर्ण होतात, तर कधी साधनांच्या बाबतीत हा वेळ अधिक लागतो आणि आपला प्रयोग साफ फसलेला असतो. पण यातूनच आपली बुद्धी पणाला लागते. नवीन गोष्टी निर्माण होतात. कोणत्याही गोष्टीचे तंत्र कळले की, स्वविचाराने त्याचा विस्तार करता येतो. थोडक्यात काय- मी एक शिक्षक होणार, मुलांना शिकवणार, असा हेतू मनात ठेवून कामाला सुरवात केली आणि आता मी मुलांची मैत्रीण, ताई झाले. ज्ञानरचनावाद आता मला थोडा-थोडा समजू लागला आहे. याचा अभ्यास ही एक साधना आहे. संपूर्ण मानसशास्त्रावर आधारित अशी ही परिपूर्ण शिक्षणपद्धत आहे. यातून तणावमुक्त शिक्षण होते आणि अर्थातच आनंददायी शिक्षणाचा अनुभव मिळतो. अशा पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या मुलांचा मला फार हेवा वाटतो; परंतु ही पद्धत अंगीकारलेल्या संस्थेत काम करण्याची संधी मिळणे, हेही भाग्याचे आहे असे मानून पाडगावकरांच्या कवितेतील ओळीप्रमाणे त्या भरलेल्या अर्ध्या पेल्याकडे पाहून मी समाधानाने सुखावते...

❐❐

# वृत्तान्त

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या २२ वे अधिवेशन

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे २२ वे राज्यस्तरीय अधिवेशन १६ ते १८ नोव्हेंबर २०१५ अखेर 'राम गणेश गडकरी सभागृह' पेटाळा कोल्हापूर येथे संपन्न झाले.

या अधिवेनाचा बीज विषय होता 'रचनावादी बालशिक्षण'. या विषयास अनुसरून व प्रा. रमेश पानसे सरांच्या मार्गदर्शनाने या अधिवेशनात रचनावादी शिक्षणाशी संबंधित शोधनिबंध, प्रमुख वक्त्यांची भाषणे, प्रा. रमेश पानसे सरांची प्रकट मुलाखत, चित्रफिती, शिक्षक दिंडी, 'रचनावादी बालशिक्षण' ग्रंथाचे प्रकाशन, सांस्कृतिक कार्यक्रम, रचनावादी शिक्षणावर आधारीत शैक्षणिक साधनांच्या दालनाचे प्रदर्शन, याबरोबरच शिक्षण क्षेत्रात रचनावादी कार्य करणाऱ्या व्यक्तींना मानपत्र प्रदान कार्यक्रम अशा विविध अंगांनी हे अधिवेशन भरलेले व भारलेले होते.

दि १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वा. प्रा.रमेश पानसे सर, श्री. डी.एम.कस्तुरे, निवृत्त सह-संचालक श्री. संपत गायकवाडसे यांच्या शुभहस्ते महात्मा जोतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून शिक्षक दिंडीला सुरुवात झाली. देशभक्तीपर गीतांचे गायन, स्वावलंबी शिक्षण हीच काळाची गरज अशा घोषणा देत दिंडी निघाली. बिंदू चौक, शिवाजी पुतळा या मार्गे राम गणेश गडकरी सभागृह असा दिंडीचा मार्ग होता. जिजाऊ बालविकास मंदिर- मजलेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझिमीने उपस्थित भारावून गेले.

सकाळी १०.३० वा. प्राथमिक शिक्षण संचालक मा.श्री महावीर माने यांच्या हस्ते संगणकाची कळ दाबून उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय संयोजक राजगोंडा वळिवडे, प्रास्ताविक श्रीमती विशाखा देशपांडे यांनी केले. मा.श्री भालचंद्र पाटील यांनी स्वागताध्यक्ष या नात्याने सर्वांचे स्वागत केले. याप्रसंगी रचनावादी बालशिक्षण या ग्रंथांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी शिक्षणक्षेत्रात रचनावादी कार्य करणाऱ्या 'श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस'चे चेअरमन मा.श्री डी.बी.पाटील, दि न्यू एज्युकेशन सोसायटीचे मा.श्री. विनोदकुमार लोहियासो, सृजन आनंदच्या संचालिका श्रीमती सुचेता पडळकर, किरण विद्या विहार उचगावच्या संस्थापिका श्रीमती जयश्री चव्हाण यांचा

मानपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. मा.श्री महावीर माने हे आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, ‘‘ज्ञानरचनावाद ही संकल्पना बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. त्यामुळे ज्ञानरचनावाद रुजविण्यावर शिक्षकांनी भर द्यावा. पाठयपुस्तक हे साधन म्हणून वापरावे, कृतियुक्त शिक्षणातूनच बालकांना शिक्षण द्या. अजूनही काही शिक्षक रचनावादाच्या बाबतीत बुचकळ्यात आहेत, तेव्हा महाराष्ट्रबालशिक्षण परिषदेने या शिक्षकांचे प्रशिक्षण, मार्गर्दान करावे. अधिवेशनात पूर्वप्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, नवीन शैक्षणिक धोरण, शिक्षणापासून वंचित मुलांच्या प्रश्नाबाबत परिषदेत चर्चा व्हावी असे मत व्यक्त केले.

पहिल्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात शोधनिबंधाचे वाचन झाले. अधिवेशनासाठी १३ उपविषयांची निवड करण्यात आली, यांमध्ये उपाध्यक्ष डॉ. बाळकृष्ण बोकिल, कार्यकारी अध्यक्ष डॉ. दिनेश नेहेते, कार्यवाह श्रीमती विशाखा देशपांडे यांचा सहभाग होता. १३ पैकी ८ विषयांवर शोधनिबंध सादर करण्यात आले. यांमध्ये पहिल्या दिवशी - १) मॉंटेसोरीचे रचनावादी बालशिक्षण - सौ. सुरेखा पेंडसे, पुणे.

भारतीय बालशिक्षण आणि रचनावाद- सौ. शितल एच. भालेराव, धुळे यांनी शोधनिबंधाचे वाचन केले. अध्यक्षस्थानी श्रीमती रजनी दाते होत्या.

संध्याकाळी श्रीमती सुचेता पडळकर - कोल्हापूर यांचे अध्यक्षेतेखाली

३) रचनावादी शिक्षणाबाबत पालकांची भूमिका - श्री. महेश कृष्णा कांबळे, ठाणे (पालक), वैज्ञानिक सहायक भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई.

रचनावादी शिक्षणाबाबत शिक्षकांची भूमिका - चैत्राली रहाळकर- ग्राममंगल पुणे यांनी शोधनिबंध सादर केला.

मुलांच्या शिक्षणाबाबत पालकही आता जागृत झालेले आहेत, हे श्री. महेश कांबळे यांच्या शोध-निबंधातून दिसून आले.

चैत्राली रहाळकर म्हणजे एक उदयोन्मुख रचनावादी शिक्षक. ग्राममंगलमध्ये त्या काम करतात. रचनावादी शिक्षणाबाबत शिक्षकांची भूमिका कशी असावी, हे त्यांनी स्वानुभवातून कथन केले आहे.

११. मुलांना हुशार बनविण्यापेक्षा चलाख बनवावे.

यासाठी शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाच्या अभ्यासक्रमांत बदल अपेक्षित असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. श्रीमती सुचेता पडळकर या अध्यक्षास्थानावरून बोलताना शोधनिबंध सादर करणाऱ्या दोघा तरुणांचे कौतुक करून त्यांनी रचनावादी शिक्षणात तरुणांचा सहभाग वाढला पाहिजे, असे सांगितले. मुलांनी स्वत:साठी घेत असताना दुसऱ्यासाठी काही तरी घ्यावे, हा विचारही मुलात रुजवा. पालकांचा उपक्रमात सहभाग वाढवा. जाहिरातीचेही भाषांतर करून घेण्यासाठी केलेला नावीनघयपूर्ण उपक्रम त्यांनी सुचविला. मुलांसाठी शाळेत सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांनी उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू आले.

संध्याकाळी धुळे शाखेने तयार केलेली रचनावादी बालशिक्षणावर आधारीत चित्रफीत दाखविण्यात आली. रात्री भोजनानंतर फुलोरा बालमंदिर, कोल्हापूरच्या शिक्षक व पालक यांनी ‘काजव्यांचे झाड’ हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. उपस्थितांनी त्यास भरभरून दाद दिली.

दि. १७ नोव्हेंबर रोजी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाला शोधनिबंधाने सुरुवात झाली.

फ्रोबेलचे रचनावादी बालशिक्षण - श्री. संजू चिंतामणी माने, इचलकरंजी व पुढील काळासाठी रचनावादी शाळा - सौ. उज्ज्वला फाटक इचलकरंजी यांच्या शोधनिबंधाचे वाचन मा. श्री. संजय पाटील यांच्या अध्यक्षेतखाली झाले.

फ्रोबेलच्या रचनावादी शिक्षणाबाबत माहिती देताना फ्रोबेलचे शिक्षणविषयक विचार हे त्यांच्या जीवनातील अनुभवातून आले आहेत. शिक्षणाचा मुख्य हेतू हा मानवाच्या अंतरंगातील विकास हा आहे. शिक्षकांनी मुलांच्या विकासावस्थेशी सुसंवाद साधूनच अध्यापन करावे, असे त्याचे विचार श्री. माने यांनी स्पष्ट केले.

पुढील काळासाठी रचनावादी शाळा - सौ. उज्ज्वला फाटक यांच्या शोधनिबंधातून त्यांनी बालपणी जितके अधिक अनुभव दिले जातील, तेवढे

आरोग्यपूर्ण व्यक्तिमत्त्व घडेल, ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून; बालकांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी, सहज शिक्षण होण्यासाठी रचनावादी शाळांची गरज असल्याचे स्पष्ट केले. फ्रोबेल, मॉंटेसोरी, ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी बालशिक्षण क्षेत्रात केलेले कार्य, त्यातील रचनावाद स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मुलांमध्ये शाळेची आवड निर्माण व्हावी, सहकार्याची भावना वाढावी, स्वयंअध्ययनाची सवय व्हावी, अध्ययनात एकाग्रता निर्माण होण्यासाठी, प्राप्त केलेल्या माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्यासाठी, शिकण्यातील ओझे कमी करण्यासाठी, काही संकल्पना स्पष्ट होण्यासाठी, शारीरिक-भावनिक विकास होण्यासाठी रचनावादी शाळा आवश्यक आहेत. त्यांनी आपल्या शोधनिबंधात रचनावादी शिक्षणासाठी शाळेत कोणते उपक्रम राबवता येतील, हे उदाहरणांनी स्पष्ट केले.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना मा.श्री. संजय पाटील म्हणाले, ''शिक्षणाचा मुख्य हेतू हा मानवाच्या अंतरंगातील विकास हा आहे. शिक्षकांनी मुलांच्या विकासावस्थेशी सुसंवाद साधूनच अध्यापन करावे, असे त्यांनी मत व्यक्त केले. चाणक्याने तक्षशिला विद्यापीठात अध्यापन करत असताना, आपला विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने कसे अध्ययन करेल व स्वत:चा आंतरिक विकास कसा करावा, याचे फ्रोबेलच्याही अगोदर २३०० वर्षांपूर्वी मार्गदर्शन केले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सकाळी ११ वा. 'राष्ट्र उभारणीसाठी शिक्षकांचा सहभाग' या विषयावर प. पु. श्री. काडसिद्धेश्वर स्वामीजी म्हणाले, ''प्रयोग व निर्मिती करणारे समाजात शिक्षकच असतात, त्यामुळे राष्ट्र उभारणीसाठी, राष्ट्रविकासासाठी असे प्रयोगील व निर्मितीशील शिक्षकांची राष्ट्राला गरज आहे. विद्यार्थ्यांच्या मनात इतिहासाच्या अभ्यासातून राष्ट्राची बलस्थाने कोणती आहेत हे शिकवा. ज्यातून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्राभिमान निर्माण होण्यास मदत होईल. पैशासाठी काम करणारी व्यक्ती राष्ट्राला मोठे करत नाही, त्यामुळे शिक्षकांनी तन-मनाने या क्षेत्रात काम करावे. विद्यार्थ्यांना आपल्या घरासारखे राष्ट्राचा सांभाळ करण्यास शिकवा, त्यांना जीवनमूल्ये शिकवा. राष्ट्राला अखंड ठेवण्याचे काम शिक्षकच करू शकतो, शिक्षक त्यागी असावा, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या दोषांना प्राधान्य न देता, त्यांच्या गुणांना प्राधान्य देऊन त्यांची दोष दूर करावेत. शिक्षकांनी लोकांना प्रिय वाटेल, असे काम न करता लोकहिताची कामे करावीत. सर्व शास्त्राबरोबर जीवनमूल्ये, संवेदना, पशू-पक्षी यांच्याबद्दल प्रेम, श्रद्धा निर्माण करा, विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा त्यांना शिकण्यास प्रवृत्त करा. विद्यार्थ्यांना कृतीतून शिक्षण द्या.''

नंतर विशाखा देशपांडे यांनी युद्धात उद्‌ध्वस्त झालेल्या गावात 'रिजिओ इमिलिया' या नव्या शिक्षण पद्धतीची माहिती देऊन चित्रफित सादर केली. 'माझी शाळा'वर चित्रफिती डॉ. दिनेश नेहेते सरांनी दाखविल्या. यांतून शिकविण्याकडे व शिक्षणाकडे पाहण्याचा शिक्षकांचा दृष्टिकोन बदलण्यास निश्चित मदत होईल.

भोजनानंतरच्या सत्रात 'रचनावादी शिक्षणासाठी आवश्यक वातावरण'- डॉ. दिनेश नेहेते पुणे, 'रचनावादी शिक्षणातील आव्हाने व उपाय' - डॉ. बाळकृष्ण बोकिल, पुणे यांच्या शोधनिबंधाचे वाचन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सौ. वर्षा उदयन कुलकर्णी - कराड, होत्या.

रचनावादी शिक्षणासाठी आवश्यक वातावरण कसे असावे हे सांगताना डॉ. दिनेश नेहेत यांनी शाळा व शाळेतून दिले जाणारे शिक्षण हे परीक्षेपुरते अथवा अपेक्षित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी न राहता, ते मुलांच्या विविध क्षमता वाढविण्यासाठी असावे. ज्यामुळे भविष्यातील आव्हानाना त्यांना तोंड देता येईल. कोणत्याही गोष्टीचे आकलन होण्यासाठी इंद्रियविकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी शाळांमधून ज्ञानेंद्रियांचा विकास होण्यासाठी योग्य ते वातावरण कुटुंब, शाळांमध्ये असावे. यासाठी त्यांनी आपल्या मुलांचे उदाहरण देऊन स्पष्ट केले. रचनावादी शिक्षणासाठी आवश्यक वातावरण कोणते हे सांगताना त्यांनी मुख्यत्वे - भौतिक, मानसिक, सामाजिक वातावरणाचा उल्लेख केला.

रचनावादी शिक्षणातील आव्हाने व उपाय - डॉ. बाळकृष्ण बोकिल, पुणे यांनी रचनावादी शिक्षणात पुढील आव्हाने आहेत, हे सांगितले.



बीज भाषणात सुषमा पाध्ये यांनी रचनावादी शिक्षणातील आव्हाने सांगताना तीन मुख्य आव्हानांचा उल्लेख केला. १) पालक-प्रबोधन - रचनावादी शिक्षणाचे महत्त्व पालकांना समजावणे, २) वातावरण निर्माण करणे, ३) सांस्कृतिक दारिद्र्य नाहीसे करणे, (हा शब्दप्रयोग पानसे सरानी केला आहे.)

डॉ. बोकील सरांनी रचनावादी शिक्षणातील आव्हाने सांगताना स्पष्ट केले -

१. रचनावादी संकल्पना तत्त्वत: सर्वांना मान्य असली तरी त्याचे सार्वत्रिकीकरण अद्याप झालेले नाही.

२. मुले रचनावादी पद्धतीने शाळेत शिकताना दिसत नाहीत.

३. अजूनही शिक्षक मी शिकवितो या संकल्पनेतून बाहेर पडलेले नाहीत. मी तर म्हणेन अजूनही मुख्याध्यापक, अधिकारी वर्ग अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला का असेच म्हणतात. मुल काय शिकली असा विचार शाळेतून होताना दिसत नाही. शाळेत जे तेच घरात मुलगा घरी आला की, तू शाळेत काय शिकलास यापेक्षा पालकांचा एकच प्रश्न बाईंनी आज काय शिकविले असा असतो.

४. मुलांना शिकण्यासाठी त्यांना मार्गदर्शकाची भूमिका बजावावी, समाजाचा सहभाग घेण्याचे आव्हाने समोर आहे.

५. सरांनी रचनावादाबाबत कारणीभूत घटकात जाणिवेचा अभाव असून त्यांची कारणे सांगितली. या घटकांचे उद्‌बोधन आवयक आहे पण ते उपलब्ध नाही.

६. शास्त्रीय नियोजन, प्रशिक्षणाचा अभाव, प्रशिक्षणात केवळ व्याख्यानावर भर असतो.

७. रचनावादात प्रत्यक्ष कृतीत आणताना कृती व व्यवहारातील अडचणी सोडविण्याकडे दुर्लक्ष होत आहे यासाठी प्रत्येक शिक्षकांनी कृतीसंशोधनावर भर द्यावा. ८. संस्थाचा पाठिंबा मिळत नाही. ९. साहित्य, साधने, संसाधनांची उपलब्धतेचा प्रश्न.१०. नवीन प्रयोगांना पाठबळ न मिळणे.

**उपाय -** १. रचनावादी िक्षणाची सोप्या पद्धतीने मांडणी व्हावी. २. सर्व घटकांचे उद्‌बोधन व्हावे.

३. विविध प्रकारची साहित्यनिर्मिती व्हावी.
४. उद्‌बोधनाचे उपक्रम आयोजित करावेत.

वर्षा उदयन कुलकर्णी या अध्यक्षास्थानावरून बोलताना म्हणाल्या, ''जिज्ञासा ही निर्माण करण्याची नसून टिकविण्याची आहे, वातावरणाच्या दृष्टीने भावनिक सुरक्षितता ही महत्त्वाची आहे, त्यांनी रचनावादी शिक्षणासाठी सध्या असणाऱ्या वातावरणाचा उल्लेख करून ते बदलणे, हे आपल्यासमोरचे आव्हान असल्याचे सांगितले. Power Point Presentation द्वारे आपले वातावरण कसे असावे हे स्पष्ट केले. मोकळा श्वास घेता येईल असे शिक्षण शाळांतून दिले पाहिजे. यासाठी बालशिक्षणात साधेपणा, सुटसुटीतपणा असला पाहिजे. साधेपणात सौंदर्य असते. सौंदर्य हे शिकविण्याचा भाग बनवावीत, ज्ञानाची सुरुवात साधेपणात आहे, विनम्रता, सहिष्णुता वृत्ती आपण मुलांमध्ये निर्माण करावी, तरच रचनावादी वातावरण तयार होईल. मुले शाळेपेक्षा समाजात जास्त वावरतात. त्यामुळे सामाजिक वातावरण चांगले व्हावे, यासाठी रचनावादी शाळांनी काम करण्याची गरज त्यांनी सांगितली. शिक्षकांनी अलिखित बंधने पाळली पाहिजेत,'' हे त्यांनी आवर्जून सांगितले.

डॉ. अजित पाटील यानी 'मुलांचे आरोग्य आणि आहार' यांवर बोलताना म्हणाले, ''मुलांना आवडते ते देऊ नका, आवश्यक ते द्या. त्यानी शरीराची ओळख करून दिली. सात्त्विक आहार कोणता, फळे, भाजी-पाला, कडधान्ये यांचे महत्त्व व त्यांपासून मिळणारी जीवनसत्त्वे यांबद्दल माहिती दिली. शारीरिक आरोग्य बरोबर मानसिक आरोग्य जपणे महत्त्वाचे, शिक्षक व पालक यांनी मुलांच्या बुद्ध्यांकाबरोबर भावनांकाकडे लक्ष देणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन केले. शिक्षकांनी विचारलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

संध्याकाळी 'रचनावादावर आधारित विविध विषय दालनाचे प्रदर्शन' पाहण्यासाठी खुले करण्यात आले. धुळे शाखा, फुलोरा बालमंदिर यांनी शैक्षणिक साधनांची मांडणी केली होती.

रात्री विविध शाखेने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

अधिवेशनाच्या शेवटच्या १८ नोव्हेंबर २०१५ रोजी प्रा.रमेश पानसे सरांची श्रीमती आदिती नातू, डॉ. दिनेश नेहेते, श्री. संजय पाटील यांनी प्रकट मुलाखत घेतली. यांत प्रा. पानसे सरांचा बालशिक्षण व कोसबाड मधील प्रवास, शास्त्रीय बालशिक्षण व अशास्त्रीय बालशिक्षण, बालशिक्षण हेच क्षेत्र निवडण्याचे कारण, वर्तनवाद व रचनावाद यांतील फरक, ज्ञानरचनेच्या संदर्भात शिक्षण तज्ज्ञांच्या सिद्धांतामध्ये असणारा फरक, रचनावादाचे फायदे, रचनावादी शिक्षणाबाबतचा कृती कार्यक्रम, रचनावादात भाषेचे स्थान, बालशिक्षणात काम करताना आलेले अनुभव, त्यांचा साहित्य प्रवास, रचनावाद, बालशिक्षणातील कार्याचा पानसे सरांचा प्रवास, शिक्षणहक्क समन्वय समितीद्वारे मराठी शाळांसाठी त्यांनी दिलेला लढा, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद स्थापना व कार्य यांबाबत बोलते करण्याचे काम मुलाखतकारांनी केले. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शाळेच्या चौकटीत पारंपरिक शिक्षण देवून मुलांना हुशार बनविण्यापेक्षा व्यवहारज्ञानाचे शिक्षण देवून त्याला चलाख बनवा, असे आवाहन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे यांनी केले. दुर्दैवाने शाळा, कॉलेजमधून चांगल्या शिक्षणाची वानवा असल्याची खंत व्यक्त केली. शाळेच्या शिक्षणापेक्षा महाविद्यालयीन शिक्षणाची अवस्था अत्यंत वाईट आहे. कॉलेजमध्ये विद्यार्थी काही शिकत नाहीत आणि प्राध्यापकही काही शिकवत नसल्याचे चित्र आज आहे. शाळांचीही अवस्था तीच आहे. शिक्षक शिकवतात मात्र, विद्यार्थ्यांना नेमकं काय अपेक्षित आहे, याचा विचार होत नसल्याने शिकविलेले काही कळत नाही. विचारशक्ती शाबूत ठेवण्यासाठी शारीरिक हालचाली अत्यावश्यक आहेत. शारीरिक हालचालीमुळे मेंदूपेशींची जुळणी होऊन त्यातून शिकण्याची सहज आवड निर्माण होते. रचनावाद म्हणजे काय हे सांगताना म्हणाले दैनंदिन व्यवहार जगतो तो रचनावाद, करून शिकणे रचनावाद. स्वत:हून शिकणं हा रचनावाद व दुसऱ्यांनी शिकविणे हा वर्तनवाद होय. कृतिशील, स्वयंशील शिक्षण म्हणजे रचनावाद. आज रचनावाद शाळेत राबवताना काही आव्हानांना सामोरे जावे लागेल.

यात १) प्रत्येक शाळेत परिवर्तनाची वेळ आली आहे हे ओळखता येणे. २) शिक्षकांची मानसिकता बदलणे. ३) पालक वर्गाचे प्रबोधन. ४) शासनाच्या स्तरावर परिवर्तन होत आहे पण संस्था चालकांचे मने यासाठी उघडण्याचे मोठे आव्हान आहे. यानंतर माझी शाळा ही चित्रफीत दाखवण्यात आली.

खुल्या अधिवेशनात उपस्थित प्रतिनिधीनी प्रश्न विचारले, यात अंगणवाड्या बालशिक्षण परिषदेस जोडा - श्री. संपत गायकवाड निवृत्त सह संचालक, ग्राममंगलने ऑनलाईन रचनावादी प्रशिक्षण द्यावे, पुढील काळासाठी बालशिक्षण परिषद कशी असावी, शोधनिबंध सादर करण्याबाबत मार्गदर्शन व्हावे, म.बा.शि.प.चे पदाधिकारी यांनी सहभाग घेतला. अधिवेशनात श्रीमती विशाखा देशपांडे यांनी ठरावांचे वाचन केले.

**अधिवेशनात पुढील ठराव करण्यात आले**

- शासनाने बालशिक्षणाचे पुढील महत्त्व लक्षात घ्यावे - बालकांच्या दृष्टीने या विशिष्ट वयातील (३ ते ६ वयातील) शारीरिक, बौद्धिक, भावनिक कौशल्य, सामाजिक मेंदूचा साधणारे हे क्षेत्र आहे.
- शालेय शिक्षणाच्या दृष्टीने मुलांची पूर्वतयारी करून देणारे, औपचारिक शिक्षणासाठी लागणारा क्षमतांचा पाया मजबूत करणारे आणि शाळेतील कामगिरी दर्जेदार करणारे असे क्षेत्र आहे.
- कुटुंबाच्या दृष्टीने, मुलांच्या वागणुकीतून कुटुंबाला व आशादायी बनविणारे, नातेसंबंध घट्ट करणारे, भावी काळात आर्थिक स्थिती सुधारणारे व सामाजिक स्थान उंचावणारे असे हे क्षेत्र आहे.
- समाजाच्या दृष्टीने, सामाजिक बेशिस्त कमी करणारे, गुन्हेगारी कमी करणारे, कायदा - न्यायव्यवस्था - सामाजिक सुव्यवस्था यांवरील भावी काळातील खर्चात बचत करणारे असे हे क्षेत्र आहे.
- राष्ट्राच्या दृष्टीने, गुंतवणुकीवर इतर कोणत्याही आर्थिक क्षेत्रापेक्षा जास्त परतावा देणारे, राष्ट्राच्या आर्थिक विकासास हातभार लावणारे असे हे क्षेत्र आहे.
- भारतीय नागरिकत्वाच्या दृष्टीने समता निर्माण करणारे, बंधुभाव मुलांच्यात रुजविणारे, न्याय्यतेची बूज राखणारे आणि पायाभूत व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व पटविणारे असे हे क्षेत्र आहे. म्हणून

१) शासनाने बालशिक्षणाला प्राधान्य देऊन त्याला विकासाच्या प्रयत्नात स्वतंत्र स्थान द्यावे, त्यासाठी आपल्या अंदाज पत्रकात दरसाल बाल-शिक्षणातील गुंतवणुकीसाठी वाढती तरतूद करावी.

२) बालशिक्षणासाठी समाजाकडून निधी उपलब्ध व्हावा, यासाठी सरकारने असे बाँडस्, जाहिरात करून विक्रीस काढावेत की, ज्यावर दहा ते बारा टक्के व्याजाने, पाच ते दहा वर्षांत बाँडधारकांना लाभ होऊ शकेल.

३) आयकर विभागाने, बालशिक्षणासाठी दिलेल्या देणग्यावर ८० जी कलमाखाली सवलत जाहीर करावी. आयकर पत्रकावर बालशिक्षणासाठी देणगी दिल्याचा उल्लेख होण्यासाठी चौकट असावी.

समारोप प्रसंगी उपस्थितप्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मा. श्री. विनोदकुमार लोहिया, मा. श्री पारसभाई ओसवाल महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती अलका बियाणी, शिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे पदाधिकारी, महाराष्ट्र व गोवा राज्यातून आलेले परिषदेचे सदस्य, सर्व शिक्षक, पालक आणि पत्रकार, उपस्थित होते.

**समारोप कार्यक्रमात -**

प्रमुख पाहुण्याच्या परिचय संयोजक श्री. राजगोंडा वळिवडे करून दिला, संपूर्ण तीन दिवस चाललेल्या अधिवेशनाचा आढावा - कार्यवाह श्री महालिंग स्वामी घेतला, कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती अलका बियाणी होत्या. आभार श्री. संजय पाटील यांनी मानले.

तीन दिवस चाललेल्या या अधिवेशनातून रचनावादी बालशिक्षण विषयावर शोधनिबंध, प्रमुख वक्त्यांचे विविध विषयांवरील भाषण, मा. प्रा.रमेश पानसे सरांच्या घेण्यात आलेली प्रकट मुलाखत, दाखवल्या गेलेल्या चित्रफीती, रचनावादी बालशिक्षणावर आधारित भरवलेल्या विविध विषय दालनातून व अधिवेशन काळात झालेल्या चर्चेतून समाजाला, शिक्षकांना, पालकांना जाग आली असेल अशी आशा व्यक्त झाली. शाळां-शाळातून रचनावादी शिक्षणाची प्रक्रिया सुरू व्हावी, ही इच्छा याप्रसंगी व्यक्त केली गेली.

❐❐

विशेष लेख

# पौगंडावस्थेतील विशेष मुलांच्या वर्तनाचे नियोजन

सुभाष कळसे

मतिमंद व्यक्तींपैकी जवळजवळ ५० ते ६० टक्के व्यक्तींमध्ये वर्तनसमस्या असतात. त्यामुळे पालक व शाळा यांच्यावर बराच ताण येतो. अशा व्यक्तींसाठी शालेय कार्यक्रम राबवताना शाळांना खूप अडचणी निर्माण होतात. कधी कधी या समस्यांचे आकलन चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे व या समस्या चुकीच्या पद्धतीने हाताळल्यामुळे समस्या दूर होण्याऐवजी त्या अत्यंत कठीण बनत जातात आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. मग शाळेत या मुलांबरोबर काम करणाऱ्या शिक्षक व सहकाऱ्यांवर ताण येतो. या मुलांसाठी ठरलेला शैक्षणिक कार्यक्रमच राबवायचा की, त्याच्या वर्तन-समस्या हाताळण्यात सर्व शक्ती खर्च करावयाची, असा गंभीर प्रश्न शाळांना- विशेषत: शिक्षकांना पडतो. मुलांच्या या वर्तनसमस्यांकडे गंभीरपणे न पाहता व त्याचे योग्य असे निराकरण न करता त्यांना शिकवत राहायचे म्हणजे 'पालथ्या घड्यावर पाणी' असा प्रकार आहे. तेव्हा त्यांच्या वर्तनाचे योग्य निराकरण करणे, यालाच प्रथम प्राधान्य घ्यावे लागेल. विशेषत: वयात आलेल्या मुला-मुलींच्या समस्या व त्यांचे वर्तनप्रकार जरा वेगळ्या प्रकारे हाताळावे लागतील आणि त्यावर विचारपूर्वक उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरते.

**समस्यांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे :** आधुनिक विचारप्रवाहानुसार मुलांच्या या वर्तनाकडे 'समस्या' म्हणून न पाहता एक वर्तन अवस्था म्हणून पाहावे. त्याकडे 'समस्या' या नकारात्मक दृष्टिकोनातून पाहू नये. ही विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा आणणारी एक अवस्था आहे. ती आपणास बदलावयाची आहे व सामाजिक दृष्ट्या ती अस्वीकार्य पण आहे. मुला-मुलींच्या या वर्तनप्रकाराला अनेक प्रकारची कारणे असतात. बाजूचे वातावरण, परिस्थिती, प्रसारमाध्यमे, मुलांमध्ये झालेले वयानुरूप शारीरिक-भावनिक बदल इत्यादींमुळे मुला-मुलींचे हे वर्तनप्रकार घडत असतात.

हे वर्तनप्रकार बदलण्यासाठी शाळा काय करू शकते? तर, आपल्या आवाक्यातील परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करू शकते. समाजातील वातावरण, प्रसारमाध्यमे यांबाबत शाळा काही करू शकत नाही. फार फार तर मुलांचे कौटुंबिक वातावरण योग्य राहण्यासाठी किंवा या मुलांचे वर्तनप्रकार योग्य प्रकारे हाताळण्यासाठी पालकांना मार्गदर्शन करू शकेल. तथापि, शाळापातळीवर काही कार्यक्रम राबविला तर मुलांच्या वर्तनात बऱ्याच अंशी बदल होईल, असे वाटते.

**मुलांचे वर्तनप्रकार :** पौगंडावस्थेतील मुलांचे शाळेमध्ये काही वर्तनप्रकार घडतात आणि ते इतरांना त्रासदायक ठरतात व शालेय कार्यक्रम व्यवस्थित चालण्याच्या प्रक्रियेत अडथळा ठरतात. सर्व-साधारणपणे त्यांच्या वर्तनसमस्या पुढीलप्रमाणे -

**मुलींना चिडवणे :** दैनंदिन जीवनात शाळेमध्ये मुले मुलींना चिडवतात किंवा मुली मुलांना चिडवतात, तर काही मुले-मुली विशिष्ट मुला-मुलींनाच चिडवतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये सतत तक्रारी होतात व त्याचे निराकरण करणे ही शिक्षकांची नित्याची डोकेदुखी होते.

**एकमेकांना खाणाखुणा करणे :** वर्गामध्ये शिक्षणप्रक्रियेच्या वेळी किंवा इतर वेळी मुले-मुली एकमेकांना खाणाखुणा करतात किंवा विनाकारण हसतच बसतात. यामुळे शिक्षकांना शिक्षणप्रक्रियेमध्ये अडचण निर्माण होते.

**साहित्य लपवणे :** काही वेळा मुले-मुली एकमेकांचे दप्तर, डबा, पेन, वही, चप्पल लपवून ठेवतात. त्यामुळे त्यांच्यात तक्रारी होऊन वर्गातील वातावरण गढूळ होते.

**कागदावर, भिंतीवर एकमेकांची नावे लिहिणे अथवा चित्र, आकृत्या काढणे :** असे व अशासारखे प्रकार ही मुले-मुली करतात. तसेच सौम्य मतिमंदत्व असणारी मुले चिठ्ठी लिहिण्याचे प्रकार करतात व यामुळे त्यांच्यामध्ये तक्रारी होतात.

**एकमेकांना स्पर्श करणे :** काही मुले-मुली एकमेकांना जाणूनबुजून स्पर्श करतात, ढकलतात. यामुळेदेखील त्यांच्यामध्ये तक्रारी होत असतात.

**मुले मुलींना कमी लेखतात :** काही मुले काही विशिष्ट कामे मुलींनीच करावीत- हे आमचे काम नाही, असे म्हणतात. उदा. झाडून काढणे, स्वयंपाकातील काही कामे ही मुलींनीच करावीत; ती कामे मुलांची नाहीत व ती केल्याने आमचे महत्त्व कमी होते, असे त्यांना वाटते. यामुळे सर्वसमावेशक श्रमाचे महत्त्व कमी होते.

**मुला-मुलींचे संबंध जोडणे :** काही मुले-मुली काही मुलींचा संबंध लावून त्याचा प्रचार वर्गातील समूह वातावरणात करतात. त्यामुळे संबंधित मुला-मुलींना त्रास होतो व यामुळे वर्गातील वातावरण गढूळ होऊन तक्रारींमध्ये वाढ होते.

अशा व अशा प्रकारचे काही वर्तनप्रकार मुला-मुलींकडून घडतात. यासाठी त्यांना दोष न देता त्याकडे वास्तव दृष्टिकोनातून पाहून व त्यांना याबाबत अपमानित न करता किंवा त्यांची स्वप्रतिमा विकृत होईल अशी शेरेबाजी न करता कौशल्याने अशा वर्तनास हाताळावे लागते. कारण त्यांच्यामध्ये वयानुरूप झालेल्या भावनिक, मानसिक, शारीरिक बदलांचा तो दृश्य आविष्कार असतो. फक्त त्यास विकृत वळण लागून समस्या निर्माण होऊन शालेय कार्यक्रम विस्कळीत होऊ नये, एवढे पाहावे. या वयामध्ये ही व अशासारखी वर्तने गृहीतच धरायची असतात. आपण फक्त त्यास



**विशेष मुलांना योगथेरपीचा फायदा होतो असे दिसून आले आहे.**

सकारात्मक दृष्टिकोनातूनच हाताळणे गरजेचे असते. एखाद्या वर्तनाचा जर अतिरेक होत असेल, तर विद्यार्थ्यास सौम्य प्रकारची शिक्षा करावी. तथापि, शाळापातळीवर काही वर्तनसुधार कार्यक्रम जर जाणीवपूर्वक व प्रामाणिकपणे कौशल्यपूर्ण रीत्या राबवले, तर यासारख्या वर्तन अवस्थेवर योग्य प्रकारे नियंत्रण राहू शकते, असा अनुभव आहे. हे उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत -

**मुला-मुलींना एकत्रित करून त्यांचे खेळ, प्रश्नमंजूषा / कोडी असा उपक्रम :** आठवड्यामध्ये एक-दोनदा या मुला-मुलींना एकत्रित करून त्यांना 'चंपक'सारख्या पुस्तकातील कोडी, प्रश्नमंजूषा सोडवण्यासारखे उपक्रम घ्यावेत; जेणेकरून ते सहभागी होऊन त्यांच्यामध्ये सकारात्मक व खेळमेळीचे वातावरण निर्माण होईल आणि सहकार्याचे, एकोप्याचे संबंध निकोप राहतील.

**वर्तनसमस्या असणाऱ्या मुला-मुलींसाठी मूल्यशिक्षण तासिका :** या विषयाच्या तासिकेचा या मुला-मुलींसाठीचा वर्तनप्रकारचा संदर्भ घेऊन काही उदाहरणे- मुख्य गोष्टीद्वारे मार्गदर्शन करावे, काही प्रसंगांचे वर्णन त्यांना सांगावे व त्यासंबंधी त्यांना त्यांचे मत व्यक्त करण्यास सांगावे; म्हणजे आपणास जे त्यांना शिकवावयाचे आहे, तो आशय त्यांच्या मानसिक पातळीपर्यंत जाईल.

**वर्तनसमस्या असणाऱ्या 'प्रौढ मुला-मुलींसाठी प्रौढ जीवन तासिका :** या तासिकेमध्ये ठरवलेल्या अभ्यासक्रमाबरोबरच संबंधित शिक्षक/ शिक्षिकेने त्यांच्या सद्य:स्थितीतील वर्तनप्रकाराचा अप्रत्यक्ष संदर्भ घेऊन त्यांना मार्गदर्शन केले, तर ते जास्त परिणामकारक ठरेल. या तासिकेला मुला-मुलींना त्यांच्या भावना मनमोकळेपणे व्यक्त करण्याची मुभा द्यावी. यामुळे त्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल होण्याची शक्यता अधिक असते.

**त्यांना आवडता बौद्धिक गृहपाठ देणे :** सौम्य पातळीच्या मुला-मुलींना त्यांच्या आवडीची गणिते, शब्द-वाक्ये यांचे लेखन करण्यास आवडते. असा

आवडता गृहपाठ त्यांना करण्यास द्यावा. रिकाम्या जागा भरणे, म्हणी पूर्ण करणे, असा व अशा स्वरूपाचा गृहपाठ; तसेच कोडी सोडवणे, पाढ्यांच्या रिकाम्या जागा भरणे असा गृहपाठ मुलांना दिला, तर त्यांच्या बुद्धीला चालना मिळेल व त्यांचा वेळ सकारात्मक बाबींमध्ये जाईल.

**नवनिर्मितीचे उपक्रम :** या मुला-मुलींना रिकाम्या वेळेमध्ये सृजनशील-उपक्रमशील कामांमध्ये गुंतवावे. उदा.-कोलाजवर्क, मातीकाम, हस्तकला. तसेच शाळेतील सण-उत्सवाची सांगड घालून काही उपक्रम कृती करून घ्याव्यात. उदा.-दिवाळीच्या वेळी किल्ला करून घेणे, सोपे आकाशकंदील करून घेणे, बेंदूर/पोळा सणाचे वेळी मातीचे बैल तयार करणे, राख्या बनवणे इ. यामुळे त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळेल व त्यांच्या मानसिकतेला चांगले वळण लागेल.

**ॐकार थेरपी / योगाथेरपी :** विद्यार्थ्यांना संगीताची जोड देऊन- उदा. हार्मोनियमचा वापर- येथे नियमितपणे ॐकार करून घेतला, तर त्यांच्यामध्ये निश्चित बदल होतो. हे अनुभवाने व प्रयोगाने सिद्ध झाले आहे. त्यांच्याकडून योगासने नियमितपणे करून घेतली, तरी ही मुले स्थिर व शांत होतात. त्यांच्यामधील चळवळेपणा, शीघ्रकोपीपणा कमी होण्यास मदत होते. त्यांच्यामधील या शिल्लक ऊर्जेचा वापर इतर सकारात्मक कार्यासाठी करता येईल.

**गप्पांचा कार्यक्रम -** अनुभवी शिक्षक-शिक्षिकांच्या उपस्थितीत पूर्वनिर्धारित काही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून मुला-मुलींचे गप्पा/चर्चांचे कार्यक्रम ठेवावेत. विद्यार्थ्यांना त्यामध्ये अनौपचारिकता वाटली पाहिजे. शिक्षकांनी त्यांचे कौशल्य वापरून गप्पांना चालना द्यावी. शिक्षकांनी त्यांना बोलते करावे. समाजमान्य मोकळ्या गप्पांमुळे त्यांचे आपापसातील संबंध निरोगी होण्यास मदत होईल.

**लेझीम/झांज खेळाचे आयोजन करावे :** वाद्यांच्या तालावर विद्यार्थ्यांना लेझीम व झांजवादनाचे वेगवेगळे प्रकार करण्यास आवडतात. मुले-मुली बेधुंद होऊन खेळत राहतात. त्यामुळे त्यांच्या अंगातील ऊर्जेला वाट मिळते. त्याचा सकारात्मक परिणाम असा की, त्यांच्या वर्तन समस्या कमी होण्यास मोलाची मदत होते. यात नियमितपणा असल्यास त्याचा परिणाम ठळकपणे जाणवतो.

**म्युझिक / डान्स थेरपी :** मुलांच्या वर्तनसमस्या कमी करण्यासाठी हल्ली बऱ्याच शाळांमध्ये म्युझिक- डान्स थेरपीचा वापर करतात व तज्ज्ञही असे सुचवतात. ठेका धरावयाला लावणारे म्युझिक मुलांना लावून दिले, तर मुले बेधुंद होऊन नाचतात. मुला-मुलींचे वेगवेगळे गट करून ही थेरपी द्यावी, त्यामुळे मुलांच्या अंगातील ऊर्जेला वाट मिळून ते शांत होतात.

**सांस्कृतिक उपक्रम घेणे :** मुलांच्या वर्तनाला सकारात्मक वळण लागावे म्हणून शाळांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे. मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांना यामध्ये सक्रियपणे सहभागी करावे. त्यांना नियोजनात सहभागी करून घ्यावे. उदा.- गणेशोत्सव, रंगपंचमी, होळी, दहीहंडी इ. असे कार्यक्रम घ्यावेत. 'माइल्ड, मॉडरेट' विद्यार्थ्यांची जयंती, पुण्यतिथी कार्यक्रमात तयारी करून घेऊन त्यांना भाषणे करावयाची संधी उपलब्ध करून द्यावी. विविध नकलांचा/ अभिनयाचा कार्यक्रमदेखील आयोजित करण्यात यावा आणि मुलांना आपल्या सुप्तकलागुणांच्या सादरीकरणास वाव द्यावा. एक 'सामाजिक उपक्रम' म्हणून हे उपक्रम राबवावेत. विद्यार्थ्यांवर विविध छोट्या-छोट्या जबाबदाऱ्या सोपवून त्यांना यामध्ये सहभागी करून घ्यावे. यामुळे शाळेमध्ये मुला-मुलींमध्ये चांगले वातावरण निर्माण होण्यास मदत होईल व त्यामुळे मुलांच्या वर्तनसमस्यांवर नियंत्रण आणता येईल.

हे कार्यक्रम शिक्षकांवरील जबाबदाऱ्या निश्चित करून व नियोजनपूर्वक, जाणीवपूर्वक, प्रामाणिकपणे राबवल्यास मुलांना शैक्षणिक कौशल्येसुद्धा शिकवणे सोपे जाईल, असे वाटते. पर्यायाने शालेय कार्यक्रम तणावरहित होऊन मुलांवर शैक्षणिक संस्कार करणे सर्वांना शक्य होईल, असे वाटते.

❐❐



विशेष लेख

# शिक्षकांच्या आत्महत्या

**हेरंब कुलकर्णी**

माझ्या शाळेतील चिमुकल्यांसाठी तिळ-तिळ तुटतो मी, त्यांच्या समोरच देशद्रोही अपराध्याप्रमाणे बोललात तुम्ही... सांगा आता त्यांच्या निष्पाप नजरेस काय उत्तर देऊ मी?

त्या रात्री आपण कोठे होतात? काय करत होतात? माहीत नाही मला, पण मला मात्र माझे निष्कलंक चारित्र्य झोपू देत नव्हते... सांगा एवढा मोठा डाग कसा व कोठे लपवू मी?

सांगा का लाचखोर म्हणून निलंबित होऊ मी?

ही कविता नाही किंवा एखाद्या नाट्यप्रयोगतील स्वगत नाही. मेळघाटातील विजय नकाशे या संवेदनशील शिक्षकाने शाळेत केलेल्या आत्म-हत्येपूर्वीची ही sucide नोट आहे. पंचायतराज समितीच्या भेटीत शालेय पोषणचा तांदूळ कमी भरला. त्या समितीने निलंबन करण्याची भाषा केली. त्या शिक्षकाने वरील आशयाची sucide नोट लिहून शाळेतच आत्महत्या केली. ती संपूर्ण नोट वाचल्यावर लक्षात येते की- खूप प्रामाणिक वागणाऱ्या माणसावर नुसता आरोप जरी केला, तरी त्याचा आत्मसन्मान टोकाचा दुखावतो. नकाशे सर याचे उदाहरण

आहेत. तांदूळ कमी भरण्याचे कारण त्यांनी लिहिले आहे- जे ठेकेदार तांदूळ पुरवितात, ते गोणीमागे ५ ते १० किलो तांदूळ कमी देतात व वाद घातला तर 'पुन्हा घेऊन जाऊ का' अशी भाषा करतात. मुले उपाशी राहू नयेत, म्हणून सरांनी तांदूळ स्वीकारला आणि दोष त्यांच्यावर आला. ते सहन न होऊन त्यांनी आत्महत्या केली.

शिक्षणक्षेत्रातील आत्महत्या हा स्वतंत्र चर्चेचा एक विषय करावा, इथपर्यंत ती संख्या वाढते आहे. परीक्षा रद्द करण्यापूर्वी देशात विद्यार्थी आत्महत्या हे एक गंभीर आव्हान लक्षात आले होते. या विषयावर मी 'परीक्षेला पर्याय काय?' हा ग्रंथ संपादित केला; तेव्हा लक्षात आले की, देशात केवळ नापास झाल्यामुळे आत्महत्या करणाऱ्यांची संख्या वर्षाला ४००० इतकी प्रचंड आहे. कुसुमाग्रजांनी यावर महाराष्ट्र टाइम्समध्ये 'थांबवा ही कत्तल' असा लेख लिहिला होता.. स्वाती पिटके आणि दीपाली कोल्हे या शेतकरी कुटुंबातील दोन मुलींनी केलेल्या आत्महत्यांनी शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी सुद्धा आत्महत्येच्या टोकावर उभे आहेत, असा एक नवाच मुद्दा पुढे आला

विद्यार्थी आत्महत्येबरोबर आज शिक्षकांच्या आत्महत्याही चिंतेचा विषय होत आहे. शाळा बांधकामातील तणावामुळे माझ्याच अकोले तालुक्यातील जालिंदर जाधव, यवतमाळ जिल्ह्यात कळंब तालुक्यातील सुधाकर ठाकरे, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथील शिक्षक बेंडे, वर्धा जिल्ह्यातील कारंजा येथील नेतराम ढोबाळे व नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील मोहन बंडू गावित या शिक्षकांनी शाळेतच गळफास घेवून आत्महत्या केली तर थकीत वेतनासाठी धरणे आंदोलन करणारे हिरामण भंडाणे-चौसाळा यांनी आत्महत्या केली. बांधकाम, शालेय पोषण आहार या अशैक्षणिक कामांच्या तणावातून गेल्या १० वर्षांत किमान २५ आत्महत्या झाल्या आहेत. आर्थिक विपन्नावस्था असलेल्या व्यक्तींच्या आत्महत्यांचे विश्लेषण करणे तुलनेत सोपे होते; परंतु चांगला पगार आणि नोकरीतील सुरक्षितता असूनही माणसांना जगणे का नकोसे वाटते, या प्रश्नाचे उत्तर शोधणे नक्कीच कठीण आहे.

याचा दुसरा अर्थ असा आहे की- आर्थिक सुरक्षेपेक्षा जगणे नकोसे वाटावे असे तणाव त्याच्या नोकरीत आहेत. आत्महत्या माणसे का करतात, याची जी कारणे मानसोपचारतज्ज्ञ सांगतात; त्यात नैराश्य, एकटेपणा वाटणे, मनाची एकलकोंडी वृत्ती, मनाला न पेलणारा तणाव असे काही मुद्दे सांगितले जातात. यातला तीव्र टोकाचे तनाव याच्याशी या शिक्षक आत्महत्या जोडता येतील. महाराष्ट्रातील पोलीस विभागात अनेक पोलीस कामावर असताना मृत्यू पावले; काहींनी स्वत:वर तर काहींनी वरिष्ठांवर गोळ्या झाडल्यात. शिक्षकी पेशात ज्या आत्महत्या झाल्या आहेत, त्याचे तपशील जमविले; तेव्हा बांधकाम या कामाने सर्वांत जास्त बळी गेले आहेत, हा निष्कर्ष आला. देशात सर्व शिक्षण अभियान आले. या अभियानात सर्वांत जास्त बांधकामे झाली. ती बांधकामे नावाला शाळेच्या व्यवस्थापन समितीने करावीत असे अपेक्षित होते, तरीसुद्धा ते काम शिक्षकांना करावे लागायचे आणि आर्थिक व्यवहार मात्र सरपंचाच्या हातात होते. सरपंचांनी रकमा खर्च करून टाकणे, ठेकदार मित्राला काम देऊन त्याने फसवणूक करणे, निकृष्ट सामान वापरून त्याचा दोष शिक्षकावर येणे- असे अनेक प्रकार घडले. पुन्हा गावातील दोन गटांचे राजकारण. ग्रामसभेत होणारी चर्चा, भ्रष्टाचाराची तक्रार यात अनेक शिक्षक भरडले जायचे आणि दुसरीकडून काम पूर्ण न केल्यास पगार थांबविले जाण्याच्या धमक्या अधिकारी द्यायचे. यातून शिक्षकांनी आत्महत्या केल्या.

संस्थाचालकांच्या दमदाटीतून होणाऱ्या आत्महत्या हाही एक पैलू आहे. मागच्या आठवड्यात एका प्रसिद्ध राजकीय नेत्याच्या संस्थेतील शिक्षकाने आत्महत्या केली. हिंगणघाट येथील शिपायाने 'नोकरी सोड, नाही तर काढून टाकू' या दमदाटीमुळे नोव्हेंबर २०१४ मध्ये आत्महत्या केली होती. खासगी संस्थाचालक हे एक स्वतंत्र संस्थान असते. त्या दहशतीतले अत्याचार बाहेरही येत नाहीत.

शालेय पोषण आहार योजना ही आज शिक्षकांच्या मोठ्या तणावाचे कारण बनत आहे. जो तांदूळ गावातील रेशन दुकानात मिळतो आणि जे तेल, मीठ, मिरची गावाच्या दुकानात मिळते; ते आज ठेकेदारामार्फत राज्यातील प्रत्येक शाळेला पोहोचविले जाते. यात प्रवासाचा खर्च आणि त्यामुळे वाढणारी किमत हा बोजा विनाकारण वाढतो. कुठलीच व्यवहार्यता नसलेली ही कल्पना केवळ ठेकदार पोसण्यासाठी आणि त्याच्याकडून मिळणाऱ्या कमिशनसाठी राबवली जाते. या राजकीय पाठबळामुळे हे उद्दाम ठेकेदार अत्यंत निकृष्ट माल पुरवितात, तांदूळ कमी पुरवितात आणि अधिकारी मात्र तपासणी करताना शिक्षकांना जाब विचारतात. विजय नकाशे हा या ठेकेदारीचा बळी आहे. गॅस मिळविणे, भाजीपाला आणणे व किचकट रेकॉर्ड लिहिणे या सगळ्यात तणाव वाढत जातो.

एक व्यवस्था म्हणून प्रश्न हा पडतो की- ठेकेदारांना जाब विचारला जात नाही, बांधकामात भ्रष्टाचार करणाऱ्या सरपंचांना शिक्षा नाही आणि कारवाईची धमकी मात्र शिक्षकांना दिली जाते; ज्या पंचायतराज समितीच्या भेटीमुळे ही आत्महत्या झाली. अशीच आत्महत्या जालिंदर जाधव या शिक्षकाने अहमदनगर जिल्ह्यातील अकोल्यातील पंचायतराज समितीच्या भेटीच्या वेळी बांधकामाच्या तणावातून केली होती. तेव्हा पंचायतराज समितीच्या भेटीने दोन आत्महत्या झाल्या असतील तर या समितीच्या कार्यपद्धती-बद्दलही जाहीर चर्चा करावी लागेल. या समितीसाठी कर्मचाऱ्यांकडून सक्तीने पैसे गोळा केले जातात

लोकप्रतिनिधीवर मात्र कुठेही या आत्महत्यांची जबाबदारी येऊ दिली जात नाही, हाही एक पैलू लक्षात घ्यायला हवा. बांधकामात इतक्या सरपंचांनी घोटाळे केले, पण शिक्षकाला जबाबदार धरले गेले. आज शालेय पोषण आहारात ठेकेदारांना राजकीय संरक्षण देणारे सुरक्षित आहेत. किंबहुना, नकाशे आत्महत्येचा धक्कादायक उत्तरार्ध हा आहे की- ज्या आमदारांनी त्यांना अवमानित केले, त्यांची साधी चौकशीही नाही; उलट ज्या अधिकाऱ्याने सर्वांत शेवटची भेट त्या शाळेला दिली, त्या पंडित पंडागळे नावाच्या शिक्षकांचा मंच चालविणाऱ्या लोकप्रिय अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

यामध्ये पुन्हा प्रशासन आणि शिक्षक यातील संबंधाचा मुद्दा पुढे आला आहे.... ब्रिटिश प्रशासन-पद्धतीने आपल्या प्रशासनाची रचना झाल्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्या संबंधांत एक उतरंड आहे. खालच्या पायरीवर असलेल्या व्यक्तीला गुलाम समजण्याची मानसिकता आहे. यातून तळाच्या उतरंडीवर असलेल्या व्यक्तीवर तणाव वाढत जातो.

तणावातून झालेले मृत्यू हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. नगर जिल्ह्यातील अकोल्यात गुहिरे या कायमस्वरूपी शाळेत १५ वर्षे बिनपगारी काम केलेल्या मुख्याध्यापकाचा मृत्यू झाला. हा मृत्यू आत्महत्ये-इतकाच करुण आहे. महाराष्ट्रातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आता निराश झालेत. १५ वर्षे विनावेतन काम करून व १०० आंदोलने करूनही शासन ऐकत नसल्याने त्यांच्यातील अनेकजण नैराश्येच्या गर्तेत आहेत.

शेतकरी आत्महत्येच्या वेळी एक मुद्दा असा आला होता, की- शेतकरी आंदोलने जेव्हा भरात होती, तेव्हा शेतकऱ्यांना एक आधार वाटत होता आणि नंतर ती मोडली, तेव्हा एकटेपणा वाढला. शिक्षकांच्या समस्यांबाबत शिक्षक संघटना या तणावग्रस्त शिक्षकांना आधार का वाटत नाहीत; हे प्रश्न सोडवायला शिक्षक-नेते कमी पडताहेत का, हाही यानिमित्ताने उपस्थित झालेला महत्त्वाचा प्रश्न आहे.

तेव्हा अशैक्षणिक कामे तातडीने काढून घेणे, शिक्षकांशी संवाद निर्माण होईल असे अधिकाऱ्यांचे वर्तन असणे आणि शिक्षकांना एकमेकांशी संवाद (whats up वर नव्हे) करता येईल, अशी व्यासपिठे गावोगावी निर्माण होणे, हेच यावर दीर्घकालीन उत्तर आहे.

❒❒

# वृत्तविश्व

विश्व वृत्त

## पृथ्वीचे वाढते तापमान : धोक्याचा इशारा

लंडन : वाढत्या तापमानाच्या धोकादायक प्रभावामुळे जीवसृष्टीवर ओढवणाऱ्या संकटाबाबत गंभीर इशारा देत ब्रिटनमधील एका विद्यापीठातील संशोधकांनी सृष्टीवर ओढवणाऱ्या संकटाकडे अवघ्या जगाचे लक्ष वेधत वेळीच उपाययोजना करण्यास सुचविले आहे.

समुद्राचे तापमान काही अंशांनी वाढल्यास पृथ्वीवरील ऑक्सिजनचे (प्राणवायू) प्रमाण कमी होऊ शकते. परिणामी, प्राणी आणि लोकांच्या मोठ्या संख्येने मृत्यूने सृष्टीचे रूपांतर मरुभूमीत होऊ शकते, असा इशारा या संशोधकांनी दिला आहे. पृथ्वीवरील तापमान अधिक वाढणार नाही, यासाठी काय काय उपाय करणे आवश्यक आहेत, यावर पॅरिस येथे जगभरातील नेते, पर्यावरणतज्ज्ञ विचारमंथनासाठी एकवटले असताना ब्रिटनमधील युनिव्हर्सिटी ऑफ लिसेस्टरमधील संशोधकांनी हा अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढत समस्त मानवजातीचे डोळे उघडले आहेत. समुद्राचे तापमान २१०० पर्यंत जवळपास ६ अंश सेल्सिअसवर गेल्यास ऑक्सिजनचे प्राणवायू उत्सर्जनच संपुष्टात येईल. ऑक्सिजनच अवघ्या सृष्टीचा प्राण आहे. प्राणवायूचे प्रमाण कमी झाल्यास एकूणच जीवसृष्टीचा नाश ओढवेल, असे येथे सांगितले.

पृथ्वीवर भविष्यात ओढवणाऱ्या संकटांपैकी सर्वाधिक भयानक संकट असेल ते पुराचे थैमान. अंटार्क्टिकामधील बर्फ वितळून येणाऱ्या पुराने जगभरात हाहाकार उडेल; परिणामी, जीवसृष्टीचा नाश होऊ शकतो, असे या विद्यापीठातील गणित विभागाचे प्रो. सर्गेई पेट्रोव्हस्की यांनी सांगितले.

## चीनमधील पालकांना मिळणार दिलासा

बीजिंग - 'द चायना फाउंडेशन फॉर पॉवर्टी' या स्वयंसेवी संस्थेने सिचुआन प्रांतात एका पथदर्शी प्रकल्पाची सुरुवात केली आहे. या प्रकल्पांतर्गत नोकरीनिमित्त बाहेर राहणाऱ्या पालकांची मदत करण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे.

पालकांच्या अनुपस्थितीत त्यांच्या पाल्यांकडे लक्ष देणारे कोणीही नसते. हा प्रकल्प ३ वर्षांसाठी पथदर्शी स्वरूपात राबविण्यात येईल. सिचुआन प्रांतातील १०० गावांची यासाठी निवड करण्यात आली आहे. एका गावासाठी एक आई, अशी याची संकल्पना आहे. ही नियुक्त केलेली महिला (आई) गावातील सर्व बच्चे कंपनीची देखभाल करेल. त्यासाठी तिला वेतन दिले जाईल. ही योजना यशस्वी झाली, तर सिचुआन प्रांतातील ३५ हजार मुलांच्या देखभालीचा प्रश्न मिटेल. त्यानंतर इतर प्रांतांतही याची अंमलबजावणी करण्याचा संस्थेचा विचार आहे.

राष्ट्र वृत्त

## कॅन्सरवर नवी उपचारपद्धती विकसित

भोपाळ - मध्य प्रदेशातील भोपाळ येथील डॉ. पल्लवी तिवारी यांनी अमेरिकेत राहून कॅन्सरवरील उपचाराची नवी प्रणाली विकसित केली आहे. त्याआधारे रुग्णांना कोणत्या स्वरूपाच्या उपचारांची कितपत गरज आहे हे सांगणे शक्य होणार आहे. अशा स्वरूपाचा हा जगातील पहिलाच अभ्यास व संशोधन असल्याचा तसेच यामुळे कॅन्सरवरील उपचार प्रणालीत आमूलाग्र बदल होईल, असा दावा डॉ. पल्लवी तिवारी यांनी केला आहे.

या उपचारात कॅन्सरच्या रुग्णांची ऑप्टीमाइज्ड ट्रीटमेंट करणे शक्य होईल. त्यामुळे डॉक्टरांना हे

ठरवणे सोपे जाईल की, रुग्णाला कोणत्या प्रकारची किती औषधे देण्याची गरज आहे, अथवा त्याला केमो थेरेपी (रेडिएशन) द्यावी लागेल किंवा नाही. यामुळे कॅन्सरच्या नव्या औषधी बनवण्यासाठीदेखील मदत मिळणार आहे. यूएसमधील स्ट्रगर्स विद्यापीठासह जगातील ८ इन्स्टिट्यूटसोबत गेल्या नऊ वर्षांपासून डॉ. पल्लवी या प्रकल्पावर संशोधन करत आहेत. रविवारी त्यांनी शिकागो येथील रेडिओलॉजिकल सोसायटीच्या शास्त्रज्ञांसमक्ष ब्रेन ट्यूमरवरील प्रभावी उपचारासाठी आपल्या संशोधन पेपरचे सादरीकरण केले. त्यात त्यांनी ६२ कॅन्सर रुग्णांवर करण्यात आलेल्या अभ्यास व त्यातील यशस्वी उपचारांचा तपशील दिला आहे. या प्रयोगात डॉ. पल्लवी यांनी प्रत्येक रुग्णाच्या उपचारांचे प्रकृतीनुसार विवेचान केले. त्याचा उपयोग त्यांना प्रयोगाच्या निष्कर्षांसाठी झाला. कॅन्सरवरील प्रभावी उपचारासाठी जगभरात संशोधन सुरू आहे. देशभरात दरवर्षी कॅन्सरच्या १० लाख रुग्णांची भर पडते. वेळेवर निदान आणि चांगल्या उपचारांअभावी निम्म्या रुग्णांचा मृत्यू होतो. डॉ. पल्लवी यांच्या संशोधनामुळे त्यांना मोठा दिलासा मिळू शकेल.

## नवे लोकाभिमुख शैक्षणिक धोरण तयार होणार

**नवी दिल्ली :** सर्व राजकीय पक्षांसोबत विचारविनिमयाद्वारे नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यात येत असून पुढील वर्षी ते सादर केले जाईल, अशी अपेक्षा केंद्र सरकारने सोमवारी व्यक्त केली.

लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी सांगितले की, भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने ग्रामपंचायती, शहरातील स्थानिक स्वराज संस्था, ब्लॉक आणि जिल्हा स्तरावरील सर्व पक्षांचे मत जाणून घेत नवे लोकाभिमुख शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात १ लाख ग्रामपंचायती, ५ हजारांवर ब्लॉक, १२०० शहरी स्थानिक संस्था, ५७३ जिल्ह्यांनी मत मांडले असून खासदारांकडूनही सूचना मागविण्यात आल्या आहेत.

**रा ज्य वृ त्त**

## आदिवासी बोलीभाषेत पाठ्यपुस्तके

पुणे - राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहोचावा, यासाठी त्यांना समजणाऱ्या बोलीभाषेतील पुस्तके तयार करण्यात येत आहेत. विशेषत: आदिवासी विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी बोलीभाषांतील द्वैभाषिक पुस्तके तयार केली जाणार आहेत. या वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकांची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे (विद्या परिषद) सोपवण्यात आली आहे.

राज्याचे शिक्षण आयुक्त पुरुषोत्तम भापकर यांनी ही माहिती दिली. भापकर म्हणाले, ''प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील आदिवासी क्षेत्रात १६ बोलीभाषांचा वापर प्रामुख्याने केला जातो. त्यांपैकी १० बोलीभाषांमध्ये आदिवासी मुलांसाठी व त्यांच्या शिक्षकांसाठी पुस्तके तयार केली जाणार आहेत. यातून आदिवासी मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल आणि त्यांची शिक्षणप्रक्रियेतील गळती थांबून शिक्षणात सातत्य येण्यास मदत होईल. बोलीभाषेत पुस्तके मिळाल्यावर भाषेची गोडी वाढेल, विषय समजेल आणि आकलनही सुधारेल.'' असेही ते म्हणाले.

## ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी ५% आरक्षण

इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंत सलग किमान तीन वर्षांचे शिक्षण ग्रामीण भागांतील जिल्हा परिषद शाळेतून घेतलेल्यांना उच्च शिक्षण किंवा सरकारी नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

उच्च शिक्षणाचे प्रवेश आणि सरकारी नोकऱ्या ही केवळ शहरी भागांतील इंग्रजी माध्यमांच्या कॉन्व्हेन्ट शाळांमध्ये शिकलेल्यांची मक्तेदारी होऊ नये, यासाठी शालेय शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून, त्या संबंधीचा शासन निर्णय (जीआर) ११ नोव्हेंबर रोजी जारी करण्यात आला आहे. या निर्णयानुसार राज्याच्या ग्रामीण भागांतील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये इयत्ता १ली ते इयत्ता ७वी किंवा ८वीपर्यंत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वीनंतरच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये किंवा राज्य शासनाच्या वर्ग २, वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षण दिले जाईल. हे आरक्षण सन २०२० पासून लागू होईल.

### कोल्हापूर येथील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित

कोल्हापूर जिल्ह्यातील १५ हजार विद्यार्थ्यांचे अद्याप शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्जही भरलेले नाहीत. गेल्या वर्षीही शिष्यवृत्तीचे साडेचार कोटी रुपये परत गेले होते. त्यामुळे शिष्यवृत्तीप्रश्नी माध्यमिक शिक्षण आणि समाजकल्याण विभागाचे प्रशासन उदासीन असल्याचे स्पष्ट होत आहे.

तत्कालीन उपायुक्तांच्या सहीचे लेखी आदेश नसल्यामुळे मागासवर्गीय व अनुसूचित विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीपोटी शासनाकडून आलेले १ कोटी ४५ लाख रुपये बँकेच्या खात्यावर सहा महिन्यांपासून पडून आहेत. परिणामी, शैक्षणिक वर्ष निम्मे संपले तरी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागले आहे.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतून प्रत्येक शैक्षणिक वर्षात पाचवी ते सातवीच्या विमुक्त-भटक्या जमाती, अनुसूचित जाती आणि आठवी ते दहावीपर्यंतच्या मागासवर्गीय विद्यार्थिनीला वर्षाला ६०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. नववी ते दहावीपर्यंत शिकणाऱ्या अनुसूचित जमातीची मुले आणि मुली यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती म्हणून १ हजार रुपये मिळतात.

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापकांकडून ऑनलाइन भरून जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे मंजुरीसाठी पाठविले जातात. मात्र प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे गेल्या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नाही. शिष्यवृत्तीचे साडेचार कोटी रुपये शासनाकडे परत गेले. यंदाही माध्यमिक शिक्षण आणि समाजकल्याण विभागांनी एकमेकांकडे बोट दाखवीत जबाबदारी झटकली आहे.

## शिक्षणवेधचा हा अंक तुम्हाला कसा वाटला?

**शिक्षणवेधविषयी तुमच्या अपेक्षा, सूचना, प्रतिक्रिया आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. यासाठी तुम्ही shikshanvedh@grammangal.org या मेलवर संपर्क साधू शकता. तसेच ९४२३५८०१४५ या भ्रमणध्वनीवर संदेश पाठवू शकता. आपल्या सूचनांचा आम्ही आवर्जून विचार करू. तसेच निवडक प्रतिक्रियांचा समावेश पुढील अंकातून करू.**

**शिक्षणवेधच्या फेसबुकवरही आवर्जून भेट द्या.**



## सुषमा पाध्ये

# 'नमो ज्ञानाय कार्यगौरव' पुरस्काराने सन्मानित

टी. बी. लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन, सृजन शिक्षण संस्था-सांगली आणि महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली येथे 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्‌घाटन ग्राममंगल संस्थेचे संस्थापक व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे यांच्या हस्ते झाले. त्याच वेळी वर्षा कुलकर्णी आणि वैशाली गेडाम यांनी त्यांची मुलाखत घेतली. श्री. पानसे यांनी ज्ञानरचनावाद पद्धतीने प्राथमिक आणि माध्यमिक शाळा यशस्वी पद्धतीने कशा चालवता येतील; मूल्यमापनाच्या पद्धती, आनंददायी शिक्षण इ. विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच मुलांचा भावनिक विकास, बक्षीसे, शिक्षा, इंग्रजी शिक्षण आणि शिक्षकांबरोबरच अधिकारी यांनाही बदलत्या शैक्षणिक बाबींचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

या अधिवेशनाच्या शेवटच्या सत्रात महाराष्ट्र राज्याचे प्रधान शिक्षण सचिव श्री. नंद कुमार यांच्या हस्ते शिक्षणक्षेत्रातील विविध मान्यवरांना 'नमो ज्ञानाय २०१५ जीवनगौरव पुरस्कार', 'नमो ज्ञानाय २०१५ कार्यगौरव पुरस्कार' व 'नमो ज्ञानाय २०१५ कार्यप्रेरणा पुरस्कार' आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी ग्राममंगल संस्थेच्या श्रीमती सुषमा पाध्ये यांचाही 'नमो ज्ञानाय २०१५ कार्यगौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

दोन दिवसांच्या या चर्चासत्रात रचनावादावर सांगोपांग चर्चा झाली. त्यामुळे महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती फार दूर नाही, याची खात्री पटली.

## इ-लर्निंग

# हे खरखुरं इ-लर्निंग !

**सौमित्र घोटीकर**

**इ**-लर्निंग, डिजिटल इंडिया वगैरे शब्द मोदी सरकारच्या राज्यात जरा जास्तच ऐकायला मिळत आहेत. अर्थात सध्या युगही तसंच आहे म्हणा. विविध योजनांद्वारे सध्या सरकार तमाम जनतेला इ-साक्षर बनवू पाहत आहे.



जगही बदलतंच आहे म्हणा. म्हणजे कामाच्या पद्धती बदलताहेत; शिकायच्च्यादेखील! काय तर म्हणे, दप्तराचं ओझं कमी करण्याकरिता Tabs वापरणे. दादरच्या बालमोहन-मध्ये देण्यात येणार होते, पुण्याच्या आझम campus मध्येदेखील असा प्रस्ताव होता, केरळातही एका दुर्गम भागातल्या शाळेत हा उद्योग करण्यात आलाय... आलेही असतील एव्हाना.

प्रश्न काय, तर मुलांचं दप्तर हलकं करायचंय. तर ह्या मंडळींनी tab हे उत्तर काढलं. कल्पनाशक्तीला दाद द्यायला हवी. tab च्या विरोधात मी नाही. पण प्रत्येक विद्यार्थ्याला tab देण्याबद्दल आक्षेप जरूर आहे. tab वरून इंटरनेटवरचे videos वगैरे पाहून शिक्षण होतं, हे खरंच आहे. पण सरसकट सगळ्यांना ते देण्याची अजिबात आवश्यकता नाहीये.

**सोलापूर जिल्ह्यातला प्रयोग**

ह्या संदर्भात सोलापूर जिल्ह्यातल्या माढा तालुक्यातल्या परितेवाडी या छोट्याशा गावातला एक प्रयोग मला नमूद करावासा वाटतो. रणजित दिसले नामक एका प्राथमिक शिक्षकाने खरंखुरं इ-लर्निंग कसं चतुराईनं वापरलंय, ते अगदी पाहण्याजोगं आहे.

त्यांनी बालभारतीमधील कवितांना चाली लावल्या, माफक संगीतावर त्या तालबद्धतेने बसवल्या. चक्क गेय केल्या. नंतर सदर गाणी त्यांनी You-tube वर अपलोड केली. you-tube ही जगातील अग्रगण्य video sharing वेबसाईट आहे, हे आपल्याला ठाऊक असेलच. त्यावर आपल्यालादेखील आपले videos विनामूल्य अपलोड करता येतात. तर, अशा प्रकारे त्या कविता गेय करून अपलोड केल्या गेल्या. प्रत्येक कवितेला एक वेगळी लिंक मिळाली. म्हणजेच प्रत्येक धडा किंवा कविता, त्याचा अर्थ जाणून घेऊन, गेयता असल्याने रंजकतेने शिकता येऊ लागली. हा झाला एक साधारण उपयोग. अर्थात प्रत्येक कवितेचा video पाहण्यासाठी त्याची लिंक- जी थोडी विचित्र स्वरूपात असते, ती प्रत्येक वेळी smart फोन वर टाकणं आलं. म्हणजे पुन्हा तंत्रापासून दूर जाण्याची शक्यता आली.



**QR कोडद्वारे ह्या समस्येवर मात..!**

मुळात QR कोड म्हणजे काय, हे जाणून घेऊ या. सदर आकृतीमधले बिंदूचित्र तुम्ही अनेक ठिकाणी बघितले असेल. हाच तो QR कोड. याचा फायदा असा की, त्याच्यासमोर तुमचा smart फोन नेलात की, तो लगेच scan होतो व तुम्हाला हवी ती वेबसाईट किंवा लिंक क्लिक होते आणि तुम्हाला त्या लिंकमधील किचकट, लांबलचक अक्षरं Type करायला न लागता तुम्ही त्या साईटवर थेट पोचता.

बरोब्बर..! हेच रणजितने केलं. प्रत्येक धडा-कवितेला त्यांनी एक कोड चिकटवला, म्हणजे त्यावर तुमचा android मोबाईल धरला की, त्या-त्या धडा-कवितेवर लगेचच जाता येतं. वाचायला सोप्पं वाटतंय हे, पण सुचणं खूप अवघड आहे. रणजितचं करावं तितकं कौतुक कमीच आहे.

आता रणजित हा मोबाईल फोन (एकच) वर्गात ठेवतात, त्यावर मुलांकडून नाच-गाण्यातून अत्यंत प्रभावी पद्धतीने अभ्यासही करून घेतात.

**हे खरंखुरं इ-लर्निंग !**

नुकतंच Thyrocare ह्या कंपनीचे सर्वेसर्वा डॉ. वेलुमणी ह्यांनी एका भाषणात म्हटलं होतं की तुम्हाला खरा कल्पनाविकास किंवा innovation साधायचं असेल, तर जेमतेम १००० वस्तीच्या खेड्यात जाऊन रहा. रणजित दिसलेंचा अभिनव प्रयोग पाहून हे अगदी पटलं.

समुपदेशकाच्या नजरेतून

# सर्वसामान्यातील विशेष शोधताना...

गंपूदादा / किशोरीताई

परवाच एक पालक भेटायला आले होते, त्यांच्या मुलाला घेऊन... मुलाचं नाव होत तुषार... वय १० वर्षे... शाळेत चौथीच्या वर्गात...

आई-बाबांचं म्हणणं होतं- तो १० वर्षांचा आहे, तोंडी उत्तर छान देतो, त्याला सगळं कळतं, तो मोबाईल तर अगदी शिताफीने वापरतो... त्याला हवा असलेला गेम तो आपला आपण शोधतो. त्याच्यासमोर पासवर्ड दोनदा टाकला की, त्याला लगेच कळतो. सिनेमाची गाणी अगदी तोंडपाठ.... फक्त तो परीक्षेत काहीच लिहीत नाही; त्याचा फक्त लिहिण्याचा प्रश्न आहे. लिहिण्याचा खूप कंटाळा करतो. तेच प्रश्न तोंडी विचारले, तर तो उत्तरे देतो; पण पेपर मात्र कोराच सोडून येतो.

**मी** - म्हणजे तो पेपरमध्ये काहीच लिहीत नाही का?

**आई** - नाही, म्हणजे लिहितो; पण जे प्रश्न पेपरमध्ये असतात, तेच परत लिहून येतो. काही कळतच नाही- त्याला कसं शिकवायचं ते.

**मी** - त्याचा अभ्यास घरी कोण घेतं?

**आई** - मीच घेत होते घरी. पण तो १० मिनिटंसुद्धा माझ्याबरोबर बसत नाही. सारखं इकडे पळ... तिकडे पळ, ऐकतच नाही. एका जागी बसणं त्याला माहीतच नाही. म्हणून मग त्याला आमच्या सोसायटीतच ट्युशन लावली आहे.

**मी** - मग ट्युशनमुळे फरक पडलाय का?

आईने परत तेच सांगायला सुरुवात केली- हो, तिथं करतो की सगळं... ट्युशन टीचरसुद्धा म्हणाल्या की, त्याला सगळं येतंय. आम्हाला तर प्रश्नच पडलाय की, मग नक्की काय होतंय त्याचं?

हे सगळं ऐकून घेतल्यावर लक्षात आलं की, मुलाला काही समस्या तर नाही ना? ह्याचीच भीती वाटत असल्यामुळे आई-बाबा आमचं मूल नॉर्मल आहे, त्याला काहीच समस्या नाही... त्याला इतर सर्व गोष्टी कळतात; फक्त तो लिहीत नाही किंवा त्याला लिहिता येत नाही, हे सांगण्यावर भर देत होते.

मग मी तुषारच्या शाळेतील counseller शीही बोलले. त्यांना नक्की काय समस्या शाळेत जाणवतेय? त्या वेळी त्यांनी सांगितले की- तुषार कुठल्याच गोष्टीला पटकन respond करत नाही. त्याला एका जागी बसून काम करण्यात समस्या जाणवतात. वर्गात काय शिकवलं जातंय, हे त्याला बऱ्याचदा समजतच नाही. म्हणून मग तो इतरांच्या खोड्या काढतो, इतर मुलांना त्रास देतो, बऱ्याचदा तो वर्गाबाहेरच फिरत असतो.

मग परत आई-बाबांशी बोलल्यावर कळलं की- त्यांना काही टेस्ट करायला शाळेने सांगितल्या होत्या, ज्यामध्ये त्याचा बुद्ध्यांक कमी होता आणि काही प्रमाणात अतिचंचलता होती. आता तुषारला खरं तर या दोन समस्या होत्या, परंतु पालक हे मानायलाच तयार नव्हते. त्याच्या समस्या बघता तो नॉर्मल स्कूलिंग-मध्ये सामावून घेतला जाणार नव्हता आणि त्याला स्पेशल स्कूलची गरज होती, जिथं त्याला त्याच्या समस्यांसकट समजावून घेतलं जाणार होतं. परंतु आई-बाबा मात्र नॉर्मल स्कूलवरच अडून बसले होते. म्हणजे मुलाबरोबरच, आई-बाबांवरही काम करावं लागणार होतं...

वर सांगितलेली समस्या आजकाल बऱ्याचदा जाणवते. मूल जोपर्यंत शारीरिक दृष्ट्या नॉर्मल दिसत असतं तोपर्यंत आई-बाबांना त्याला काही समस्या असू शकतात, हे मान्य करायला वेळ लागतो. माझ्या मुलाला काही तरी समस्या जाणवतेय, हे मान्य करायला अवघड असतं आणि अशा वेळी मुलाला मदतीची गरज असते, जेव्हा आई-बाबा मुलाच्या प्रश्नावर पूर्ण denial वर असतात आणि फक्त मुलावर त्याने perform करावे म्हणून दबाव तंत्र वापरत असतात.

आता अशा केसेसमध्ये, माझं मूल सर्वसामान्य आहे की विशेष, हे शोधणं गरजेचं असतं. यात कोणताही पक्का विचार मनात न ठेवता, अगदी प्रामाणिकपणे आपल्या मुलाची निरीक्षणं नोंदवायला सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी काही ठोकताळे तपासून पाहायला हवे आहेत. त्यापैकी काही म्हणजे-

माझं मूल त्याच्या वयाप्रमाणे वागत आहे का?

म्हणजे प्रत्येकामध्ये त्याच्या वयात जशी वाढ होत जाते, तसे त्याच्या सगळ्याच वर्तनात बदल होत असतात. म्हणजे- शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक इत्यादी... त्या-त्या वयाप्रमाणे प्रत्येक वागण्याचे ठोकताळे असतात. म्हणजे साधारण ठरावीक वयामध्ये मुलं मान धरू लागतात, रांगू लागतात, चालू लागतात- किंवा त्यांना दात येऊ लागतात- ह्या सर्वच शारीरिक बदलांचे किंवा वाढीचे वय ठरलेले असते. त्यात थोड्याफार प्रमाणात बदल होऊ शकतो.

तसेच, सूचना समजू लागणे, अनुकरण करता येऊ लागणे, प्रत्येक व्यक्ती वेगळी ओळखता येऊ लागणे, वस्तूंची नावं कळू लागणे, इत्यादी यासारख्या बौद्धिक वाढीचे वयदेखील ठरलेलं असतं.

मूल इतरांमध्ये मिसळू लागणं, आईला सोडून इतर मुलांशी खेळू लागणं, मित्र-मैत्रिणींबरोबर गप्पा मारू लागणं- हे बदल सामाजिक वाढीत येतात आणि ते टप्प्या-टप्प्याने येतात.

भावना समजू लागणं राग-आनंद- दुःख कळू लागणं याचंदेखील एक वय असतं. त्याला आपण भावनिक विकास असे म्हणू या...

वर दिलेल्या गोष्टी ह्या उदाहरणादाखल आहेत. प्रत्येक वयात, त्या-त्या वयानुसार सर्व गोष्टींची वाढ (विकास) होत असते आणि ती तशी झाली नाही तर मुलाला काही तरी समस्या आहेत हे मान्य करायल हवंय.

मग यासाठी खालील गोष्टी कराव्या लागतील.

- वयानुसार वाढीचे (शारीरिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक) ठोकताळे माहीत करून घेणे.
- त्या-त्या वयात सांगितल्याप्रमाणे बदल किंवा वाढ होत आहे की नाही ह्याचे निरीक्षण करणे.
- कोणताही पूर्वग्रह न ठेवता मुलाला समजावून घेता आले पाहिजे आणि त्याच्यातील बदल जाणवले पाहिजेत, नोंदविता आले पाहिजेत.
- कधी कधी वाढ/बदल हा थोड्याफार अंतराने होऊ शकतो, त्यामुळे 'हे असेच झाले पाहिजेत' हा अट्टहास न ठेवता तज्ज्ञांची मदत घेतली पाहिजे.
- माझं मूल सर्वसामान्य आहे, असं धरून न ठेवता समस्या जाणवत असल्यास त्याचे तज्ज्ञांकडून मोकळेपणाने निरसन करून घेतले पाहिजे. तसेच त्यांनी सांगितलेल्या टेस्ट वेळोवेळी करून घेतल्या पाहिजेत.
- मुलाच्या वाढीच्या वयात योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

मुलाची समस्या तेव्हाच लक्षात येणार आहे, जेव्हा आई-बाबा म्हणून तुमच्या मनाने कुठलेही उत्तर आधीच ठरवून ठेवलेले नसेल.

मुलाची समस्या जाणवत असून लपून ठेवणं म्हणजे 'मला मधुमेह असू शकतो' किंवा 'निघाला तर? त्यापेक्षा टेस्टच नको करायला' असं म्हणण्यासारखं आहे.

जर मधुमेह असेल तर औषधोपचार करता येऊन तो कंट्रोलमध्ये ठेवता येऊ शकतो; परंतु टेस्टच केली नाही आणि मधुमेहाच्या समस्येला सामोरचं गेलं नाही, तर मात्र मोठी हानी होऊ शकते.

म्हणूनच माझं मूल सर्वसामान्य मुलांमध्ये मोडतं की ते विशेष आहे, हे जाणून घेतलं पाहिजे.

मुलाला वाढवताना थोडी जरी शंका मनात आली, तर लगेच तज्ज्ञांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

एकच महत्त्वाचं म्हणजे- मूल सर्वसामान्य असेल तर ठीक आहे; परंतु जर ते विशेष असेल, तर मात्र त्याला मदतीचा हात लागणार आहे, हे लक्षात घ्या. त्यामुळे त्याला काही गोष्टी येत नाहीत, म्हणून त्याच्यावर हात उचलण्यापेक्षा त्याला हात देऊन बघा- त्याला नक्कीच बळ मिळेल.

❐❐


ग्राममंगल

# शिक्षणवेध

आपले २०१६ या वर्षाचे सर्व अंक **रचनावाद** या संकल्पेवर सादर करीत आहोत. या विषयावरील आपले लेख, कविता, अनुभव, प्रयोग, अवांतर माहिती व इतरही साहित्य आमच्यापर्यंत आवर्जून पाठवा. उपक्रम तुमच्या अनुभवांचा, विचारांचा, इतरही काही शिक्षकांना, पालकांना व संस्थाचालकांना लाभ होऊ द्या. **वैचारिक आदान-प्रदानातूनच शैक्षणिक परिवर्तनाला चालना मिळणारे आहे.**